नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## हायटेन्शन लाईनमुळे बसला आग

**दोघांचा मृत्यू अनेक जखमी**

■ **वृत्तसंस्था, जयपूर, दि. २८ :** जयपूरमधील मनोहरपूरमध्ये, मजुरांना घेऊन जाणा?या बसचा हाय-टेन्शन लाईनला स्पर्श झाल्यामुळे आग लागली. या अपघातात उत्तर प्रदेशातील दोन जणांचा मृत्यू झाला आणि १० कामगार भाजले.

बसच्या वरती सिलेंडरही होते, त्यापैकी एकाचा स्फोट झाला. जयपूर शहरापासून ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या मनोहरपूर परिसरात ही घटना घडली. अपघात झाला तेव्हा तोडी येथील एका वीटभट्टीवर ६५ कामगार आणले जात होते. गंभीर जखमी झालेल्या पाच जणांना जयपूर येथे रेफर करण्यात आले आहे.

* वर्ष ५५ * अंक २०७ * * नागपूर * बुधवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### कडूंना गोड बोलायला लावा

आज नागपुरात बच्चू कडू यांचा महा एल्गार मोर्चा धडकलेला आहे. कालच आम्ही संत्रा बागायतदार यांची व्यथा मांडली होती. बच्चू कडू हे जनतेचे नेते आहेत. विधान सभेतील बुलंद आवाज म्हणून त्यांना ओळखले जाते. आज मुंबईत कडू यांच्या मागण्या आमच्यासमोर आल्यावर शेतकऱ्यांचे तोंड गोड करू असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसे पाहिले तर निवडणुकीच्या आधी शेतकऱ्यांना जी जी आश्वासने दिली होती ती आश्वासने पूर्ण करा, एवढेच कडूंचे म्हणणे आहे. आजच्या महाएल्गार मोर्चामध्ये आंदोलनाला राज्यातील प्रमुख शेतकरी नेत्यांचा पाठिंबा मिळाला आहे. आंदोलनाच्या मंचावर विजय जावंधिया, वामनराव चटप (स्वतंत्र भारत पक्ष), राजू शेट्टी (राष्ट्रीय अध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना), महादेव जानकर (राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष), डॉ. अजित नवले (अखिल भारतीय किसान सभा), राजन क्षीरसागर (अखिल भारतीय किसान सभा, प्रगत मंच), प्रकाश पोहरे (अध्यक्ष, किसान ब्रिगेड), दीपकभाई केदार (ऑल इंडिया पँथर सेना), प्रशांत डिक्कर (स्वराज्य पक्ष), विठ्ठलराजे पवार (शरद जोशी विचार मंच, शेतकरी संघटना) अशा प्रकारच्या संघटना आणि नेते एकत्र आलेले आहेत. या सर्व संघटना आणि हे नेते शेतकऱ्यांचे प्रश्न कळकळीने मांडणारे नेते आता नागपूर मध्ये दाखल झालेले आहेत. दोन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांची आणखी धूळधाण होत आहे. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ त्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला किंवा निदान सरकारने घोषित केलेला हमीभाव मिळाला, तरी बऱ्याच प्रमाणात कमी होतील. पूर्वीच्या काळी शेतकऱ्याला दर एकरी जो खर्च होता त्यामध्ये आता कैक पटीने वाढ झालेली आहे. सर्वात महत्त्वाचा प्रश्न मजुरांचा आहे तसेच आपल्या देशातील अनेक शेतकरी अल्पभूधारक आहेत. हे अल्पभूधारक आपल्या कुटुंबासह आपल्या थोड्याशा शेतीवर काम करतात म्हणून त्यांना परवडते. आता जे जे तथाकथित जमीनदार आहेत त्यांना आपली जमीन ठेक्याने किंवा बटाईने म्हणजेच (खंडाने किंवा वाट्याने किंवा खोतीने) देणे भाग आहे. यामुळे छोटे शेतकरी काय किंवा मोठे शेतकरी काय कोणीही सुखी नाही. आजच्या मोर्चामध्ये आलेले शेतकरी खरोखरच अत्यंत कष्टात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या सर्व बाबींची माहिती नाही असे आम्ही मुळीच म्हणणार नाही. म्हणूनच, सरकार म्हणून जे जे काही करता येईल ते आता विनाविलंब करावे, हाच कडू यांच्या मोर्चाचा एकमात्र संदेश आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाएल्गार मोर्चाची महाधडक!





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी आणि इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी माजी राज्यमंत्री तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या महाएल्गार मोर्चाने नागपूरच्या सीमेवर महाधडक दिली. या आंदोलनात लाखोंच्या संख्येने शेतकरी आणि नागरिक सहभागी झाल्याने वर्धा मार्ग पूर्णतः ठप्प पडला होता.

कर्जमाफी, सातबारा कोरा करा, या व अन्य प्रमुख मागण्यांसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानावर धडक देणार असल्याचे बच्चू कडू यांनी यापूर्वी जाहीर केले होते. त्याअन्वये, सोमवारी अमरावती जिल्ह्याच्या चांदुर बाजार तालुक्यातील बेलोरा येथून बच्चू कडू आणि आंदोलकांनी नागपूरच्या दिशेने कूच केले. काल वर्धा येथे मुक्काम करून हा काफिला सकाळी नागपूरच्या दिशेने निघाला. दरम्यान, बुटीबोरीच्या पुढे जामठा परिसरात पोलिसांनी अडवून धरल्याने, लाखो आंदोलकांनी रस्त्यावरच ठिय्या मांडला. परिणामी, वर्धाकडे जाणारी आणि त्यादिशेने येणारी वाहतूक ठप्प झाली.

रॅलीत हजारो ट्रॅक्टर, बैलगाड्या आणि मेंढपाळ बांधवांचा सहभाग आहे. आंदोलनासाठी अन्नसामुग्रीची मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात आली असून, सोलापूरहून २० हजार भाकऱ्या, मिरची आणि शेंगदाण्याचा खरडा, नाशिकहून कांदा व भाजीपाला, लातूरहून तूरडाळ, तसेच इतर भागांतून हुरडा व अन्नधान्य नागपूरकडे पाठवण्यात आले.

सुरक्षा दृष्ट्या प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला असून मुख्यमंत्री यांचे नागपुरातील धरमपेठ मधील निवासस्थान, सिव्हील लाइन्स मधील कामगिरी हे शासकीय निवासस्थान आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय येथे पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. कोणताही अप्रिय प्रकार घडू नये म्हणून पोलीस आणि वाहतूक विभाग पूर्ण सतर्कतेने काम करत आहेत.

दरम्यान आंदोलकांनी दुपारी ५ वाजेपर्यंत सरकारला अल्टिमेटम दिला होता. तो संपल्यानंतर आंदोलकांनी नागपूरच्या दिशेने कुच करण्याचा प्रयत्न केला . परंतु, पोलिसांनी त्यांना त्याच भागात अडवून धरले होते . रात्रीचा फायदा घेवून आंदोलक शहरात शिरू नयेत म्हणून, पोलिसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी केली आहे.

आंदोलनात स्वाभिमान शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजू शेट्टी, विजय जावंधिया, रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, रविकांत तुपकरी, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, अ. भा. किसान सभेचे डॉ. अजित नवले, अ. भा. किसान सभा प्रगत मंचचे राजन क्षीरसागर, किसान ब्रिगेडचे प्रकाश पोहरे, ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपकभाई केदार, विठ्ठलराजे पवार, प्रशांत डिक्कर आदी नेते सहभागी झाले होते.

दरम्यान, आंदोलनाची तिव्रता लक्षात घेता या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात आली होती. वर्धेकडून येणारी वाहतूक जामठा चौकी, एसीआय, सिमेंट फॅक्टरी, डीपीएस शाळा, मिहान डब्ल्यू बिल्डींगवरून खाली उतरून पुढे वळविण्यात आली. दुसरीकडे, विरुद्ध दिशेने जाणारी वाहतूक सेझ मिहान पुलाच्या सर्व्हिस रोडने, हॉटेल ले मेरीडियन व पांजरा आऊटर रिंग रोडने वळविण्यात आली. मात्र, लाखोंच्या संख्येने आलेल्या आंदोलकामुळे या मार्गावरील पुर्णतः वाहतूक ठप्प झाली होती.

### बैठकीला बोलावून अटक करण्याचा सरकारचा डाव



शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला तीव्र स्वरूप आले असून माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर थेट आरोप केला आहे की, बैठकीला बोलवून आपल्याला अटक करण्याचा सरकारचा डाव होता. बैठकीची गरज काय, थेट निर्णय घ्या,ह्रअसे सांगत कडू यांनी सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, यापूर्वी दहावेळा आम्ही बैठका घेण्यासाठी विनंती केली, पण सरकारने प्रतिसाद दिला नाही. आता मोर्चा निघाल्यावर आम्हाला बैठकीसाठी बोलावणे म्हणजे आंदोलन कमकुवत करण्याचा प्रयत्न आहे. आंदोलक जनतेला वाऱ्यावर सोडून आम्ही बैठकीला गेलो आणि त्यानंतर आम्हाला अटक केली, तर ते अन्यायकारक ठरेल. कडू यांनी स्पष्ट केले की, आता सरकारच्या कोणत्याही बैठकीला ते उपस्थित राहणार नाहीत आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने तातडीने कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू अशी घोषणा देऊन सत्तेत आलेल्या सरकारने आजवर शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला आहे. ना कर्जमाफी, ना हमीभाव- उलट केंद्र सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिक संकटात आहे. कापसाची आयात वाढल्याने देशांतर्गत भाव घसरले, तर सोयाबीनचा किमान आधारभूत भाव ५ हजार ३३५ रुपये असूनही शेतकऱ्यांना ५०० ते ३ हजार दरम्यानच विक्री करावी लागते, हा कोणता आत्मनिर्भर भारत? असा सवाल शेतकऱ्यांकडून केला जात आहे.





## आठव्या वेतन आयोगाला मान्यता

### ५० लाख कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना फायदा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :** केंद्र सरकारने मंगळवारी आठव्या वेतन आयोगाला मंजुरी दिली, ज्यामुळे ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना फायदा होईल.



माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, वेतन आयोग १८ महिन्यांच्या आत त्यांच्या शिफारशी सादर करेल. त्यांच्या शिफारशी १ जानेवारी २०२६ पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. आयोग केंद्र सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या पगार आणि भत्त्यांचा आढावा घेईल.

मूळ पगारातील वाढीची रक्कम फिटमेंट फॅक्टर आणि डीए विलीनीकरणावर अवलंबून असते. ७ व्या वेतन आयोगात फिटमेंट फॅक्टर २.५७ होता. ८ व्या वेतन आयोगात तो २.४६ असू शकतो.

प्रत्येक वेतन आयोगात महागाई भत्ता शून्यापासून सुरू होतो. कारण नवीन मूळ पगार महागाई लक्षात घेऊन आधीच वाढवलेला असतो. त्यानंतर, महागाई भत्ता पुन्हा हळूहळू वाढतो.

सध्या, डीए मूळ वेतनाच्या ५५% आहे. डीए रद्द केल्याने, एकूण पगारातील वाढ (बेसिक + डीए + एचआरए) थोडी कमी दिसू शकते, कारण ५५% डीए घटक काढून टाकला जाईल.

फिटमेंट फॅक्टर ही एक गुणक संख्या आहे जी सध्याच्या मूळ पगाराने गुणली जाते आणि नवीन मूळ पगार मिळतो. वेतन आयोग महागाई आणि राहणीमानाचा खर्च लक्षात घेऊन ते निश्चित करतो.

**७ वा वेतन आयोग :** फेब्रुवारी २०१४ मध्ये त्याची स्थापना करण्यात आली आणि नोव्हेंबर २०१५ मध्ये अहवाल सादर करण्यात आला. १ जानेवारी २०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू झाल्या.

## नागपुरातील मुख्यमंत्री निवासस्थानासमोर संचारबंदी सदृश्य स्थिती

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** कर्जमाफी, सातबारा कोरा करा, या व अन्य अशा प्रमुख मागण्यांसाठी आक्रमक झालेल्या माजी मंत्री बच्चू कडू यांच्या महा एल्गार आंदोलनाची धास्ती राज्यसरकारने घेतली आहे.

आंदोलक सिव्हिल लाईन्स मध्ये शिरण्याची शक्यता पाहता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान रामगिरी समोर संचारबंदी सदृश्य परिस्थिती पाहायला मिळाली.



रोज सायंकाळ गजबजणारा वॉकर्स स्ट्रीट वाहतूकीस पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. रामगिरीकडे येणाऱ्या सर्व मार्गांवर पोलिसांनी बॅरिकेट्स लावून वाहतूक पूर्णपणे थांबवली. कडेकोट पोलीस बंदोबस्तामुळे संपूर्ण रामगिरीला छावणीचे स्वरूप आले आहे.

आंदोलक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या महाल आणि रेशिमबागकडेही जाऊ शकतात अशी गुप्त सूचना मिळताच पोलिसांनी या दोन्ही ठिकाणी देखील कडेकोट बंदोबस्त वाढवला आहे. महामोर्चाच्या बंदोबस्तासाठी लगतच्या जिल्ह्यातूनही पोलिसांची मोठी कूमक मागवण्यात आली आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंटला

## राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विकसित महाराष्ट्र २०४७ या महत्त्वाकांक्षी योजनेला हिरवा कंदील देण्यात आला.

याशिवाय नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग, जात वैधता प्रमाणपत्राबाबतच्या मुदती, तसेच न्यायालयीन आणि महसूल विभागाशी संबंधित मंजुरी देण्यात आली आहे. विविध विभागांमधील एकूण सात मोठ्या निर्णयांमुळे राज्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे.

प्रथम निर्णय म्हणून नियोजन विभागाने विकसित महाराष्ट्र २०४७ या व्हिजन डॉक्युमेंटला मंजुरी दिली आहे. या अंतर्गत महाराष्ट्राला पुढील दोन दशकांत प्रगतीशील, शाश्वत आणि सर्वसमावेशक राज्य बनवण्याचा रोडमॅप तयार करण्यात आला आहे. यासाठी विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट गठित करण्याचा निर्णय झाला असून, याचे नेतृत्व स्वतः मुख्यमंत्री फडणवीस करतील.

नागरिकांकडून ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमातून सूचना मागवून, त्यांचे एआय-आधारित विश्लेषण करून अंतिम दस्तऐवज तयार करण्यात येणार आहे. राज्य व जिल्हा स्तरावर १६ प्रमुख संकल्पना निश्चित करण्यात आल्या असून, शासनाने १०० ठोस उपक्रमांची रूपरेषा तयार केली आहे.

ही योजना महाराष्ट्राच्या दीर्घकालीन आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक विकासाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

**रेल्वे मार्गाला सुधारित खर्चासह मंजुरी**

गृह विभागाने सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या प्रकल्पाला सुधारित खर्चासह मंजुरी दिली आहे. या प्रकल्पात राज्य सरकारचा ५० टक्के आर्थिक सहभाग राहणार असून, अधिकचा निधी देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**उमेदवारांना सहा महिन्यांची मुदत**

सामान्य प्रशासन विभागात राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार करण्यात आला असून, नव्याने Secretary (Protocol, FDI, Diaspora Affairs and Outreach) असे पदनाम तयार करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे नगरविकास विभागाने आणि ग्रामविकास विभागाने समान निर्णय घेत, नगरपालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यास मान्यता दिली आहे. यासाठी संबंधित अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत.

**अतिरिक्त सत्र न्यायालय**

धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय, तसेच दिवाणी वरिष्ठ न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी मिळाली आहे.

महसूल विभागाने वाशिम जिल्ह्यातील सुविदे फाउंडेशन, रिसोड यांना मौजे करडा (ता. रिसोड) येथील २९.८५ हेक्टर जमीन नाममात्र दराने (एक रुपया) पुढील ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेतला आहे.

## मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री - प्रशासनात वाद?

### मुख्यमंत्र्यांवर आली मध्यस्थी करण्याची वेळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २८ :** राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याच्या मुद्यावरून आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री व प्रशासनात चांगलाच वाद झाल्याची माहिती समोर आली आहे.

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी या बैठकीत अधिकाऱ्यांना धारेवर धरत सरकारने घोषित केलेली मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसल्याचा आरोप केला. त्यावर अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वादात हस्तक्षेप करत अधिकाऱ्यांना आजपर्यंत करण्यात आलेल्या मदतीची आकडेवारी सादर करण्याचे आदेश दिले.

आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री मकरंद पाटील यांनी सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत अद्याप त्यांच्या खात्यात पोहोचली नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. 'तुम्ही सरकारकडून देण्यात आलेली मदत पोहोचली म्हणता, जिल्हाधिकारीही मदत दिली म्हणतात, पण प्रत्यक्षात शेतकरी मदत मिळाली नसल्याचा दावा करतात', असे ते या प्रकरणी प्रशासनाला धारेवर धरताना म्हणाले.



त्यावर प्रशासनाने पुन्हा एकदा 'आमच्याकडून शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचल्याचा' दावा केला. यावरून मंत्री व प्रशासन यांच्यात चांगलीच खडाजंगी रंगली. हा वाद वाढत असल्याचे पाहून स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यात हस्तक्षेप केला. आतापर्यंत झालेल्या मदतीसंदर्भात आजच आढावा बैठक घ्या व शेतकऱ्यांपर्यंत किती मदत पोहोचली याची माहिती सादर करा, असे आदेश त्यांनी दिले.

बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधतानाही त्यांनी आजच्या बैठकीत अतिवृष्टी व महापुरासंबंधी सरकारने घोषित केलेल्या पॅकेजचा आढावा घेण्यात आल्याचे स्पष्ट केले.

आतापर्यंत ८ हजार कोटी रीलिज झाले आहेत. त्यानुसार ४० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचले आहेत. सरकारने अजून ११ हजार कोटींना मान्यता दिली आहे. सरकार या प्रकरणी ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यांत पैसे जमा करण्याचा प्रयत्न करत आहे. उर्वरित १० टक्के शेतकऱ्यांबाबत काही तांत्रिक अडचणी आहेत. त्या देखील लवकरच सोडवण्यात येतील, असे ते म्हणाले.


### महाराष्ट्राचा पप्पू बनू नये..



शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत बोगस मतदान होत असल्याचा आरोप केला होता. यावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्राचे पप्पू बनू नये, असा खोचक टोला फडणवीस यांनी लगावला. ते पुढे म्हणाले,आदित्य ठाकरे यांनी मी महाराष्ट्राचा पप्पू आहे, असे प्रदर्शन करू नये, अशी माझी अपेक्षा होती. ज्या प्रकारे राहुल गांधींनी मोठी स्क्रीन लावून उगीच इकडून तिकडे येरझाऱ्या घालायच्या आणि खोदा पहाड आणि चुहा भी नहीं निकला, अशा पद्धतीचे वक्तव्य करायचे. दुर्दैवाने तेच काल आदित्य ठाकरेंनी केले.

## अजित पवार आणि शिंदेंनी सरकारमधून बाहेर पडलं पाहिजे

### संजय राऊत यांची अपेक्षा



■ **मुंबई:** संजय राऊत यांनी नुकताच भाजपावर टीका केली. बाबरी प्रकरणानंतर देशभरात बाळासाहेबांची लाट होती. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी सत्तेतून बाहेर पडले पाहिजे असे त्यांनी म्हटले. अमित शहांनी काल कुबड्या म्हणून उल्लेख केला. संजय राऊत म्हणाले की, उद्या आम्ही जरी सत्तेत आलो तरीही आम्ही राज्यात विरोधीपक्ष ठेऊ. स्वाभिमान असल्यास एकनाथ शिंदे यांनी सत्तेतून बाहेर पडले पाहिजे. वाजपेयींनी बाळासाहेब ठाकरे यांना निवडणूक न लढवण्याची विनंती केली होती. मतांचे विभाजन होईल, असे त्यांचे मत होते. राजकारणात चढउतार होत असतात. सध्या आम्ही त्यांच्या व्होटचोरीला रोखत आहोत.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, मुळात म्हणजे आम्ही त्यांची व्होटचोरी रोखत असल्याने त्यांना त्यांचा पराभव दिसत आहे. ज्यावेळी पहिल्यांदा युती झाली त्यावेळी यांना महाराष्ट्रात कोणी ओळखतही नव्हते. यांच्याकडे पोस्टर लावण्यासाठीही कोणी माणसे नव्हती. बाळासाहेब ठाकरेंनी हिंदुत्ववाच्या मुद्द्यावर आदेश दिले की, यांचे काम केले पाहिजे. कुबड्या कुबड्या काय सांगता? ते आम्हाला कुबड्या शिकवतात? अमित शाह हे राजकारणात फार उशिरा आलेत. ते सुद्धा व्यापारी म्हणून आणि व्यापार म्हणून ते राजकारण करत आहेत. त्यांनी भारतीय जनता पक्षात व्यापारी वृत्तीची एक पिढी निर्माण केली. त्यांना समाजकारण याचे काहीही देणे घेणे नाही. त्यामुळे त्यांचे या कुबड्या नको त्या कुबड्या नको हे जे काही सुरू आहे ना.. ते त्यामुळेच. मुलाला क्रिकेटमध्ये टाकायचे.. परिवार वाद हा भाजपाचा तिथून सुरू आहे, असे ते म्हणाले.

## मनोज जरांगे रयतेचे नव्हे निजामी मराठ्यांचे प्रतिनिधी

### ॲड. आंबेडकरांची सडकून टीका



**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गरीब मराठ्यांचे नव्हे, तर सत्तेतील निजामी मराठ्यांचे प्रतिनिधी असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. आम्हाला आरक्षणाच्या मुद्यावर फसवाफसवीचा खेळ करायचा नाही. आम्हाला ओबीसींनाही न्याय द्यायचा आहे आणि रयतेतील मराठ्यांनाही न्याय द्यायचा आहे, असे ते म्हणाले.

ओबीसी व भटक्या विमुक्त महासंघाने राज्य सरकारच्या मराठा आरक्षणासंबंधीच्या २ सप्टेंबरच्या जीआरला विरोध करण्यासाठी मोर्चाचे आयोजन केले आहे. प्रकाश आंबेडकर या मोर्चात सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश केला जाऊ नये. सरकारने यापूर्वी दोनदा असा प्रयत्न केला. पण त्याला यश आले नाही. त्यामुळे हैदराबाद व सातारा गॅझेटच्या अंमलबजावणीला विरोध केला जात आहे. मराठा समाजात एक निजामी मराठा व दुसरा रयतेचा मराठा वर्ग आहे. रयतेतील मराठे हे शिवाजी महाराजांसोबत होते. तर सरंजाम मराठे हे निजामासोबत होते. या दोन्ही वर्गातील १६ व्या शतकातील भांडण आजही स्पष्टपणे दिसते.

आजही निजामी मराठे सत्तेत आहेत. त्यांची रयतेतील मराठ्यांना आरक्षण देण्याची इच्छा नाही. या प्रकरणी त्यांचाच खरा अडसर आहे. निजामी मराठ्यांकडून फारकत घेतल्याशिवाय या मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही. एवढेच नाही तर त्यांना न्यायही मिळणार नाही, असे आंबेडकर म्हणाले.

## शरद पवार अध्यक्ष असलेल्या कारखान्याच्या चौकशीचे

# मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश

### द्वेषातून निर्णय म्हणत रोहित पवारांची टीका





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** राज्यातील ऊस संशोधन आणि विकास क्षेत्रात अग्रगण्य मानली जाणारी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट सध्या नव्या वादळात सापडली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या या संस्थेच्या निधी वापराबाबत चौकशी करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, संस्थेला देण्यात येणाऱ्या सरकारी अनुदानाचा वापर नेमक्या कारणासाठी झाला आहे का? याची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. साखर आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली विशेष चौकशी समिती नेमण्यात आली असून, दोन महिन्यांत तपास पूर्ण करून शासनाला अहवाल सादर करायचा आहे.

राज्य सरकारकडून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनुदान दिलं जातं. तसेच, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून प्रति टन एक रुपया या दराने निधी थेट या संस्थेकडे वळवला जातो. हा निधी ऊस शेतीतील संशोधन, प्रशिक्षण, प्रयोगशाळा सुविधा आणि उद्योग विकासासाठी वापरला जाण्याचा हेतू आहे.

मात्र, अलीकडच्या काळात हा निधी नेमका कोणत्या उद्देशासाठी वापरला जातो, आणि तो पूर्णतः संशोधनासाठीच खर्च केला जातो का? याबाबत काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यानंतरच सरकारने या विषयाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश जारी केले आहेत.

मंत्री समितीच्या बैठकीत ऊस हंगाम २०२५-२६ च्या नियोजनावर चर्चा झाली. या बैठकीत साखर कारखान्यांकडून मिळणाऱ्या निधीचा वापर, शेतकऱ्यांना दिला जाणारा दर, तसेच ऊस गाळपासंबंधीच्या अडचणींवर विचारविनिमय करण्यात आला. चर्चेदरम्यान काही मंत्र्यांनी व्हीएसआयच्या अनुदानाबाबत शंका व्यक्त केली. संशोधनाच्या नावाखाली मोठा निधी जमा होत असून, त्याचा वापर पारदर्शकतेचा अभाव आहे, अशी नोंद बैठकीत घेण्यात आली. परिणामी, मुख्यमंत्री फडणवीस यांनी साखर आयुक्तांना चौकशी समिती स्थापन करून दोन महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

**संस्थेच्या नियामक मंडळावर मोठ्या नेत्यांची नावे**

शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील, आणि जयप्रकाश दांडेगावकर या नेत्यांची नावे संस्थेच्या नियामक मंडळावर आहेत. विरोधकांनी या चौकशीला राजकीय हेतू असल्याचा आरोप करण्याची शक्यता वर्तवली जात आहे, तर सत्ताधारी पक्षाचे नेते मात्र या तपासाची आवश्यकता असल्याचे म्हणत आहेत. राज्य सरकारने अनुदानाचा वापर केवळ संस्थेच्या मूळ उद्देशासाठीच व्हावा, यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

## ज्येष्ठ कादंबरीकार बाबू बिरादार यांचे निधन



■ **वृत्तसंस्था**
**छ. संभाजीनगर, दि. २८ :**
मराठीतले ज्येष्ठ कादंबरीकार बाबू बिरादार यांचे मंगळवारी २८ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेआठ वाजता देगलूर (जि. नांदेड) येथे निधन झाले.

गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर देगलूर येथील कद्रेकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे वय ७५ वर्षे होते. आज दुपारी चार वाजता धनगरवाडी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

बाबू बापूराव बिरादार असे त्यांचे पूर्ण नाव. आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांच्या सीमेवरच्या अत्यंत मागासलेल्या व दुर्गम जेमतेम लोकवस्ती असलेले देगलूर तालुक्यातील 'काटेवाडी' हे त्यांचे मूळ गाव. ते त्यांच्या मामाच्या गावी धनगरवाडी अर्थातच मंगाजीवाडी येथे स्थायिक झाले होते.

बाबू बिरादार यांनी मातीखालचे पाय, कावड, गोसावी,अग्निकाष्ठ, अंतःपुरूष, संभूती अशा दमदार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ते ४१ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. जिल्हा सहकारी बँकेत दीर्घकाळ सेवा करून ते निवृत्त झाले होते. अत्यंत मोकळ्याढाकळ्या स्वभाव, गप्पांच्या मैफलीत मनापासून रमणारा, बोलताना आपला देगलुरी ढाचा किंचितही बिघडू न देणारा हा मनस्वी कलावंत होता.

'मातीखालचे पाय' ही त्यांची पहिली कादंबरी. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेद्वारे ती प्रसिद्ध झाली. ज्येष्ठ कवी आणि अनुवादक भगवंत क्षीरसागर आणि विख्यात चित्रकार भ. मा. परसवाळे यांच्या पाठपुराव्यामुळे सांगाती प्रकाशनाकडून १९८२ मध्ये ही कादंबरी आली. आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्या सीमारेषेवरील वाडी या छोट्याशा गावातील संभाच्या कुटुंबाच्या वाताहतीची कहाणी या कादंबरीत आलेली आहे.

मराठवाडा आणि तेलंगण-कानडी सीमाप्रदेशातल्या माणसांचे जग, आदिम वाटाव्याशा पातळीवरचे तिथले जगण्याचे झगडे, राग-लोभ आणि त्यातली निर्मम निर्दयता, इथले मानसिक-भावनिक-प्रादेशिक रखरखलेपण यांचे अजिबात भावनावश न होता केलेले विलक्षण प्रत्ययकारक चित्रण त्यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक जगदीश कदम बाबू बिरादार यांच्या लेखनाबद्दल म्हणतात, 'बाबू बिरादार यांच्या कादंबऱ्यांमधून मानवी स्वभावातील गुंतागुंत येते. समाजातील प्रथा, परंपरा येतात. नात्यातील पक्के-सैल धागेदोरे येतात. कधी काळ तर कधी नियतीच्या माध्यमातून खलपुरूष येतो. देहीक असोशी आणि पीडा येतात. कसल्याही प्रकारची कसरत न करता प्रांजळपणे केलेले शारीर वर्णन येते आणि स्वाभाविक बोलली जाणारी पात्रगत भाषा येते.

## डॉ. हिना गावित यांची घरवापसी




■ **वृत्तसंस्था, नंदुरबार, दि. २८ :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर नंदुरबारमध्ये भाजपची ताकद वाढली आहे. नंदुरबारच्या माजी खासदार डॉ. हिना गावित यांची भाजपमध्ये घरवापसी झाली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत गावीत यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह पुन्हा एकदा भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. यामुळे भाजपला जिल्ह्यात मोठे बळ मिळणार आहे.

नंदुरबारच्या माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी आज भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत डॉ. हिना गावितांची घरवासी झाली आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात भाजपची ताकद वाढली आहे. डॉ. हिना गावित यांचा लोकसभा निवडणूकीत पराभव झाला होता, त्यामुळे त्यांनी भाजप पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत विधानसभा निवडणूक अपक्ष लढवली होती. विधानसभा निवडणूकीमुळे त्या भाजपपासून दूर गेल्या होत्या, मात्र आता त्या पुन्हा भाजपमध्ये परतल्या आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपची ताकद दुप्पट झाली आहे.

हिना गावित या माजी खासदार असून माजी आदिवासी विकास मंत्री आणि विद्यमान आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या कन्या आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी त्यांनी भाजपचा राजीनामा देत अपक्ष निवडणूक लढवली होती, मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. गावित कुटुंबाचे उत्तर महाराष्ट्रात मोठे राजकीय वजय आहे. त्यांचे वडील भाजपचे आमदार असल्याने त्या भाजपमध्ये परतणार असल्याचे बोलले जात होते.

## हे तर भस्म्या रोग झालेला ॲनाकोंडा...

### एकनाथ शिंदे यांची उद्धव ठाकरेंवर विखारी टीका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** निवडणुका जवळ आल्या की मुंबई विकली जाणार अशी कॅसेट विरोधक सुरू करतात, अशी टीका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

एकनाथ शिंदे म्हणाले, हे स्वतः ॲनाकोंडा आहेत. मुंबई महापालिकेच्या तिजोरीला मोठा विळखा घालून बसले आहेत. या अ?नाकोंडाचे वैशिष्ट्य वेगळे आहे, यांचे पोट भरत नाही, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाकरे गटावर खोचक टीका केली आहे.

उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर पलटवार करताना एकनाथ शिंदे म्हणाले, याअ?नाकोंडाने मुंबईची तिजोरी गिळली, मुंबई गिळली, मुंबईतल्या रुग्णांची खिचडी गिळली, त्याचबरोबर मुंबईतले भूखंड गिळले. तरी सुद्धा त्यांचे पोट भरत नाही. त्यांना भसम्या रोग झाला आहे. हा भसम्या रोग झालेला अ?नाकोंडा आहे. त्यामुळे त्यांचे पोट कधीच भरणार नाही. मुंबईकरांना हे कळले आहे की मुंबई लुटण्याचे काम, तिजोरी साफ करण्याचे काम, डेड बॉडीमध्ये पैसे खाण्याचे काम ज्यांनी केले त्यांना या निवडणुकीत मुंबईकर माफ करणार नाहीत. त्यांना भीती बसली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबईत आले असताना त्यांना कोळी बांधवांनी दोन बोटी डीप सीमध्ये बोटिंग करण्यासाठी दिल्या होत्या. यावरून उद्धव ठाकरे यांनी मुंबई गिळण्याचे काम सुरू असल्याची टीका केली होती. त्यावर आज शिंदे यांनी पलटवार केला आहे.

## धर्मवीर-२ सरकारने तीन वर्षे का घेतली?

### सचिन सावंतांचा भाजपावर हल्ला



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत यांनी आज भाजपावर तीव्र टीकास्त्र सोडत सीबीआयला सुशांतसिंह प्रकरणात पाच वर्षे लागली, आता पालघर साधूंच्या प्रकरणाला किती लागणार? असा थेट सवाल केला. धर्मवीर-२ सरकारने या प्रकरणाचा राजकीय उपयोग संपल्यावरच तपास सीबीआयकडे दिला का, अशीही टीका त्यांनी केली.

टिळक भवनात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सावंत म्हणाले, पालघर साधूंची हत्या ही अफवेमुळे झालेली दुर्दैवी घटना होती. मविआ सरकारच्या तपासात हे स्पष्ट झाले होते. तरीही भाजपाने या प्रकरणाचा राजकीय फायदा घेण्यासाठी कारस्थान असल्याचा डंका पिटला. गडचिंचले गावात भाजपाची सत्ता असून आरोपींमध्ये काही भाजप कार्यकर्ते होते, हे विसरून त्यांनी ढोंगाचे राजकारण केले.

सावंतांनी पुढे दस्तावेज मांडत आरोप केला की, धर्मवीर २ सरकारने ११ ऑक्टोबर २०२२ ला सीबीआय तपासाची घोषणा केली, पण प्रत्यक्ष आदेश ६ फेब्रुवारी २०२४ ला काढला. त्यातल्या कलमांमध्ये चुका झाल्या म्हणून पुन्हा सव्वा वर्षांनी २२ मे २०२५ ला सुधारणा करण्यात आली आणि शेवटी ८ ऑगस्ट २०२५ ला सीबीआयकडे फाईल गेली. तब्बल तीन वर्षे सरकार झोपेत होते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## महायुतीला बाधक होईल असे आम्ही करणार नाही...



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा अपमान केला असल्याचे बोलले जात होते.

यावर मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना खुलासा करत म्हटले की, कुठल्याही आमिषाला बळी पडणार नाही, असे धंगेकर म्हणाले होते. परंतु, आमिषाला ऐवजी अमित शहा असा अपभ्रंश झाला असल्याचे उदय सामंत म्हणाले.

पुण्यातील जैन समाजाच्या संदर्भात बोलताना उदय सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी आळंदीमध्ये जाऊन जैन समाजाचा मुद्दा ऐकून घेतला असून त्यांची भूमिका धंगेकर साहेबांना पटली आहे. काही गोष्टी गैरसमजातून घडल्या असतील तर अशा गोष्टी भविष्यात घडू नये यासाठी चर्चा करण्याचे अधिकार एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

मला असे वाटते की आपण सगळ्यांनी यावर पडदा टाकावा. तसेच भाजपच्या नेत्यांचा अपमान करण्याचा रवींद्र धंगेकर यांचा बोलण्याचा उद्देश नव्हता. रवींद्र धंगेकर यांनी त्यांची भूमिका एकनाथ शिंदे यांच्या समोर मांडली आहे. तसेच महायुतीला बाधक होईल असे काही आमच्याकडून होणार नाही.

शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे या विषयावरून कॅबिनेट बैठकीत कुठलाही वाद झाला नसल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले आहे.

## आठवणीतील गंगाराम गवाणकर



**देवेंद्र भुजबळ**
**माजी दूरदर्शन निर्माता तथा निवृत्त माहिती संचालक**
**नवी मुंबई.**
**9869484800**

थोर नाटककार, मिश्किल स्वभावाचे,आपल्या नाट्य क्षेत्रातील कामगिरीचा, महात्म्याच्या अजिबात गर्व न बाळगणारे, जेष्ठ स्नेही गंगाराम गवाणकर यांचे नुकतेच निधन झाले आणि इतरांना सतत हसवत ठेवणाऱ्या गंगाराम गवाणकर यांनी पहिल्यांदाच दुसऱ्यांच्या डोळ्यात आसू आणले.

१ जून १९३९ रोजी जमलेल्या गंगाराम गवाणकर यांचे प्राथमिक शिक्षण कोकणातील माडबन गावात झाले .पुढे त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांना सुरुवातीस चक्क स्मशानात रहावे लागले होते. असे ते भयानक दिवस. त्या नंतरचा संघर्ष त्यांनी त्यांच्या व्हाया वस्त्रहरण या आत्म चरित्रात अत्यंत चित्रमय शैलीत रेखाटला आहे.

त्यांचे हे आत्म चरित्र त्यांनी मला भेट दिले होते.ते वाचून संपल्यावर, आजतागायत मला याचे नेहमी आश्चर्य वाटत आले आहे की , इतक्या हाल अपेष्टेचे बालपण आणि तारुण्य वाट्याला येऊनही ते स्वतः आयुष्यभर हसऱ्या चेहऱ्याने कसे जगू शकत होते? इतकेच नाही तर इतरांच्या चेहऱ्यावर हसू आणणारी नाटके कसे लिहू शकले? त्यांच्या प्रत्यक्ष सहवास हा सुद्धा नेहमीच आनंददायी असा असे.

खरं म्हणजे, माझा आणि त्यांचा परिचय हा त्यांच्या नाटकामुळे नाही तर, त्यांच्या नोकरीमुळे झाला. बऱ्याच जणांना हे माहिती नसेल की ते मुंबई टेलिफोन्स मध्ये नोकरीला होते.( नंतर याच मुंबई टेलिफोन्सचे रूपांतर मुंबई महानगर टेलिफोन निगम अर्थात एमटीएनएल मध्ये झाले.) पण त्यांचा जनसंपर्क लक्षात घेऊन एमटीएनएल ची प्रसिद्धी विषयक अनेक कामे ते खुशीने करीत असत. तेव्हा मी मुंबई दूरदर्शन केंद्रात सहायक निमार्ता म्हणून काम करीत होतो. तिथेच आमची पहिली भेट झाली.

त्यावेळचे एमटीएनएल चे महाप्रबंधक सी व्ही परांजपे यांची मुलाखत दूरदर्शनवर व्हावी , यासाठी गंगाराम गवाणकर प्रयत्नशील होते. पण दूरदर्शनच्या कार्यक्रमांचे स्वरूप पाहता ते काही शक्य होत नव्हते. दरम्यान गणित आणि विज्ञान या विषयांशी वाकडे असलेल्या माझ्याकडे नेमक्या विज्ञान जगत या कार्यक्रमाच्या निर्मितीची जबाबदारी सोपविण्यात आली.

त्याकाळी लँड लाइन फोनला पर्याय नव्हता. आणि रॉग कॉल लागणे ही एक मोठीच डोकेदुखी होती. काही लोक त्यावेळी गमतीने, उपहासाने एमटीएनएल चा लॉंग फॉर्म मेरा टेलिफोन नहीं लगता असे करीत असत.

या सर्व पार्श्वभूमीवर मी विज्ञान जगत या कार्यक्रमात टेलिफोन कसे लागतात, त्यासाठी काय यंत्रणा असते, तिचे कामकाज कसे चालते आणि महत्वाचे म्हणजे रॉग नंबर का लागतात आणि ते तसे लागू नये या विषयावर कार्यक्रम करायचे ठरविले. मग त्यासाठी टेलिफोनच्या सर्व यंत्रणेचे चित्रीकरण प्रभादेवी येथील दूरध्वनी केंद्रात करण्यात आले. तसेच श्री परांजपे साहेबांची मुलाखतही घेतली. मला आठवते, त्याप्रमाणे लेखक श्री अशोक बेंडखळे यांचा आणि माझा परिचय त्याच दरम्यान झाला.

मी केलेला कार्यक्रम हा लोकांच्या दृष्टिकोनातून केलेला असला, तरी गंगाराम गवाणकर यांचे कार्यालयातील वजन त्यामुळे नक्कीच वाढले असणार. पण त्यांचा मोठेपणा असा की याची जाणीव त्यांनी सदैव ठेवली. त्यांचे माझ्याशी नेहमीच मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवले.

पुढे दूरदर्शन सोडून मी महाराष्ट्र शासनाच्या माहिती खात्यात नोकरीस लागलो. त्या भागात किंवा खुद्द मंत्रालयात जरी ते काही कामाने आले तरी मला भेटल्याशिवाय जात नसत.

एकदा मला त्यांच्यावर लेख लिहायचा होता. त्यासाठी त्यांना मिळालेल्या पुरस्कारांचे छायाचित्र हवे होते. त्यावेळी ते अत्यंत निरलसपणे म्हणाले, अहो ,इतक्या ट्रॉफीस मिळाल्या आहेत की,त्या ठेवायला घरात जागा नाही. म्हणून शेवटी गोणीत भरून त्या गावच्या घरात नेऊन ठेवल्या आहेत!

आठ नऊ वर्षांपूर्वी मंत्रालयात झालेली ती आमची शेवटची भेट ठरली. त्यानंतर मात्र कधी त्यांना भेटण्याचा योग आला नाही.आणि काही व्यक्ती अशा असतात की त्या आपल्या मनात सतत वास्तव्य करून असतात. त्यामुळे त्यांना भेटलेच पाहिजे,अशी कधी गरजही वाटत नाही, असे ते होते.

गंगाराम गवाणकर यांच्या नाट्य प्रवासाविषयी सांगायचे तर प्रेक्षकांना सतत हसवत ठेवणारे, निखळ मनोरंजन करणारे 'वस्त्रहरण' नाटक लिहून १९८० साली लिहून त्यांनी जगभरच्या मराठी जनात मालवणी बोली लोकप्रिय केली. या नाटकाचे तब्बल ५ हजार ४०० असे विक्रमी प्रयोग झाले.

वस्त्रहरण शिवाय त्यांनी वन रूम किचन, दोघी, वर परिक्षा, वर भेटू नका, उषःकाल होता होता, वात्रट मेले, पोलिस तपास चालू आहे, अरे बाप रे, महानायक, वडाची साल पिंपळाक, भोळा डांबिस, मेलो डोळो मारून गेलो, अशी लोकप्रिय नाटके, कादंबरी, चरित्र मिळून २० पुस्तके लिहिली.

या शिवाय आकाशवाणी, दूरदर्शन साठीही त्यांनी सातत्याने लेखन केले होते. ९६ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. १९९८ साली प्रदर्शित झालेल्या जागर या चित्रपटाचे संवाद लेखन त्यांनी केले होते. पण ते चित्रपट सृष्टीत कधी रमले नाहीत.

गंगाराम गवाणकर यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांपैकी दोन महत्वाचे पुरस्कार म्हणजे झी वाहिनीतर्फे देण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार आणि २०२३ साली मालिका, नाटक, चित्रपट लेखक संघटनेचा मानाचि पुरस्कार हे होत.

गेले काही काळ आजाराशी झुंज देत असलेल्या गंगाराम गवाणकर यांच्या दोन्ही मुलांनी आणि दोन्ही सुनांनी शेवटपर्यंत त्यांची मनापासून सेवा केली,याचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. तमाम नाट्य रसिक, गंगाराम गवाणकर यांचे चाहते, मित्रमंडळी यांच्यावतीने या चौघांचेही मनःपूर्वक आभार. गंगाराम गवाणकर यांना विनम्र अभिवादन.

■ ■ ■

## दिवाळी निमित्ताने डोंबिवलीत किल्ले दुर्गाडीची आकर्षक प्रतिकृती



स्वराज्याच्या आरमाराचा संदेश देणारी कलाकृती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** दिवाळीच्या शुभ पर्वावर डोंबिवली (पूर्व) येथील बाळ गोपाळ उत्सव मंडळ, मढवी शाळा यांच्या वतीने ऐतिहासिक किल्ले दुर्गाडीची देखणी प्रतिकृती साकारण्यात आली. या प्रतिकृतीच्या निर्मितीत मंडळातील मावळे साहिल मुंढे, प्रशांत मेस्त्री, सक्षम जाधव, विघ्नेश चव्हाण, सुशांत मुंढे, ओबेदुल्ला शेख, राहुल पांचाळ, अक्षय सावंत, गौरव साळवी, हितेश कटारे, हेरंब लांजवळ, कुणाल जाधव आदी सदस्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

सदर प्रतिकृतीमागील उद्दिष्ट केवळ कलात्मक नसून सामाजिक जाणिवेचे द्योतक आहे. मंडळाच्या मते, किल्ले दुर्गाडी हे स्वराज्याचे पहिले आरमार असले तरी आज ते शासनाच्या दुर्लक्षामुळे जतनाविना उभे आहे. याच मुद्द्याकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न मंडळाने या माध्यमातून केला.

किल्ल्यालगत असलेले उल्हास नदीचे पात्र हे ठाणे, मुंबई व वसईला जोडणारे असून, या खाडीतून जलवाहतूक सुरू केल्यास कल्याण-डोंबिवली परिसरातील सेंट्रल रेल्वेवरील ताण कमी होऊ शकतो. यामुळे वाहतूक व्यवस्थेला पर्यायी मार्ग उपलब्ध होऊन नागरिकांना दिलासा मिळू शकेल, असे मंडळाने नमूद केले आहे.

मंडळाचे कार्यकर्ते म्हणाले, किल्ले दुर्गाडी ही फक्त ऐतिहासिक वास्तू नसून महाराजांच्या शासनकारभारातील दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्या दूरदृष्टीचा वापर आजच्या काळात करून विकासाचा नवा अध्याय लिहिता येऊ शकतो.

दिवाळीच्या उत्साहात साकारलेली ही कलाकृती इतिहासाचा सन्मान आणि भविष्याचा विचार यांचे सुंदर मिश्रण ठरत असून, किल्ले दुर्गाडी पाहण्यास गर्दी होत आहे. स्थानिक नागरिकांकडून तिचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

# आरक्षणासाठी करावा लागेल एकजुटीने संघर्ष

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २८ :



आरक्षणाच्या मुद्द्यावरून सकल आदिवासी एकता महासंघाकडून जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. आरक्षणासाठी आदिवासींना एकजुटीने संघर्ष करावा लागेल, असा सूर सभेत उमटला. छाताडावर बसून आरक्षण टिकवणारच, असा निर्धार अनेकांनी बोलून दाखवला.

मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबीतून ओबीसीतून आरक्षण मिळण्यासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला. त्यानंतर अन्य समाजातर्फे एसटीचे आरक्षण लागू करण्याची मागणी झाली. मात्र आता सकल आदिवासी एकता महासंघातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना समाजाच्या आरक्षणासह अन्य मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मोर्चानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सभा झाली. सभेत आदिवासी समाजातील विविध नेत्यांनी मार्गदर्शन केले. प्रास्तविक बाबाराव साखरे यांनी केले. सभेला महासंघाचे सचिव विजय हळदे, वाशीमचे मारोती पारधी यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी संबोधित केले.

दिशाभूल करण्याचा प्रयत्न : हैदराबाद गॅझेटियरच्या माध्यमातून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, ही दिशाभूल अजिबात खपवून घेतली जाणार नाही, असे अमरावती जिल्ह्यातील मतीन भोसले म्हणाले. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या माध्यमातून आदिवासींसाठी विविध योजना राबवण्यात येतात. सुमारे दीड हजार कोटींचे पॅकेज असते. मात्र हा निधी हडप करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी सावध राहणे आवश्यक असून, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका-संघटित व्हा व संघर्ष करा, या त्रिसूत्रीने मार्गक्रमण करणे गरजेचे असल्याचेही भोसले म्हणाले. भोसले हे वंचितांच्या शिक्षणासाठी भरीव कार्य करीत आहेत. राज्य हे हैदराबाद गॅझेटियरनुसार चालत नसून राज्यघटनेनुसार चालते असे सभेत अन्य अतिथी म्हणाले. आदिवासींचे आरक्षण संपण्याचे षड्यंत्र असून, आम्ही कोणाचाही-कोणताही दबाव सहन करणार नाव, असेही त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

सकल आदिवासी एकता महासंघातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या. धनगर व बंजारा, वंजारी, वडार, गोपाल व इतर भटक्या जातींची आदिवासी जमातीत घुसखोरी करू नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या सर्व आमदारांची आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक नियमित घेण्यात यावी. अनुसूचित जमाती कायद्यामधील (जात पडताळणी कायदा २०००) सुधारणा तात्काळ करण्यात यावी. पडताळणी समित्यांना आधी दिलेल्या वैधता प्रमाणपत्राची पुर्नतपासणीचे अधिकार प्रदान करण्यात यावे. शासन निर्णय २५ फेब्रुवारी २०२२ मध्ये अनुसूचित जमातीचे बिंदू दोनवरून आठवर आल्याने आदिवासींवर अन्याय झाला असून, बिंदू नियमावलींमध्ये दुरूस्ती करण्यात यावी.

आदिवासी विद्यार्थ्यांना पंडीत दीनदयाल उपाध्याय योजना, तालुका व ग्रामीणला सुरू करण्यात यावी. शासकीय नोकर भरती वेळेस जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करून सन २०२३ सरळ सेवा पद भरतीमधील प्रतीक्षा यादीतील मूळ आदिवासी विद्यार्थ्यांना घ्यावे.

# ट्रॅक्टर ट्रॉलीला धडकून एकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २८ :

अंजनगाव-अकोट महामार्गावर लखाड गावाजवळ एका दुचाकीने रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.

मृताचे नाव लक्ष्मण हिरे असे आहे, तर त्यांचे भाऊ ज्ञानदेव हिरे गंभीर जखमी झाले आहेत. दोघेही अंजनगाव येथून त्यांच्या मूळ गावी लखाडकडे दुचाकीने जात होते. लखाड गावाजवळ रस्त्याच्या कडेला एक ट्रॅक्टर ट्रॉलीसह उभा होता. सायंकाळच्या अंधारात हा ट्रॅक्टर स्पष्टपणे दिसला नाही, त्यामुळे लक्ष्मण हिरे यांच्या दुचाकीची त्याला धडक बसली.

अपघातात लक्ष्मण हिरे दुचाकीवरून खाली पडले. त्यांच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ज्ञानदेव हिरे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतकाचे चिरंजीव अशोक लक्ष्मण हिरे यांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी २७ ऑक्टोबर रोजी ट्रॅक्टरमालक अमोल वानखडेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भारतीय दंड संहिता (भादंवि) आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांखाली हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक पोलिस करत आहेत.

# नशेत संतुलन सुटल्याने चारचाकीखाली तरुण ठार

■ महासागर प्रतिनिधी
बार्शीटाकळी, दि. २८ :



शहरातील बस स्टँडलगतच्या सूरज वाईन बारच्या समोर रविवारी रात्री एका अपघातात तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दारूच्या नशेत संतुलन सुटल्याने तो गाडीखाली दबला असून, संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अफसर खॉं रशीद खॉं (३३), रा. बार्शीटाकळी हा तरुण २६ ऑक्टोबर रोजी रात्री सूरज वाईन बार येथे मद्यसेवनासाठी गेला होता.

रात्री १०.१५ वाजता तो नशेच्या अवस्थेत बारच्या बाहेर येताना सीसीटीव्हीत दिसून आला. त्याच वेळी बारचे मालक संतोष शंकरराव काळदाते चारचाकीने घरी जाण्यासाठी बाहेर पडले होते. दारूच्या नशेत असलेल्या अफसर खॉं यांचा तोल गेल्याने ते वाहनाच्या डाव्या बाजूला कोसळले. वाहन चालकाचे हे लक्षात आले नाही आणि गाडी वळवताच ती थेट त्या तरुणावरून गेली. परिणामी, अफसर खॉं यांचा जागीच मृत्यू झाला. सीसीटीव्ही फुटेजवरून हा संपूर्ण प्रकार स्पष्टपणे दिसत आहे. तत्काळ पोलिसांची धाव माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सूरज वाईन बार समोरील जागेत मृतदेह आढळला. पंचनामा करून फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. तपासादरम्यान मृत व्यक्तीची ओळख अफसर खॉं रशीद खॉं अशी पटली.

पोलिसांनी चारचाकी वाहन तसेच चालक संतोष काळदाते यांना ताब्यात घेतले असून, चौकशी सुरू आहे. प्राथमिक तपासानुसार ही घटना निष्काळजीपणाने वाहन चालवल्यामुळे घडल्याचे समोर आले आहे.

# वादळी पावसाने घर कोसळून आई, मुलगा, बहिण अडकले ढिगाऱ्यात



■ महासागर प्रतिनिधी
जवळा, दि. २८ :

आर्णी तालुक्यात रविवारी दि. २६ ऑक्टोबरच्या पहाटे १ वाजताच्या सुमारास मध्यरात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे आर्णी तालुक्यातील शिरपूर येथे मोठी दुर्घटना घडली. या वादळी वाऱ्यामुळे घर पडून त्याखाली माई मुलगा व त्याची बहिण तिघे अडकले. मात्र गावकऱ्यांनी वेळीच धाव घेवून तत्परतेने त्यांना बाहेर काढले त्यामुळे दुर्दैवी घटना टळली.

या पावसामुळे वैशाली प्रदीप आडे यांचे घर कोसळून मोठे नुकसान झाले. घटनेच्या वेळी घरात झोपलेल्या भाग्यश्री राठोड, त्यांचा मुलगा विठ्ठल आणि बहिण वैशाली हे तिघेही मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकले. अचानक घर कोसळल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, गावकऱ्यांनी तत्परतेने मदतीसाठी धाव घेतली आणि एकत्रित प्रयत्नांनंतर ढिगाऱ्याखाली अडकलेल्या तिघांनाही सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. या घटनेत सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही, परंतु घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाचा जोर एवढा होता की शेजारील घरांनाही त्याचा फटका बसला आहे. दरम्यान, गावकऱ्यांच्या जागरूकतेमुळे मोठी दुर्घटना टळली, असे सर्वत्र कौतुक केले जात आहे. या घटनेनंतर नागरिकांनी शासनाकडे त्वरित पंचनामा करून आर्थिक मदतीची मागणी केली आहे. मुलगा व त्याची बहिण तिघे अडकले.

# विधी परीक्षेत अभ्यासक्रमाबाहेरचा पेपर

## ४०० विद्यार्थी प्रभावित

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :



अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षेत अभ्यासक्रमाबाहेरचा पेपर आल्याने सुमारे ४०० विद्यार्थी अडचणीत आले आहेत. विद्यापीठाने आपली चूक मान्य करत या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

विधी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्राचा 'कॉन्ट्रॅक्ट-टू' हा पेपर सोमवारी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात आला. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पाच जिल्ह्यांमधील नऊ केंद्रांवर ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेत यापूर्वी अनुत्तीर्ण झालेले सुमारे ४०० विद्यार्थी सहभागी झाले होते. पेपर सोडवताना, विचारलेले प्रश्न संबंधित विषयाचे नसून ते अभ्यासक्रमाबाहेरचे, 'सायबर लॉ' शी संबंधित असल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आले. यामुळे परीक्षेच्या पहिल्या तासातच सर्व केंद्रांवर गोंधळ निर्माण झाला.

परीक्षार्थींनी ही बाब लगेच केंद्रांवरील पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आणून दिली. पर्यवेक्षकांनी तातडीने विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधला. पडताळणीनंतर ही तक्रार खरी असल्याचे आढळल्याने विद्यापीठ प्रशासनाने आपली चूक स्वीकारली. परीक्षेची वेळ संपल्यानंतर काही स्थानिक विद्यार्थ्यांनी थेट विद्यापीठात जाऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर उच्चाधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीत आगामी १५ दिवसांनी ही फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला, असे डॉ. कोळी यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठातर्फे दरवर्षी साधारणतः ९ हजार परीक्षा घेतल्या जातात, ज्यात बाह्य यंत्रणांची मदत घेतली जाते.

मात्र, प्रत्येक वेळी अभ्यासक्रमाबाहेरचे प्रश्न विचारले जाणे किंवा दोन दिवसांनंतरचा पेपर चुकून आधीच घेतला जाणे, असे प्रकार वारंवार घडत असतात. मागील परीक्षेतही दोन पेपरबाबत अशीच चूक झाली होती. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने या प्रकारांकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा वारंवार होणारा गोंधळ टाळावा, अशी मागणी विद्यार्थी संघटनांकडून करण्यात आली आहे.

# अभिनंदन बँक इमारतीचे गुरुवारी लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवार, दि. 30 ऑक्टोबर रोजी अभिनंदन बँक इमारतीचे गुरुवारी लोकार्पण होणार आहे. सहकार क्षेत्रातील संस्था असलेल्या अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या स्वःमालकीच्या मुख्य कार्यालय इमारत अभिनंदन हाईट्सचा लोकार्पण सोहळा दि. 30 ऑक्टोबर रोजी श्री ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात होणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे त्यांच्यासह आमदार सुलभा खोडके, रवी राणा उपस्थित राहणार आहेत. बँकेचे अध्यक्ष ॲड. विजय बोथरा अध्यक्षस्थानी राहतील. या सोहळ्याला भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथ्था, पगारिया ग्रुपचे अध्यक्ष उज्ज्वल पगारिया उपस्थित राहतील.

# दोन दुचाकीच्या धडकेत निवृत्त मुख्याध्यापकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मारेगाव, दि. २८ :



बँकेतील काम आटोपून आपल्या घरी परत जात असताना मागून येणाऱ्या दुचाकीने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवार, 28 ऑक्टोबरला दुपारी 1.30 च्या दरम्यान मारेगाव वणी रस्त्यावर सेंट्रल बँकेसमोर घडली. यात मृत्यू झालेल्याचे नाव मुकिंदा पत्रुजी राजूरकर (वय 61, चोपण, मारेगाव) असे होते.

मुकिंदा राजूरकर हे तीन वर्षांपूर्वी मारेगाव येथील जिल्हा परिषद शाळेमधून मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले होते. उर्वरित आयुष्य ते आपल्या कुटुंबियांसोबत घालवत होते. मंगळवार, 28 ऑक्टोबरला ते त्यांच्या दुचाकीने बँकेमध्ये गेले होते. तेथील काम आटोपून परतत असताना अर्धसैनिक कॅन्टीन जवळील वळणावर त्यांच्या दुचाकीला मागून येणाऱ्या दुचाकीने जोरदार धडक दिली.

यात राजुरकर खाली पडले. त्यांच्या डोक्याला जबर मार लागला होता. काही नागरिकांनी त्यांना प्रथम मारेगाव ग्रामीण रुग्णालय व नंतर वणी येथील खाजगी दवाखान्यात हलविले. परंतु तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मारेगाव शहरातील काही जागा अत्यंत धोकादायक बनल्या आहेत. राज्य महामार्गालगत बँका, इतर कार्यालय आणि बार आहे. या ठिकाणी जाणाऱ्यांची संख्याही मोठी असते. तसेच भरधाव वाहने चालवणारेसुद्धा कमी नाहीत. या भरधाव वाहन चालवणाऱ्यांमुळे अनेकांना असाच हकनाक जीव गमवावा लागतो.


**Universal Sompo General Insurance**

Suraksha, Hamesha Aapke Saath

**Universal Sompo General Insurance Co. Ltd.**

**PUBLIC NOTICE**

**CLOSURE OF GOREGAON BRANCH OFFICE**

All our Customers, Constituents and Members of Public are here by informed that our Goregaon Branch office located at **Manadal Agriculture Office, Near Post Office, Karanja, Taluka - Goregaon, District-Godia, Maharashtra Pin Code - 441801** India would stand closed w.e.f closing business hours of Wednesday, 31st December, 2025 Additionally, for any queries, feel free to contact us at our toll-free number 1800 22 4030/1800 200 4030/1800 200 5142 or write to us on contactus@universalsompo.com We shall be most pleased to service you at all time

Head Administration



**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

**निर्देशात्मक सूचना**

परिशिष्ट

क्र. पी/एनजीपी/डब्ल्यूईएल/2016/06

दिनांक 27.10.2025

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात होमिओपॅथिक डॉक्टरांची नियुक्ती**

द.पू.म. रेल्वेच्या नागपूर विभागात होमिओपॅथिक डॉक्टरांच्या 01 (एक) (अनारक्षित) पदासाठी गुणवत्तेवर आधारित उमेदवारांच्या नियुक्तीसाठी ऑनलाइन मुलाखती **07.11.2025 (शुक्रवार)** रोजी **"गुगल मीट"** द्वारे घेतल्या जातील. यासाठी नोंदणी प्रक्रिया **06.11.2025** रोजी **सायंकाळी 06:00 वाजेपर्यंत** सुरू राहील. अधिक माहिती आणि इतर तपशील द.पू.म. रेल्वेच्या वेबसाइट **www.secr.indianrailways.gov.in** वर उपलब्ध आहेत. मार्ग खालीलप्रमाणे आहे.

**Recruitment->Recruitment->Nagpur Division->Engagement of Homeopathic Practitioner in Nagpur Division of SECR.**

विभागीय कार्मिक अधिकारी

कृते वरि. विभागीय कार्मिक अधिकारी

द.पू.म. रेल्वे, नागपूर

AAA/36/167

स्वच्छ भारत अभियान

एक कदम स्वच्छता की ओर



**मध्य रेल्वे**

सोलापूर विभाग

ई-निविदा सूचना क्रमांक: ०८-२०२५-जीएसयू-इलेक्ट-टीआरडी

सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहे. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील डीडी-एसयूआर विभागातील इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सिस्टमचे १२५ केव्ही ते २२५ केव्ही ट्रॅक्शन सिस्टममध्ये अपग्रेडेशन करणे जेणेकरून ३००० मेट्रिक टन लोडिंग लक्ष्य पूर्ण होईल - ओएचई सुधारणा काम. (पुनर्निमंत्रण) कामाची अंदाजे किंमत: रु. १३७,९४,८६,२६१.९५/- सर्वात कमी खर्च: रु. ७०,४७,४००.००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: २४ (चोवीस) महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: २१.११.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: २१.११.२०२५ दुपारी ३:३० वाजेनंतर. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून www.ireps.gov.in या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल.

सीपीएम (जीएसयू) सीआर, सोलापूर 67

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है



**कार्यालय**

**नगर पंचायत, भिवापूर**

**ता. भिवापूर, जिल्हा-नागपूर**

Email Id: bhiwapurnagarpanchayat@gmail.com | फोन: ०७१७६-२३२३०८

क्र.कावि/नपंभि/निव.वि./२०२५/९८५ | दिनांक :- २७/१०/२०२५

**जाहिर सुचना**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या तरतूदी नुसार नगर पंचायत भिवापूर सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची अंतिम सदस्य निश्चिती आरक्षण तयार करण्यात आलेली आहे. सदर अंतिम सदस्य निश्चिती आरक्षण नगर पंचायत भिवापूर कार्यालयाच्या दर्शनिस्थळी (नोटिस बोर्डावर) सर्वसाधारण नागरीकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच नगर पंचायत भिवापूर च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

करीता नागरीकांना नगर पंचायत भिवापूर कार्यालयातील नोटिस बोर्डावर व नगर पंचायत भिवापूर चे संकेतस्थळावर भेट देऊन अंतिम सदस्य निश्चिती आरक्षणाचा तपशिल पाहता येईल.

(मिलिंद साठोने)
मुख्याधिकारी
नगरपंचायत भिवापूर



**नगर पंचायत कार्यालय, बेसा-पिपळा**

जि. नागपूर (महा.)

Email : npbesapipla@gmail.com

नगर पंचायत बेसा-पिपळा जिल्हा नागपूर    दिनांक:२८/१०/२०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगर पंचायत बेसा-पिपळा जि.नागपूर यांच्या वतीने सामान्यप्रशासन विभागाअंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२०२५ ते २०२७-२८ या कालावधीकरिता खालील तक्त्यात नमूद कामाच्या दोन लिफाफा पद्धतीने ई निविदा/दरपत्रक पद्धतीने योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून /पुरवठाधारका कडून ई निविदा मागविण्यात येत आहे. ऑफलाईन निविदाचा विस्तृत नमुना नगर पंचायत बेसा-पिपळा सामान्य प्रशासन विभागात/खरेदी विभाग दिनांक:२८/१०/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**ई-निविदा भरण्या करिता माहिती**

| अ.क्र | कामाचे नाव | सुरक्षा ठेव रक्कम | कोऱ्या निविदेची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | विविध कार्यालयीन स्टेशनरी व साहित्याचा पुरवठा करणे. | १,००,०००/- | ५,०००/- | ३६ महीने |
| २ | नगर पंचायत बेसा-पिपळा क्षेत्रांतर्गत सन २०२५-२६ ते २०२७-२८ या वार्षिक तत्वावर विविध उद्यानांना लागणारे मशीन व साहित्याचा पुरवठा करणे. | २,००,०००/- | १०,०००/- | ३६ महीने |
| ३ | कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा येथील विविध विभागांतर्गत लागणाऱ्या विविध जनजागृती साहित्य व इतर उपक्रम यांचा पुरवठा करणेबाबत. | १,००,०००/- | ५०००/- | ३६ महीने |

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिद्धी | दिनांक: २८/१०/२०२५ ला सायं ०५.०० वा.पासून |
| ई निविदाचा विस्तृत नमुना व अर्ज | दिनांक : २९/१०/२०२५ ते ०५/११/२०२५ दु.५.०० वाजेपर्यंत |
| ई दाखील करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक: ०५/११/२०२५ सायं ०५.०० वा.पर्यंत |
| ई निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक: ०६/११/२०२५ स.११ .०० वा. (शक्य झाल्यास) |

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत बेसा-पिपळा



**महाराष्ट्र राज्य**

**महसूल व वन विभाग**

**उपजिल्हाधिकारी (जि.प.पं.स. व ग्रा.प.नि.) निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, आकाशवाणी चौक, नागपूर**

ई मेल -nagpurdycolvp@gmail.com

क्र.सहा.म.अ./ग्रापनि/डे-१३/सं.क्र. /कावि-५५१/२०२५ | दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०२५

**ई-निविदा सुचना क्रमांक ०३ /२०२५**

नागपूर जिल्हयातीलस्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परीषद, पंचायत समिती, नगर परीषद, नगर पालिका, नगर पंचायती, ग्राम पंचायत इत्यादी) यांचे सार्वत्रिक / पोट निवडणूकीच्या अनुषंगाने, व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इरत अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहीत नमुन्यातील निविदा मागविण्यात येत आहे. त्यासाठी अशा प्रकारचा अनुभव असणाऱ्या अभिकर्त्यांकडून व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इरत अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेचे कामकाज करून देण्यासाठी योग्य कंत्राटदाराकडून दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी १०.00 वाजेपासून ई-निविदा कार्यप्रणालीनुसार निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अंतिम दिनांक ०२/११/२०२५ रोजी सायंकाळी ५.00 वाजेपर्यंत सादर करता येईल. निविदा दिनांक ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी, जि.प.पं.स. व ग्रा.पं. निवडणूक विभाग, नागपूर यांचे कार्यालयात उघडण्यात येईल. कंत्राटदारांना काही अडचणी असल्यास दिनांक २९/१०/२०२५ रोजी सायंकाळी ०४.00 वाजता उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी, जि.प.पं.स. व ग्रा.पं. निवडणूक विभाग, नागपूर येथे **Pre-Bid Meeting** मध्ये सोडविण्यात येईल.

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी,
नागपूर

क्र. संमावज/नाग/५४९/२०२५



**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**

**E-TENDER NOTICE**

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e-tenders in B-1 form / appropriate form for the following works. These e-tenders can be purchased by experience licensed electrical contractor from Website **(https://Mahatenders.gov.in)**. The terms and conditions of e- tenders are available on above website. Purchase and submission of e-tenders can be done through internet.

| Name of the work | Project Cost in Rs. |
|---|---|
| Lighting arrangement at Gurunanakpura Garden under zone no.9, NMC | 7,56,508 |
| Lighting Arrangement at New Thaware Colony Garden under zone no.9, NMC | 7,54,009 |
| Replacement of New Emmergency Rescue Device, Fans and faulty Battery of KONE Lift at New Administrative Building Civil Office NMC, Nagpur (Third Call) | 3,14,932/- |


**Note : (1)** Tender Submission end date : **05-11-2025 (3.00 pm.)**
**(2)** Date of Opening of Tender (If Possible) : **06-11-2025 (3.00 pm.)**
**(3)** Rates are exclusive of G.S.T.

Advt No 600, PR,
Date: 28.10.2025

Executive Engineer (Electrical)
N.M.C., Nagpur

PRN/25/600

# जागतिक इंटरनेट दिन




जागतिक इंटरनेट दिन (International Internet Day) २९ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो.हा दिवस इंटरनेटच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या घटनेच्या स्मरणार्थ साजरा केला जात असतो. दि .२९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटचा पूर्वज असलेल्या अर्पानेट (ARPANET) द्वारे पहिला इलेक्ट्रॉनिक संदेश पाठवण्यात आला होता. 'अर्पानेट' (Advanced Research Projects Agency Network) हे अमेरिकेच्या संरक्षण खात्याच्या संशोधन प्रकल्पाचा भाग होते.

या प्रकल्पाचा उद्देश दूरवरच्या संगणकांना जोडून संदेशवहनाची गुप्त व्यवस्था निर्माण करणे हा होता. कॅलिफोर्निया विद्यापीठ, लॉस एंजेलिस (UCLA) आणि स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिट्यूट (SRI) यामधील संगणक सुरुवातीला जोडले गेले.चार्ली क्लिहने (Charley Kline) या संगणकप्रणाली निर्मात्याने UCLA मधून SRI येथील संगणकावर संदेश पाठवला. संदेश पोहोचला, ही घटना दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील एक मोठी क्रांती ठरली. याच घटनेच्या वर्धापन दिनानिमित्त 'जागतिक इंटरनेट दिन' साजरा केला जातो. पहिला आंतरराष्ट्रीय इंटरनेट दिवस २९ ऑक्टोबर २००५ रोजी साजरा करण्यात आला होता.

इंटरनेटमुळे जगाच्या माहिती आणि संवादामध्ये मोठे बदल घडले आहेत.या तंत्रज्ञानाने जग खूप जवळ आणले आहे. आज इंटरनेट मानवी जीवनातील एक अविभाज्य भाग बनलेला आहे. शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, मनोरंजन अशा बहुतेक सर्वच क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा वापर अनिवार्य झालेला आहे.

इंटरनेट म्हणजे जगभरातील लाखो संगणकांचे एक मोठे जाळेच आहे.जे एकमेकांमध्ये माहितीची देवाणघेवाण करते. मजकूर, चित्रे, व्हिडिओ आणि ऑडिओ स्वरूपात माहिती आणि डेटाचे हस्तांतरण करण्यास अनुमती देणारी एक जागतिक पायाभूत सुविधा म्हणजे इंटरनेट होय.

इंटरनेटमुळे ज्ञानाची मक्तेदारी संपून माहितीचा मोठा स्रोत सर्वांसाठी खुला झालेला आहे.यामुळे या प्रणालीला खरीखुरी लोकशाही प्रणाली देखील म्हटले जाते. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट सेवा उपलब्ध झाली. सध्या 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' (IoT) आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार इंटरनेटच आहे.

जगातील बहुतांश लोकसंख्या आज इंटरनेटचा वापर करीत आहे. इंटरनेट दिन हा इंटरनेटचे महत्त्व सर्वदूर पोहोचविण्यासाठी सजरा केला जातो,याशिवाय इंटरनेटच्या इतिहासाची माहिती देणे आणि त्याबद्दलची जागृती वृद्धिंगत करणे. या दिवशी अनेक ठिकाणी इंटरनेटचे महत्त्व, फायदे आणि आव्हाने यावर चर्चासत्र आयोजित केली जातात.

या चर्चासत्रामध्ये सायबर सुरक्षा (Cyber Security) आणि जबाबदार इंटरनेट वापराविषयी माहिती दिली जाते. इंटरनेटमुळे माहिती तंत्रज्ञान (IT) आणि डिजिटल अर्थव्यवस्था (Digital Economy) या क्षेत्रात मोठी प्रगती झालेली आहे. इंटरनेटने वेळेची आणि अंतराची बंधने पूर्णपणे तोडून जगाचे एका वैश्विक गावामध्ये रूपांतर केलेले आहे.



प्रा.अरुण बाबाराव बुंदेले
महानुभाव ग्रंथोत्तेजक साहित्य अलंकार पुरस्कार प्राप्त साहित्यिक, अमरावती.
८०८७७४८६०९

इंटरनेटने मानवाला नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. २९ ऑक्टोबर हा दिवस इंटरनेटने मानवाला ज्या ज्या महान संधी उपलब्ध करून दिलेल्या आहेत या इंटरनेटच्या महान देणगीचा उत्सव साजरा करण्याचा हा दिवस आहे.

इंटरनेट आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत, पण त्या बऱ्याचदा एकमेकांच्या पूरक म्हणून काम करतात. इंटरनेट हे माहितीचे जाळे (A Network of Information) आहे असून जगभरातील संगणक, सर्व्हर आणि उपकरणांना जोडणारे ते एक विशाल नेटवर्क आहे. इंटरनेटचा उपयोग माहिती साठवणे, प्रसारित करणे आणि ॲक्सेस करण्यासाठी होतो तसेच लोकांना संवाद साधण्यासाठी आणि संसाधने शेअर करण्यासाठी माध्यम (Medium) पुरवते. उदा .: वेबपेजेस पाहणे, ईमेल पाठवणे, ऑनलाइन शॉपिंग करणे, सोशल मीडियावर बोलणे.

तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स (Artificial Intelligence - AI) एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. एआय हा तंत्रज्ञानाचा एक भाग (A Branch of Technology) आहे, ज्यामध्ये संगणक प्रणाली मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करतात. एआय प्रणाली शिकू शकतात, समस्या सोडवू शकतात, निर्णय घेऊ शकतात, भाषा समजू शकतात आणि डेटाचे विश्लेषण करू शकतात. उदाहरणः व्हर्च्युअल असिस्टंट्स (उदा. सिरी, अलेक्सा), शिफारस प्रणाली (Netflix, Amazon), चेहऱ्याची ओळख (Facial Recognition), Chat GPT सारखे भाषिक मॉडेल.

एआयला चालवण्यासाठी आणि डेटा मिळवण्यासाठी इंटरनेट हे प्लॅटफॉर्म पुरवते. इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा वापर करून एआय अनेक सेवा सुधारते आणि स्वयंचलित करते. इंटरनेट हे माहितीचा रस्ता आहे, तर एआय हा त्या रस्त्यावर चालणारा बुद्धिमान चालक आहे. अकहे इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा उपयोग करून जास्त उपयुक्त आणि प्रभावी बनते.

कोणत्याही गोष्टीचा अतिरिक्त वापर हा घातक ठरतोच. इंटरनेटच्या बाबतीत सुद्धा आज तेच घडत आहे. इंटरनेटच्या अतिवापरामुळे मानवाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडत चालले आहे. ऑनलाइन गेमिंग आणि सोशल मीडियाच्या व्यसनामुळे तरुण पिढी अभ्यासापासून दूर जात आहे.

इंटरनेटमुळे लोकांमध्ये प्रत्यक्ष संवाद कमी होऊन एकटेपणा वाढत आहे. इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या अयोग्य माहितीमुळे समाजात गैरसमज आणि द्वेष पसरतो.ऑनलाइन फसवणूकीसारख्या घटनांमुळे लोकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. सोशल मीडियामुळे अनेक लोक खोट्या दिखाव्यात आणि अनावश्यक स्पर्धेत अडकले जात आहेत.

इंटरनेटच्या अतिवापराने एकाग्रता कमी होऊन स्मरणशक्तीवर विपरित परिणाम होत आहे. खाजगी माहिती आणि डेटा चोरीला जाण्याची भीती नेहमीच असते,ज्यामुळे मोठे नुकसान होऊ शकते. इंटरनेटमुळे अनेक लोक कामाच्या ठिकाणी किंवा कुटुंबासोबत असतानाही मोबाइलमध्ये व्यस्त राहतात, ज्यामुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. इंटरनेटमुळे तंत्रज्ञानावर जास्त अवलंबित्व वाढले आहे, ज्यामुळे माणसाची स्वतःची विचार करण्याची क्षमता आणि समस्या सोडवण्याची सवय कमी होत आहे.

इंटरनेट माहितीचा अमूल्य स्रोत आहे,ज्यामुळे ज्ञान मिळविणे खूप सोपे झाले आहे. इंटरनेट जगाला जोडणारे महत्त्वपूर्ण साधन झाले आहे, ज्यामुळे दळणवळण (Communication) जलद आणि खूप सोपे झाले आहे.

इंटरनेटमुळे ऑनलाईन शिक्षण सुरू झाले आहे. Online Education मुळे घरापासून दूर न जाता शिक्षण घेणे शक्य झाले आहे. इंटरनेटमुळे घरबसल्या खरेदी करणे (Online Shopping) आणि बँकांची कामे करणे शक्य झाले आहे.

इंटरनेट मनोरंजन आणि माहितीचा खजिना आहे (उदा. चित्रपट, गाणी, बातम्या व इतर).

व्यवसायासाठी (Business) इंटरनेट नवीन संधी आणि ग्राहक मिळवून देणारे ठरले आहे. इंटरनेटच्या मदतीने जगात कोठेही असलेल्या लोकांशी व्हिडिओ कॉलद्वारे बोलता येते. सरकारी योजना आणि आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन उपलब्ध झाल्यामुळे लोकांना सुविधा मिळाली आहे.

आरोग्यविषयक माहिती आणि डॉक्टरांचा ऑनलाईन सल्ला सुद्धा घेता येतो.संकटाच्या वेळी लोकांना एकत्र आणण्यास आणि मदतीचे जाळे विणण्यास इंटरनेट फार मोठी मदत करीत आहे.अशा प्रकारचा इंटरनेटचा सदुपयोग करून इंटरनेट दिन साजरा करू या. इंटरनेट दिनाच्या सर्व इंटरनेट युजर्सना हार्दिक शुभेच्छा॥

# लॉर्ड मॅकॉलेची आधुनिक शिक्षणपद्धती

लॉर्ड मॅकॉले यांचा जन्म २५ ऑक्टोबर १८०० रोजी इंग्लंडमधील लेस्टरशायर या ठिकाणी झाला. ते इंग्रजी भाषेचे अत्यंत विद्वान, समर्थक आणि यशस्वी धोरणकर्ते होते. ब्रिटिश सरकारने चार्टर ॲक्ट १८३३ नुसार भारतासाठी पहिला कायदा आयोग स्थापन केला, ज्याचे अध्यक्ष लॉर्ड मॅकॉले होते. ते १० जून १८३४ रोजी भारतात आले.

**मनुस्मृती विधानाचा अंत**

६ ऑक्टोबर १८६० रोजी लॉर्ड मॅकॉले यांनी तयार केलेली भारतीय दंड संहिता (Indian Penal Code – IPC) लागू झाली. या कायद्यामुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे सर्व कायद्याच्या दृष्टीने समान झाले.

मनुस्मृतीतील वर्णभेदावर आधारित अमानवी कायदा संपुष्टात आला. म्हणजेच, ६ ऑक्टोबर १८६० हा दिवस मनुस्मृती विधानाच्या दफनाचा दिवस ठरला.

**प्राचीन गुरुकुल शिक्षणपद्धती**

**१. पाठ्यक्रम**

क) ब्राह्मणांसाठी शास्त्र - वेद, पुराण, उपनिषद, रामायण, महाभारत, पूजा-पाठ, कर्मकांड, तंत्र-मंत्र, ज्योतिष, संस्कृत साहित्य, व्रत - तिथी, तीर्थयात्रा, देवदेवतांच्या कथा इत्यादी.

ख) क्षत्रियांसाठी शस्त्र - धनुष्यबाण, तलवार, भाला, गदा, मल्लयुद्ध यांचे प्रशिक्षण.

**२. शिक्षणाचे माध्यम**

फक्त संस्कृत भाषा वापरली जात असे.

**३. शिक्षक**

शिक्षक फक्त ब्राह्मण पुरुष असत.

**४. शाळेतील पोशाख**


गुरुकुलातील सर्व विद्यार्थ्यांना धोतर-कुरता घालणे बंधनकारक होते. डोक्यावर केस ठेवण्यास मनाई होती.

**५. विद्यार्थी**

गुरुकुलात शिकण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना होता, नंतर क्षत्रियांनाही परवानगी देण्यात आली.

प्रवेशापूर्वी उपनयन संस्कार आवश्यक होता.

गुरुकुल शिक्षणात तर्काला जागा नव्हती. प्रश्न विचारणाऱ्याला नास्तिक ठरवून बाहेर काढले जात असे.




**लॉर्ड मॅकॉलेची शिक्षणपद्धती**

ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी स्थापन केलेल्या सार्वजनिक शिक्षण समितीचे अध्यक्ष म्हणून लॉर्ड मॅकॉले यांनी ७ मार्च १८३५ रोजी ब्रिटिश सरकारकडून मंजूर आधुनिक शिक्षणपद्धतीची पायाभरणी केली.

**१. पाठ्यक्रम**

या शिक्षणपद्धतीत इंग्रजी व अनुवादित साहित्य, इतिहास, कला, भूगोल, भाषाविज्ञान, विज्ञान, वैद्यक, व्यवस्थापन आणि इतर आधुनिक विषयांचा समावेश होता.



**२. शिक्षणाचे माध्यम**

इंग्रजी व प्रांतिक भाषा शिक्षणाचे माध्यम ठेवण्यात आल्या.

**३. शिक्षक**

कोणत्याही जात - धर्माची व्यक्ती विषयतज्ज्ञ असेल तर ती शिक्षक होऊ शकत होती.

**४. विद्यार्थी**

या शिक्षणपद्धतीत सर्व जाती, धर्म आणि वर्णातील मुले शिक्षण घेऊ शकत होती. जात किंवा धर्माच्या नावाखाली बंदी नव्हती. तरीही सामाजिक भीती आणि आर्थिक अडचणींमुळे बहुजन समाजातील बहुसंख्य लोक शिकू शकले नाहीत.

**५. शाळेचा पोशाख**

विद्यार्थ्यांसाठी हाफ पॅंट, फुल पॅंट, शर्ट वगैरे पोशाख प्रचलित झाला.

**ब्राह्मण एकाधिकाराचा अंत**

लॉर्ड मॅकॉले हे भारतातील बहुजन समाजासाठी एका देवदूतासारखे ठरले. ज्यांना हजारो वर्षे शिक्षणाचा अधिकार नव्हता, त्यांच्यासाठी त्यांनी शिक्षणाचे दरवाजे खुले केले.

त्यांनी शिक्षणावरचा पुरोहित वर्गाचा एकाधिकार संपवला आणि सर्वांना समानतेने शिकण्याचा अधिकार दिला. त्यामुळे मागास, दलित आणि आदिवासी समाजाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला.

**बहुजन महापुरुषांचा उदय**

लॉर्ड मॅकॉले यांच्या शिक्षणपद्धतीमुळेच ज्योतिबा फुले, शाहू महाराज, पेरियार रामास्वामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारखे महान समाजसुधारक उदयास आले. यांनी भारताचे नवे भविष्य घडवले.

**आधुनिक शिक्षणाची पायाभरणी**

काही लोकांच्या मते मॅकॉले यांची शिक्षणपद्धती फक्त ह्बाबूह्व तयार करण्यासाठी होती, पण वस्तुस्थिती अशी आहे की प्राचीन गुरुकुल शिक्षणाने तर तेही शक्य नव्हते. मुघल काळात बाबू होण्यासाठी फारसी शिकावी लागायची, तर ब्रिटिश काळात इंग्रजी. लॉर्ड मॅकॉले यांची शिक्षणपद्धती जशी असेल तशी, पण आजही शाळांमध्ये त्याच शिक्षणपद्धतीचा सुधारित प्रकार शिकवला जातो.

**भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात योगदान**

लॉर्ड मॅकॉले यांच्या आधुनिक शिक्षणपद्धतीचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठा वाटा होता. जनतेला वाचन - लेखन आणि देश - विदेशातील ज्ञान मिळाल्यामुळे राष्ट्रीय जाणीवा वाढल्या. अनेक भाषांतील भारतात इंग्रजी ही संवादाची समान भाषा बनली. इंग्रजीशिवाय भारतीय संविधान लिहिणेही शक्य झाले नसते आणि कदाचित स्वातंत्र्यही मिळाले नसते.

■ ■ ■

# ए. आय. गुन्हेगारी वाढते आहे!

डिजिटल युगात 'ए. आय.' अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेने मोठ्या प्रमाणात क्रांती घडवून आणली आहे ज्यामुळे आज घंटोका काम मिनिटोमें आणि मिनिटोंका काम सेंकंदोमे होऊ लागले आहे. आज अनेक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्रासपणे केला जात आहे.

वित्त, आरोग्य, शेती, बांधकाम, उद्योग, शिक्षण आदी माध्यमांत कृत्रिम बुद्धिमत्तेने शिरकाव केला आहे. प्रत्येकाच्या 'मोबाईल'मध्ये 'डाउनलोड' केलेले जवळपास सर्वच 'अँप्स' कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना दिसून येतात सामाजिक माध्यमांवर सुद्धा कृत्रिम बुद्धिमतेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. मोबाईलवर एखादी 'रील' आपण संपूर्ण पाहिली की त्यापुढच्या रिल्स सुद्धा त्याच विषयाच्या संदर्भातील माहिती देणाऱ्या आपल्या 'मोबाईल'वर येऊ लागतात. यामागे सुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेचाच हात असतो.

भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढला, तर जसा 'डिजिटल' युगाचा कायापालट होईल तसे 'डिजिटल' गुन्हेगारीहीचेही प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढेल अशी शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली होती. आज ते सत्यात उतरताना दिसत आहे. याच कृत्रिम बुद्धिमत्तेने हरियाणातील एका १९ वर्षीय तरुणाचा जीव घेतल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले.

महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या राहुल भारती नावाच्या तरुणाचा मोबाईल 'हॅक' करण्यात आला आणि लगेचच त्याच्या व्हाट्सपवर त्याचे आणि त्याच्या तीन बहिणींचे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून मॉर्फ केलेले नग्न फोटो आणि व्हिडीओज येऊ लागले. हे फोटो आणि व्हिडीओज सामाजिक संकेतस्थळांवर प्रसारित न करण्यासाठी त्याच्याकडे पैशांची मागणी केली जाऊ लागली, ज्यामुळे तो प्रचंड तणावात गेला.

या तणावाखालीच त्याने आत्महत्या करून आपले जीवन संपवले. राहुलच्या व्हाट्सॲप चॅटच्या आधारे राहुलला ब्लॅकमेल करणाऱ्या तिघांना अटक केली असून त्यामध्ये त्याचा एक मित्रसुद्धा सहभागी झाला असल्याचे उघड झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एखाद्याचा चेहरा 'मॉर्फ' केला जातो आणि 'डिपफेक'द्वारे व्हिडीओ बनवले जातात.

अशा छायाचित्रांचा आणि व्हिडीओजचा गुन्हेगारांकडून ब्लॅकमेलिंगसाठी किंवा एखाद्याला बदनाम करण्यासाठी वापर केला जात असल्याची प्रकरणे मागील काही महिन्यांत मोठ्या प्रमाणात घडली आहेत. रश्मीका मंदाना, अक्षय कुमार, कुमार सानू यांसारखे कलाकारही यातून सुटलेले नाहीत.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एखाद्याचा चेहरा तर बदलला जातोच याशिवाय खोटा आवाज तयार करून ब्लॅकमेलिंग केले जाते, खोटी सही तयार करून बँक खाते रिकामे केले जाते, चोऱ्या केल्या जातात, फसवणूक केली जाते.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

'आमचा अँप डाउनलोड करा आणि तुमच्या मोबाईलमधून कोणतेही दोन चेहरे निवडून त्यांचा एकमेकांचे चुंबन घेताना किंवा आलिंगन देताना व्हिडीओ तयार करा!' अशा प्रकारची जाहिरात आज सामाजिक संकेतस्थळांवर खुलेआम केली जात आहे.

अशा प्रकारच्या व्हिडीओला सत्य मानून एखाद्याच्या सुखी संसारात विष कालवले जाऊ शकते, एखाद्याचे आयुष्य उध्वस्त होऊ शकते. राहुल भरतीचा जीव गेला तसा अन्य कुणाचा जाऊ नये यासाठी अशाप्रकारच्या छायाचित्रांवर किंवा व्हिडीओजवर कोणीही सहज विश्वास ठेवू नये, त्यामागील सत्यता पडताळावी, जाणकारांचे आणि आवश्यक तिथे पोलिसांचे साहाय्य घ्यावे.

सरकारने सुद्धा अशा प्रकारची छायाचित्रे आणि व्हिडीओ बनवणाऱ्या अँप्सवर निर्बंध आणायला हवेत. भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढला मात्र त्याचा वापर करण्याबाबत नैतिक धोरण आखले गेलेले नाही, त्याच्या गैरवापराविषयी वेगळे कठोर कायदे करण्यात आलेले नाहीत ज्यांची आज नितांत आवश्यकता आहे.

# खुर्चीचा शोध

प्रदीप निफाडकर
९९२२१२७४९२

ह्या खुर्चीचा शोध कोणी लावला असेल बरे? नेमका माणूस सांगता येणे कठीण आहे. त्यातून इजिप्तशियन आणि ग्रीक लोकांमध्ये भांडणे आहेत. दोघेही म्हणतात आमच्या पूर्वजांनीच लावला. इजिप्तशियन लोकांचे म्हणणे आहे की इसवीसन पूर्व २६८० काळातील थडग्यांमध्ये खुर्ची सापडली आहे.

खरे खोटे देव जाणे. पण एक खरे की जेव्हा माणसाला दगडावर बसणे हा कॅलरी वाचवण्याचा एक चांगला मार्ग आहे आणि तो सतत उभे राहण्यापेक्षा जास्त आरामदायी आहे, हे कळले तेव्हा तो शोध लागला. मग दगडाचीच खुर्ची झाली, नंतर लाकडाची मग स्टीलची,कापडाची वगैरे. पण आज तिच्यासाठी भांडणे आहेत आणि तिच्यासाठी काय काय होते ते मी तुम्हाला कशाला सांगू तुम्ही रोज बघता. तो विषय आपला नाही आपण शायरीचे चाहते. तेव्हा खुर्चीवरचे शेर ऐकू.

काल प्रेमावरचे शेर ऐकविताना इकबाल मतीनचा शेर राहिला. राहिला कुठला मी मुद्दामून ठेवला. कारण तो तुम्ही टेबलाच्यावेळी ऐकला होता, 'ये मेज ये कुर्सी ये किताबें ये खुला-पन' आता नवे शेर ऐका. फरहत एहसास स्वतःच्या दुःखाला धुळीची उपमा देतात –

*कुर्सी-ए-दिल पे तिरे जाते ही दर्द आ बैठे*
*जैसे आईना-ए-बे-कार पे गर्द आ बैठे*

तुझ्या हृदयाच्या खुर्चीवर (हृदयसिंहासनावर) जाऊन मी बसलो तोच दुःख येऊन बसले. जसे एखाद्या बेकार आरशावर धूळ येऊन बसावी. बिचारे दिलावर फिगार आपल्या प्रेयसीला काय म्हणाले आणि तिने काय उत्तर दिले ऐका –

*मैं ने कहा कि है मुझे कुर्सी की आरज़ू*
*उस ने कहा कि आयत-ए-कुर्सी पढ़ा करो*

मी तिला म्हणालो, मला (तुझ्या हृदयाच्या ) खुर्चीचं इच्छा आहे. तर ती म्हणे, 'कुरआनमधील खुर्चीचा श्लोक वाचा. आता तिला कोण समजवणार की कुरआनमध्ये जो तिसऱ्या अध्यायात श्लोक येतो तो संकट आले तरच वाचला जातो. दिलावर तर इथे इच्छा व्यक्त करत होते. हेच दिलावर एके ठिकाणी गंमतीने म्हणतात की लैला-मजनू ह्यांच्या घरच्यांचे भांडण त्यांच्या प्रेमाबद्दल नव्हते. कशाबद्दल होते ते ऐका –

*एक रिवायत ये भी है झगड़े का बाइस था जहेज़*
*हज़रत-ए-लैला के घर में कोई कुर्सी थी न मेज़*

एक परंपरा हे सांगते की लैला-मजनू ह्यांच्या भांडणाला निमित्त खिम्याचे होते. श्रीमती लैला साहिबांच्या घरी ना टेबल होते ना खुर्ची होती. त्यावरून त्यांचे बिनसले. एकूण काय तर खुर्ची कुठली ही असो ती भांडणे लावतेच. हीच आपल्या काळाची तऱ्हा आहे. म्हणून जफर सहबाई म्हणाले होते –

*अपने इस अहद का इंसाफ़ है ताक़त का ग़ुलाम*
*आँच भी कुर्सी-नशीं पर नहीं आने देता*

आपल्या ह्या काळाची ही गंमत आहे. की इथे ज्याची ताकद आहे त्यालाच न्याय मिळतो. कारण न्याय ताकदीचा गुलाम आहे. खुर्चीवर जो बसला आहे त्याला जरा सुद्धा चटका बसत नाही.

■ ■ ■

# संस्काराचे महत्त्व

**वाचक लिहितात**

मुले सांभाळत नसल्याने पुण्यातील २२४ जेष्ठ नागरिकांनी पोटगी साठी प्रशासनाचे दार ठोकले आहे. ही समस्या फक्त पुण्याची नसून देशभरात अशा अनेक घटना रोज घडत आहेत. काही समोर येतात काही येत नाही. अपत्याच्या जन्मापासून निर्माण झालेल्या या नात्यातील भावनिक वीण दिवसेंदिवस कमकुवत होत चालली आहे.

याचे कारण म्हणजे मनो वेगाने स्वीकारलेल्या पाश्चात्य विकृतीचा हा परिपाक भारतीयांना एकमेकांपासून तोडत आला आहे. भारतीय संस्कृतीचा पाया म्हणजे संस्कार आणि त्या संस्काराचा केंद्रबिंदू म्हणजे ईश्वर भक्ती 'मातृदेवो भव, पितृ देवो भव' ही ओळ ईश्वर कोणात आहे हे सांगतो.

ही शिकवण भारतीय समाजाच्या भावनात्मक आणि नैतिक जीवनाची दिशा ठरवणारी आहे. १९ -२० च्या शतकात इंग्रजी शिक्षण, औद्योगिक क्रांती आणि पाश्चात्त्य विचारसरणी भारतात आली त्यानंतरच कर्तव्य केंद्रबिंदू असलेली भारतीय संस्कृती व्यक्तिवाद या पाश्चात्त्य विकृतीमुळे लयास जाऊ लागली त्यामुळेच भारतीय समाजाचे नैतिक संतुलन ढळत गेले आहे.

आता पालक वृद्ध झाले की त्यांना वृद्धाश्रमात ठेवणे ही नवीन सामान्य गोष्ट झाली आहे. नागरिक आता आपल्या अधिकाराविषयी जागरूक आहे,कायद्याचाही त्यांना पाठिंबा आहे,त्यांना पोटगी मिळेल ही पण समाजातून बेपत्ता झालेली आपुलकी, घरोबा, स्नेह, बांधिलकी कोण आणि कुठे शोधणार!

भारताचा आत्मा संस्कार आहे धर्म या संस्काराचे पोषण करतो. मुलांना बालपणापासून धर्मग्रंथातील ज्ञान आत्मसात करायला शिकवले गेले तर ते पालकांचा अनादर करूच शकणार नाही. आजची पिढीही धर्मशास्त्रापासून पूर्णतः दुरावली आहे. परिणामी पालकांविषयी आदर कर्तव्य न राहता पर्याय झाला आहे.

स्वातंत्र्य म्हणजे पालकांपासून दूर करणे नव्हे तर त्यांच्या प्रति उत्तरदायित्व ही शिकवण केवळ हिंदू धर्मच देतो. भारतीय समाजाचे बळ असणारी कुटुंब व्यवस्था हे रक्ताच्या नात्याचा एकत्र सहवास नसून परस्पर कर्तव्याची जाण निर्माण करणारे केंद्र आहे. माझे जीवन माझे निर्णय या आधुनिक घोषणेमुळे आपलेपणाचा बंध कमकुवत झाला आहे. त्यामुळे वृद्धांची काळजी घेण्याचे उत्तरदायित्व प्रशासनावर आले आहे त्यामुळे समाजाचा नैतिक पाया ढळलेला आहे.

आज वृद्ध सेवा नाकारणारे उद्या वृद्ध होणार आहे याचे भान ठेवून आजच्या पालकांनी मुलांना चांगले शाळेत पाठवण्यापूर्वी संस्कार करण्यावर भर दिला पाहिजे.

जेव्हा धर्म मनात उतरतो तेव्हा कर्तव्यभाव स्वाभाविक बनतो. वृद्धांची सेवा हे कायदेशीर बंधन न राहता तो व्यक्तिमत्त्व आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी पोषक आहे, हे समाजात रूजवण्यासाठी धर्माधिष्ठित मूल्यशिक्षणाचे पुनरुज्जीवन म्हणजे धर्मशिक्षण देण्याची सोय करणे, हाच उपाय आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.

# फळांवर लावलेल्या स्टिकर्सचा अर्थ काय?



फळे खरेदी करताना आपण अनेकदा असं पाहिलं असेल की, काही फळांवर स्टिकर लावलेले असतात. फळे खरेदी करताना आपण फक्त फळं चांगली आहेत का? चांगली टिकणारी आहेत का? हे पाहतो. पण त्या फळावर असलेल्या स्टिकरकडे मात्र आपण दुर्लक्ष करतो. त्यावर काहीतरी कोडही असतो. पण हे छोटे स्टिकर्स फक्त ब्रँडिंग किंवा सजावटीसाठी नसतात. तर या स्टिकर्समध्ये PLU एक विशेष कोड असतो.

हा कोड ग्राहकांना फळांच्या लागवडीच्या पद्धतीबद्दल माहिती देतो. ज्याचा थेट तुमच्या आरोग्याशी असतो. एवढंच नाही तर हे कोड तुम्हाला फळांची गुणवत्ता ओळखण्यास मदत करू शकतात. उच्च दर्जाचे फळ खाणे हे चांगल्या आरोग्याशी जोडलेले असते. त्यामुळे त्या स्टिकरकडे दुर्लक्ष न करता त्याच्या मदतीने आपण चांगली फळे ओळखू शकतो. त्यामुळे फळांवरील कोडचा किंवा त्या स्टिकरचा नेमका अर्थ काय आहे ते जाणून घेऊया.

PLU कोड सहसा ४ किंवा ५ अंकांचा असत. यातील पहिला अंक कोणत्या प्रकारचे फळ पिकवले जाते हे ठरवतो. हा कोड वाचून, तुम्ही सांगू शकता की फळ सेंद्रिय आहे, रासायनिक प्रक्रिया केलेले आहे की अनुवांशिकरित्या सुधारित आहे.

जर फळावरील स्टिकरवर ९ ने सुरू होणारा ५ अंकी क्रमांक असेल, तर याचा अर्थ असा की फळ पूर्णपणे सेंद्रिय आहे. ते कोणत्याही रासायनिक कीटकनाशके, खते किंवा अनुवांशिक बदलाशिवाय नैसर्गिकरित्या पिकवले गेले आहे.

जर स्टिकरवर फक्त ४ अंकी संख्या असेल, तर याचा अर्थ फळावर कीटकनाशके आणि रसायने वापरली गेली आहेत. ही फळे अनेकदा स्वस्त असतात परंतु कमी आरोग्यदायी असतात कारण ती रसायनांनी पिकवलेली असतात.

तुम्हाला फळांवरील हा कोडबद्दल समजलं असेलच. तेव्हा आता फळे खरेदी करताना हे लक्षात ठेवा. शक्य असेल तेव्हा, ५ अंकी क्रमांक ९ ने सुरू होत असेल तर सेंद्रिय फळे खरेदी करा.

फळ सेंद्रिय असो वा प्रक्रिया केलेले , कोणतेही फळ खाताना फक्त ते स्वच्छ धुवून खा. त्यावरील बॅक्टेरिया निघून जाणे महत्त्वाचे आहे. तसेच, हंगामी फळे खरेदी करण्याचा प्रयत्न करा, कारण ती अधिक ताजी असतात.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### भावांतर योजना

बाजार व हमी भावातील
फरक बळीला द्यावा
कृषी माल खरेदीचा
हेका शासनाने सोडून द्यावा..

व्यावसायिक पात्रतेचा
नौकरशाहीत असतो अभाव
म्हणून शासकीय योजना
तोट्यात येतात ना राव ..

मध्यस्थ व लाचखोर
होताहेत मालामाल
शेवटी बळीराजाच
राहतो ना कंगाल..!

मध्यस्थ व लाचखोर घेती
करुन लाखोची कमाई
कुंपणच शेत खाते
म्हणती ते खोटं नाई ..!

## अरिहंत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट (टीएव्हीआर) प्रक्रिया संपन्न

**नागपूर, २८ ऑक्टोबर :** अरिहंत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलने आपली पहिली ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट (टीएव्हीआर) यशस्वीरीत्या पार पाडून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. ही एक अत्याधुनिक, किमान आक्रमक कार्डियाक प्रक्रिया आहे, जी ओपन-हार्ट सर्जरीसाठी उच्च धोका असलेल्या रुग्णांसाठी उपचाराचे नवीन पर्याय उपलब्ध करून देते. ३ही गुंतागुंतीची प्रक्रिया सल्लागार हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अमित साळकर आणि डॉ. प्रज्ञा रहाटेकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली, जी हॉस्पिटलच्या कार्डियाक केअर प्रोग्राममधील एक मोठी प्रगती दर्शवते.

रुग्ण हा ७२ वर्षीय पुरुष होता, जो गंभीर एओर्टिक व्हॉल्व्ह स्टेनोसिसने ग्रस्त होता आणि यापूर्वी त्याची मिट्रल व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट झाली होती. त्याच्यामध्ये हार्ट फेल्युअरची लक्षणे वाढत होती. शस्त्रक्रियेचा उच्च धोका लक्षात घेता, टीमने मेड-इन-इंडिया ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व्ह सिस्टीमचा वापर करून ट्रान्सफेमोरल टीएव्हीआर प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. जो प्रगत हार्ट केअरमधील स्वदेशी नवकल्पनांच्या वाढत्या स्वीकृतीमधील एक मैलाचा दगड आहे.

ही प्रक्रिया लोकल भूल आणि फ्लूरोस्कोपिक मार्गदर्शनाखाली पार पडली, ज्यामुळे व्हॉल्व्ह अचूकपणे बसवण्यात आला आणि उत्कृष्ट हेमोडायनामिक परिणाम मिळाले. भारतीय-विकसित व्हॉल्व्ह सिस्टीम यशस्वीरीत्या तैनात करण्यात आली आणि रुग्णाची प्रकृती स्थिर सुधारली, त्याला चांगल्या स्थितीत डिस्चार्ज देण्यात आला. या यशावर भाष्य करताना, डॉ. पलक कुसुमगर शाह आणि डॉ. उत्कर्ष शाह म्हणाले: हे यश अरिहंत हॉस्पिटलसाठी आणि मध्य भारतातील कार्डियाक केअरसाठी एक निर्णायक क्षण आहे.

भारतीय-विकसित टीएव्हीआर प्लॅटफॉर्मची उपलब्धता आम्हाला आमच्या रुग्णांना जागतिक दर्जाचे, सुलभ आणि परवडणारे उपचार परिणाम प्रदान करण्यास सक्षम करते. हे यश अरिहंत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची नेक्स्ट-जनरेशन कार्डियाक तंत्रज्ञान एकत्रित करण्याची आणि हृदयाच्या गुंतागुंतीच्या संरचनात्मक आजार असलेल्या रुग्णांचे परिणाम सुधारण्याची वचनबद्धता दर्शवते.

या कामगिरीसह, हे रुग्णालय भारतातील अशा अग्रगण्य केंद्रांच्या वाढत्या नेटवर्कमध्ये सामील झाले आहे, जे मेड-इन-इंडिया टीएव्हीआर नवकल्पना स्वीकारत आहेत आणि परवडणाऱ्या व प्रगत हार्ट व्हॉल्व्ह थेरपीचे भविष्य घडवत आहेत.

## महाराष्ट्रात डबल इंजिन सरकारपासून ट्रिपल इंजिन सरकार निर्माण करण्याचे आपले लक्ष्य असावे

**मुंबई, २८ ऑक्टोबर :** मुंबईमध्ये सोमवारी भारतीय जनता पार्टीच्या (भाजप) नवीन प्रदेश कार्यालयाच्या भूमिपूजनाचा सोहळा हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नव्हता; तो भाजपच्या वैचारिक बांधिलकीचा, संघटनात्मक सामर्थ्याचा आणि राष्ट्रहिताच्या भावनेचा प्रभावी प्रतीक बनला. या प्रसंगी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्र भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करताना तीन स्पष्ट संदेश दिले संघटनेची मजबुती, तत्त्वांवरील निष्ठा आणि राष्ट्रहित सर्वांत वर ठेवणे. शाह यांच्या मते, हीच संघटना, सिद्धांत आणि राष्ट्रहित यांची त्रिवेणी म्हणजेच भाजप कार्यालयाचे मूळ तत्त्व आहे.

अमित शाह यांनी आपल्या भाषणात सांगितले की महाराष्ट्रातील डबल इंजिन सरकार म्हणजेच भाजपशिंदे आघाडीचे सरकार राज्याच्या विकासाला गती देत आहे. परंतु आता या गतीला अधिक स्थैर्य देण्यासाठी ते ट्रिपल इंजिन सरकारमध्ये रूपांतरित करण्याची वेळ आली आहे. म्हणजेच केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था या तिन्ही पातळ्यांवर भाजपचे सरकार असावे. त्यांनी स्पष्ट केले की, धोरणनिर्मितीपासून अंमलबजावणीपर्यंत एकसंध विचार आणि निर्धार असेल तेव्हाच विकासाचा वेग कायमस्वरूपी होईल. ट्रिपल इंजिन सरकार हे फक्त राजकीय घोषवाक्य नसून जनसेवा आणि विकासासाठी एक प्रभावी यंत्रणा आहे, जी महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेईल. यावेळी शाह यांनी कार्यकर्त्यांना बूथ स्तरावर संघटना सक्रिय करण्याचे आणि आगामी निवडणुकांसाठी लगेच तयारी सुरू करण्याचे आवाहन केले.

मुंबईतील प्रस्तावित नवीन भाजप कार्यालय केवळ एक इमारत नसून ते विचार आणि कृतीचे केंद्र ठरणार आहे. भाजप कार्यकर्त्यांसाठी हे कार्यालय म्हणजे केवळ ऑफिस नसून मंदिर आहे. अमित शाह यांनी याला संघटना, सिद्धांत आणि राष्ट्रहित या त्रिवेणीचे प्रतीक असे संबोधले. त्यांनी सांगितले की प्रत्येक भाजप कार्यालय राजकीय सोयीसाठी नव्हे, तर कार्यकर्त्यांच्या निष्ठा, सेवा, समर्पण आणि संघटनशिस्तीच्या भावनेला समर्पित असते. भाजपने आपल्या दीर्घ संघर्षात नेहमीच वैचारिक शुद्धतेला प्राधान्य दिले आहे. पक्षाच्या प्रत्येक निर्णयामध्ये सत्तेची लालसा नव्हे तर राष्ट्रहितच केंद्रस्थानी राहिले आहे. म्हणूनच आज भाजप जगातील सर्वात मोठा लोकशाही पक्ष म्हणून उदयास आला आहे.

केंद्रीय गृहमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मागील ११ वर्षांच्या कालखंडाचा उल्लेख करताना सांगितले की, हा काळ फक्त शासनाचा नव्हे तर भाजपच्या वैचारिक संकल्पपूर्तीचा काळ ठरला आहे. कलम ३७० रद्द करणे, तीन तलाक समाप्त करणे, राममंदिराचे बांधकाम आणि नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा (सीएए) हे निर्णय भाजपच्या वैचारिक ठरावांची पूर्तता आहेत. शाह यांनी सांगितले की हे सर्व शक्य झाले ते मोदीजींच्या दृढ नेतृत्वामुळे, संघटनेच्या एकतेमुळे आणि जनतेच्या विश्वासामुळे. अनेक दशके अशक्य मानल्या गेलेल्या गोष्टी मोदी सरकारने राष्ट्रहिताच्या दृष्टिकोनातून आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीने शक्य केल्या हेच नेशन फर्स्ट या भाजपच्या तत्त्वाचे जिवंत उदाहरण आहे.

मुंबईतील हा भूमिपूजन सोहळा केवळ नव्या कार्यालयाचा पाया नव्हता, तर येणाऱ्या दशकातील भाजपच्या नव्या संकल्पांचा घोष होता. अमित शाह यांचे ट्रिपल इंजिन




सरकारचे आवाहन हे केवळ सत्तेसाठी नव्हे, तर महाराष्ट्रात संघटनात्मक आणि वैचारिक ऐक्यासाठी आहे. संघटना, सिद्धांत आणि राष्ट्रहित या त्रिवेणीच्या प्रेरणेतून सुरू झालेली ही चळवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात नवचैतन्य निर्माण करणार आहे, जिथे पक्ष, सरकार आणि जनता मिळून विकसित भारतचे स्वप्न साकार करण्यासाठी एकत्र येत आहेत.

## टिकाऊ बांधणी आणि आकर्षक डिझाइन, युवाच्या नव्या स्टेलर स्पायरल पीपी कव्हर नोटबुक्स

**मुंबई, २८ ऑक्टोबर :** नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या युवातर्फे स्टेलर स्पायरल पीपी कव्हर नोटबुक्स ही आपली नवी नोटबुक सीरिज सादर करण्यात आली आहे. ज्यांना मुक्तपणे लिहायला, नियोजन करायला आणि सर्जनशीलतेने व्यक्त व्हायला आवडते, त्यांच्यासाठी या नोटबुक्स तयार करण्यात आल्या आहेत. आजच्या गतिमान जीवनशैलीशी सुसंगत असे या नोटबुक्सचे डिझाइन आहे.

न फाटणारे, मजबूत आणि पाणी न शोषणारे पॉली कव्हर असलेल्या या नोटबुक्समध्ये तुमचे लिखाण रोजच्या वापरामुळे किंवा अनवधानाने सांडलेल्या द्रवांपासून सुरक्षित राहते. जाड ६४ जीएसएम कागदामुळे लेखनाचा अनुभव अधिक स्मूद आणि आनंददायी होतो. तसेच या कागदामुळे शाई पसरत नाही आणि मागच्या पानावर उमटतही नाही. त्यामुळे प्रत्येक पान स्वच्छ आणि प्रोफेशनल दिसते. ट्रेंडी मेटॅलिक फिनिश कव्हर डिझाइन्समुळे युवाची स्टेलर नोटबुक्स तुमच्या स्टेशनरी कलेक्शनला



प्रीमियम आणि आधुनिक लुक देतात. टिकाऊ आणि विश्वासार्ह अशा या नोटबुक्स प्रत्येक वर्गासाठी, प्रोजेक्टसाठी आणि कल्पनेमध्ये साथ देण्यासाठी बनवलेल्या आहेत.

या लॉंचबद्दल युवा स्टेशनरीचे चीफ स्ट्रॅटजी ऑफिसर श्री. अभिजीत सान्याल म्हणाले, आजच्या पिढीच्या गरजा व ऊर्जा प्रतिबिंबीत होणाऱ्या स्टेशनरीची निर्मिती करण्याचे युवामध्ये आमचे उद्दिष्ट असते. युवाच्या नव्या स्टेलर नोटबुक या लेखकाच्या सगळ्या गरजा भागवणाऱ्या नोटबुक आहेत. योग्य जाडीचा कागद, पुरेशी जागा आणि स्टायलिश कव्हर डिझाइन असलेली ही नोटबुक दर्जेदार, टिकाऊ आणि ट्रेंडी पर्याय शोधणाऱ्या प्रत्येकासाठी परिपूर्ण निवड ठरते.

ए४ आकारात उपलब्ध असलेल्या या नोटबुक्स विद्यार्थ्यांसाठी, व्यावसायिकांसाठी आणि क्रिएटर्ससाठी स्मूथ लेखनासाठी पुरेशी जागा देतात. या नोटबुक्स आता सर्व आघाडीच्या स्टेशनरी स्टोअर्स आणि जवळच्या दुकानांमध्ये उपलब्ध आहेत.

## एईएसएलने आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत आणि पहिल्या सहामाहीत मजबूत कामगिरी नोंदवली

**अहमदाबाद, २८ ऑक्टोबर :** अदाणी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (एईएसएल), जी जागतिक स्तरावर विविध व्यवसाय असलेल्या अदाणी समूहाचा भाग आहे आणि भारतातील सर्वात मोठी खासगी ट्रान्समिशन, वितरण आणि स्मार्ट मीटरिंग कंपनी आहे, हिने ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी आपली आर्थिक आणि कार्यात्मक कामगिरी जाहीर केली.

एईएसएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कंदर्प पटेल म्हणाले, आम्हाला आणखी एक मजबूत तिमाही नोंदवल्याचा आनंद आहे. प्रभावी ग्राउंड अंमलबजावणी आणि केंद्रित ऑपरेशन व मेंटेनन्स यामुळे प्रकल्पांवरील भांडवली गुंतवणुकीत सातत्यपूर्ण प्रगती होत आहे आणि विविध व्यवसाय विभागांतील ठरवलेल्या प्रकल्पांच्या पूर्णतेकडे आम्ही आणखी एक पाऊल पुढे गेलो आहोत. पहिल्या सहामाहीत कंपनीने तीन नवीन ट्रान्समिशन लाईन्स सुरू केल्या आणि स्मार्ट मीटर बसवण्यात उद्योगातील आघाडी राखत सुमारे ७४ लाख मीटर बसवले. जे देशातील कोणत्याही कंपनीकडून झालेले सर्वाधिक आहे. विकासाच्या दृष्टीने पाहता, ऊर्जा क्षेत्रात स्थिर नियामक धोरणे आणि सुधारणांमुळे मोठ्या वाढीच्या संधी उपलब्ध आहेत. आम्हाला अपेक्षा आहे की एईएसएलची भांडवली गुंतवणूक सर्व प्रमुख विभागांमध्ये अधिक वाढेल आणि या वर्षाच्या उर्वरित काळात निविदा प्रक्रियेतही मजबूत गती राहील.

ईबीआयटीडीए आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या सहामाहीत ४,१४४ कोटी (१३.४% वाढ) आणि आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत २,१२६ कोटी (१२.४% वाढ) इतके नोंदले गेले. ट्रान्समिशन व स्मार्ट मीटरिंग विभागाने वाढीला गती दिली, तर दहाणू थर्मल मालमत्तेच्या विक्रीमुळे मुंबई वितरण व्यवसायाचा ईबीआयटीडीए तुलनेने कमी झाला. कंपनीचा करापूर्व नफा (पीबीटी) आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या सहामाहीत १,४०४ कोटी (३४.१% वाढ) आणि आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाही मध्ये ७४५ कोटी (२५.४% वाढ) इतका झाला. समायोजित निव्वळ नफा आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये ५५७ कोटी झाला, जो वार्षिक २१.२% वाढ दर्शवतो. ही वाढ ईबीआयटीडीए आणि पीबीटी स्तरावरील मजबूत नफ्यामुळे झाली असून, मागील वर्षातील ३१४ कोटींच्या एक-वेळ कर लाभाच्या प्रभावाशिवाय तुलना करण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत आणि पहिल्या सहामाहीत अदाणी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडच्या सर्व विभागांनी स्थिर आणि मजबूत कामगिरी नोंदवली.

ट्रेडिंग आणि इतर विभागांमध्ये उत्पन्न २९१ कोटी राहिले. एकूणच, एईएसएल ने ट्रान्समिशन, वितरण आणि स्मार्ट मीटरिंग या सर्व क्षेत्रांमध्ये स्थिर वाढ आणि उत्कृष्ट कार्यक्षमता कायम ठेवली आहे.

ट्रान्समिशन व्यवसायात, कंपनीने या तिमाहीत उत्कृष्ट कामगिरी केली असून सरासरी प्रणाली उपलब्धता ९९.६% पेक्षा जास्त राहिली. उच्च लाईन उपलब्धतेमुळे कंपनीला ३० कोटी प्रोत्साहन उत्पन्न मिळाले. सध्या ६०,००४ कोटींच्या प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहे. या तिमाहीत १९० सर्किट किमी नेटवर्क वाढवून एकूण ट्रान्समिशन नेटवर्क २६,७०५ सर्किट किमीपर्यंत पोहोचले. आर्थिक वर्ष २६ मध्ये उत्तर करणपुरा, पश्चिम रेल्वे (नरेंद्रपुणे), मुंबई एचव्हीडीसी आणि खवडा फेज-III-A हे प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.वितरण व्यवसायात (एईएमएल मुंबई आणि एमयुएल मुंद्रा), वीज वितरणात २% वाढ होऊन एकूण २,६५० मिलियन युनिट्स विक्री झाली. एईएमएल चा वितरण तोटा केवळ ४.३६% इतका कमी नोंदवला गेला. एईएमएल चा नियामित मालमत्ता तळ (आरएबी) ९,४१२ कोटींवर पोहोचला असून यात १३% वार्षिक वाढ झाली आहे. स्मार्ट मीटरिंग व्यवसायात, कंपनीने आतापर्यंत ७३.७ लाख स्मार्ट मीटर बसवले असून आर्थिक वर्ष २६ अखेरीस किमान १ कोटी मीटर बसवण्याचे उद्दिष्ट आहे. सध्या १० प्रकल्पांतर्गत २.४६ कोटी मीटर बसवणी सुरू असून त्यातून २९,५१९ कोटींचे महसूल संभाव्य आहे.

ईएसजी क्षेत्रात, कंपनीचा सस्टेनॅलिटिक्स ईएसजी जोखीम स्कोअर २५.१ वरून १९.९ पर्यंत सुधारला असून "Low Risk" श्रेणीत आहे जो जागतिक उद्योग सरासरीपेक्षा खूपच चांगला आहे.. एईएसएल ही 100% "Zero Waste to Landfill" प्रमाणित असलेली भारतातील एकमेव ट्रान्समिशन कंपनी ठरली आहे. सीएसआर हब स्कोअर ९३% पर्यंत वाढला असून कंपनीने चोरी प्रतिबंध व पक्षी सुरक्षेसाठी नाविन्यपूर्ण उपायांबद्दल गोल्ड अवॉर्ड मिळवला आहे. अदाणी समूहाचे एनर्जी नेटवर्क ऑपरेशन सेंटर (ईएनओसी) यांना उत्पादकता सुधारणामध्ये सर्वोत्तम एलसीए या श्रेणीत सीआयआय कडून प्लॅटिनम पुरस्कार मिळाला.

## सुबहान खानने गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय या सोनी सबवरील मालिकेत भगवान कार्तिकेयची भूमिका साकारण्यासाठी घेतले कठोर कलारीपयट्टूचे प्रशिक्षण

**मुंबई, २८ ऑक्टोबर :** दैवी बंधुत्वाची कथा जिवंत करणारी सोनी सबची गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही मालिका आपल्या भावपूर्ण कथनशैली, भव्य पौराणिक सादरीकरण आणि प्रभावी अभिनयामुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. या मालिकेत भगवान कार्तिकेयाची भूमिका साकारणारे अभिनेते सुबहान खान यांनी कार्तिकेयाच्या पात्राला न्याय देण्यासाठी गरजेची असलेली शारीरिक ताकद आणि योद्ध्याचे मनोबल दाखवण्यासाठी भारतातील सर्वात प्राचीन मार्शल आर्ट्सपैकी एक असलेल्या कलारीपयट्टूचे तीन महिन्यांचे कठोर प्रशिक्षण घेतले. सुबहानसाठी ही भूमिका साकारणे म्हणजे फक्त एका दैवी व्यक्तिमत्त्वाचे रूप धारण करणे नव्हते, तर शरीर आणि मन या दोन्ही स्तरांवर संपूर्ण परिवर्तनाची प्रक्रिया होती.

भगवान कार्तिकेयांच्या पराक्रम आणि सौंदर्याचे वास्तव दर्शन घडवण्यासाठी सुबहान यांनी प्रसिद्ध मार्शल आर्ट्स गुरू दीपक दास यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले. दीपक दास यांनी यापूर्वी टायगर श्रॉफ आणि कृति सेनन यांसारख्या बॉलीवूड कलाकारांनाही प्रशिक्षण दिले आहे. सुबहानचा प्रवास कॅमेऱ्यांपासून दूर अशा मास्टर दीपक दास यांच्या प्रशिक्षण केंद्रातील चटईवर सुरू झाला. यातील प्रत्येक हालचाल - ज्यात झपाट्याने मारलेली किक असो वा नाजूक, पण प्रभावी आसन - या सर्वांतून संतुलन, नियंत्रण आणि एकाग्रतेचे धडे त्यांना मिळाले. दक्षिण भारतीय परंपरेशी खोलवर जोडलेल्या या प्राचीन कलारीपयट्टू मार्शल आर्टद्वारे सुबहान यांनी केवळ आपली चपळता आणि शक्ती वाढवली नाही, तर दैवी योद्ध्याचे प्रतीक असलेली शिस्त आणि मानसिक शांतताही आत्मसात केली.

आपल्या तयारीबद्दल बोलताना सुबहान म्हणाले, सुरुवातीला सर्वात मोठी लढाई शारीरिक प्रशिक्षणाची नव्हती, तर शिस्तीची होती. दररोज सकाळी वर्गात वेळेवर पोहोचण्यासाठी मी नायगावहून अंधेरीपर्यंत प्रवास करत असे. दीपक सर अतिशय कडक आहेत. एक मिनिट जरी उशीर केला तर त्यांच्या मौनाचा सामना करावा लागे, ते शब्दांपेक्षा जास्त कठोर असते. मात्र, त्यामुळे मला कळले की, योद्ध्याला शारीरिक ताकदीपूर्वी वेळेचे भान असणे गरजेचे आहे.

सुबहान म्हणतात, सुरुवातीचे काही आठवडे हे प्रशिक्षण आव्हानात्मक होते. यात नव्या हालचाली होत्या. शरीराला ताणणे, उड्या मारणे आणि कलारीच्या शस्त्रांच्या जलद हालचाली कराव्या लागत. त्यामुळे शरीर दुखत होते. पण, हळूहळू हा थकवा सहनशक्तीत बदलला व हे थकलेपण एकाग्रतेत परिवर्तित झाले. हळूहळू मी



फक्त योद्ध्याची भूमिका करत नव्हतो, तर खरोखरच एका योद्ध्यासारखी हालचाल करायला लागलो. माझं शरीर मजबूत झालं, पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे माझं मन अधिक दृढ, घट्ट झालं, असं ते सांगतात.

अभिनेता आपल्यातल्या या बदलाचे श्रेय आपल्या प्रशिक्षकांना आणि सर्जनशील टीमला देतो. ही शिस्त मी दीपक सरांमुळे आत्मसात केली - त्यांनी मला माझ्या मर्यादांपलीकडे नेलं आणि निर्मात्यांनी माझ्यावर या दैवी भूमिकेसाठी विश्वास दाखवला. कलारीपयट्टू आता माझ्या अस्तित्वाचा भाग झाला आहे; ते फक्त शोसाठी शिकलेले कौशल्य नाही, तर एक विचारसरणी आहे, जी माझ्या मनात कायम राहते.

या कठोर तयारीमुळे सुबहान यांनी कार्तिकेयाच्या भूमिकेला प्रामाणिक, ॲक्शनने भरलेला आणि आत्म्याला स्पर्श करणारा असा नवा पैलू दिला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांसाठी हा अनुभव दृश्य आणि भावनिक दोन्ही स्तरांवर समृद्ध ठरतो.


**बुधवार दि. २९ ऑक्टोबर २०२५**

| कल्याण बाजार (पत्थर फोड एकच) | | | | मुंबई बाजार (पत्थर फोड एकच) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| १५७ | १५८ | १६८ | १२४ | १३८ | १३० | २६९ | १७० |
| ६७० | ३४७ | ३४८ | २७८ | ५८९ | २२० | ४५८ | ३६९ |
| ५८० | २४८ | ७८० | ३७७ | ६७९ | ३३८ | १८८ | २६० |

जोडी (कल्याण): ३१ - ४१ - ५१ - ७१; ३२ - ४२ - ५८ - ७८; ३६ - ४६ - ५० - ७०

जोडी (मुंबई): २१ - ४१ - ७३ - ८३; २० - ४० - ७६ - ८६; २१ - ४१ - ७५ - ८५

जबरदस्त पास होणारे चान्सेस २९ ऑक्टोबर २०२५

**बुधवार दि. २९ ऑक्टोबर २०२५**

**सर्व बाजार साठी**

३१ - ४१ - ५२ - ७२
३० - ४० - ५९ - ७९
३८ - ४८ - ५६ - ७६

१३१ - ६८० - ६९० - १२४
२३८ - ७७० - १५९ - २७८
३३७ - ५९० - २५८ - ३४०

सर्व बाजारासाठी

सोम. ते बुध. ओपन डे — ६९० ७८० ५०० **५**; १६१ २६८ ३६७ **६**; ४८० ५०० ६६० **२**
सोम. ते बुध. ओपन नाईट — ४७८ ५५१ ६६७ **९**; ३०० ४६० ५५० **०**; १७९ २७८ ३०० **७**

सोम. ते बुध. क्लोज डे — ३०० ४९० ५८० **३**; २६६ ३४७ ४४६ **४**; २४९ ३५७ ४५६ **५**
सोम. ते बुध. क्लोज नाईट — २३६ ४८१ ११५ **१**; ६७० ५८० ४९० **३**; १४१ २५७ ३४७ **४**

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
५ ६ २ ८ ९

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## ॲक्सिस म्युच्युअल फंडचा नवा ॲक्सिस इन्कम प्लस आर्बिट्राज पॅसिव्ह एफओएफ

**मुंबई, २८ ऑक्टोबर :** भारतातील एक प्रमुख संपत्ती व्यवस्थापन कंपनी, ॲक्सिस म्युच्युअल फंडने नवीन ॲक्सिस इन्कम प्लस आर्बिट्राज पॅसिव्ह एफओएफ सुरु केल्याची घोषणा आज केली. ही एक नाविन्यपूर्ण ओपन एंडेड योजना आहे. या योजनेचा उद्देश गुंतवणूकदारांना असा गुंतवणूक पर्याय देणे आहे, जो सुरक्षित असेल, ज्यामध्ये परताव्याचे अनुमान लावले जाईल आणि कराचे ओझे देखील कमी असेल. नवीन फंड ऑफर (एनएफओ) २८ ऑक्टोबर २०२५ ला सबस्क्रिप्शनसाठी खुली होईल आणि ११ नोव्हेंबर २०२५ पर्यंत राहील. या फंडचे व्यवस्थापन करतील - देवांग शाह (फिक्स्ड इन्कम विभागाचे प्रमुख), आदित्य पगारिया (सिनियर फंड मॅनेजर), हार्दिक सतारा (सिनियर फंड मॅनेजर) आणि कार्तिक कुमार (फंड मॅनेजर).

नवी गुंतवणूक योजना अशा गुंतवणूकदारांसाठी तयार करण्यात आली आहे ज्यांना कमी जोखीम (कॉन्झर्वेटिव्ह रिस्क प्रोफाइल) आणि कर भरणा केल्यानंतरचा नफा अधिक जास्त हवा असतो. हा फंड डेटवर आधारित पॅसिव्ह म्युच्युअल फंड योजना आणि आर्बिट्राज फंडांमध्ये धोरणात्मकदृष्ट्या गुंतवणूक करून एक हायब्रीड गुंतवणूक साचा तयार करतो, ज्याचे उद्दिष्ट मध्यम कालावधीमध्ये (काही वर्षांत) नियमित परतावा देणे हे आहे.

ॲक्सिस एएमसीचे एमडी आणि सीईओ, श्री बी गोपकुमार यांनी सांगितले, ॲक्सिस म्युच्युअल फंडामध्ये आम्ही नेहमीच अशा नवीन आणि गुंतवणूकदारांवर केंद्रित योजना देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे ज्यांची कामगिरी चांगली असेल, आणि ज्या समजून घेणे सोपे देखील असेल. ॲक्सिस इन्कम प्लस आर्बिट्राज पॅसिव्ह एफओएफ याच विचारातून तयार करण्यात आला आहे. हा फंड स्थिरता, पारदर्शकता आणि कर बचत यांचा अनोखा मिलाप प्रदान करतो. आजच्या काळात बाजारपेठेमध्ये भविष्याचे अनुमान लावणे आणि करपश्चात नफा यांचे महत्त्व वाढले आहे, हा फंड गुंतवणूकदारांना निश्चित उत्पन्न देणाऱ्या गुंतवणुकीसाठी एक अधिक स्मार्ट मार्ग मिळवून देण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे.

ॲक्सिस एएमसीचे सीआयओ श्री. आशिष गुप्ता म्हणाले, सध्याची बाजारपेठ अशा स्थितीत आहे जिथे गुंतवणूकदार स्थिर उत्पन्न साधनांमधून चांगले परतावे मिळवू शकतात आणि गुंतवणूकदार पारंपारिक स्थिर उत्पन्न साधनांसारखे (जसे की फिक्स्ड डिपॉझिट्स) स्थिर परतावा देणाऱ्या परंतु त्याच वेळी त्यांच्यावर लागणारा कर देखील कमी असावा. ॲक्सिस इन्कम प्लस आर्बिट्रेज पॅसिव्ह एफओएफ हा गुंतवणूकदारांच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य वेळी आलेला एक उपाय आहे. हा फंड निष्क्रिय रोल-डाउन धोरणे आणि पूर्णपणे हेज्ड आर्बिट्रेज एक्सपोजर वापरून सुरक्षित, स्थिर आणि पारदर्शक गुंतवणूक पर्याय प्रदान करतो.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस मुलामुलींच्या प्रश्नांना मार्गी लावणारा आहे. तुम्हाला यश मिळेल. मुलांशी संबंधित समस्या सुटतील आणि त्यांच्या प्रगतीने आनंद मिळेल. समाजात नवीन लोकांशी ओळख होईल.

**वृषभ :** आज उत्साह आणि उमेद वाढवणाऱ्या घटनांचा अनुभव येईल. तुमचे व्यक्तिमत्त्व बहरेल आणि लोक तुमच्या कामाचे कौतुक करतील. कुटुंबीय सुद्धा तुम्हाला केलेल्या गोष्टींविषयी योग्य पात्र समजतील.

**मिथुन :** लाकूड व्यापारात गुंतलेल्यांना आज एक मोठा प्रकल्प मिळेल. लेखक एक नवीन कथा लिहू शकतात जी चांगली पसंती मिळवेल. उपासनेसाठी दिवस उत्तम आहे. आर्थिक लाभ मिळतील.

**कर्क :** आज तुम्हाला एखाद्या गोष्टीची थोडीशी चिंता असेल, पण ती गोष्ट जवळच्या मित्रासोबत शेअर केल्याने तुम्हाला थोडा आराम मिळेल. तुम्ही तुमच्या कुटुंबासह चित्रपट पाहण्याचा बेत आखू शकता.

**सिंह :** आज नोकरी आणि व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील. कामे व्यवस्थित होतील. घडलेल्या गोष्टींचे योग्य अवलोकन करून पुढील कालावधीचे नियोजन आज योग्य प्रकारे केले जाईल.

**कन्या :** आजचा दिवस कंत्राटदारांसाठी आर्थिक लाभाचा असेल. बदलत्या हवामानामुळे तुमची चिंता वाढू शकते. चांगले आरोग्य राखण्यासाठी भरपूर पाणी प्या. तुम्हाला दिनचर्येत काही बदल करावे लागतील,

**तुळ :** आजचा दिवस मनाशी निगडित असेल. काही वेळेला मन उदास वाटू शकते. त्यामुळे आज शक्यतो कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेणे टाळावे. दैनंदिन कामे पूर्ण करण्यासाठी अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल,

**वृश्चिक :** आज जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. त्यांच्या पाठिंब्यामुळे नोकरी आणि व्यवसायाच्या कामांमध्ये एक वेगळा उत्साह येईल. कामाच्या बाबतीत आज समाधानकारक स्थिती राहील.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी भाग्यकारक घटना घेऊन येणारा आहे. वाहने आणि द्रुतगती प्रवासाची विशेष आवड राहील. आपले काम सातत्याने सुरू ठेवा. मन:शांतीसाठी ध्यान करणे फायदेशीर ठरेल.

**मकर :** तुम्ही एखाद्या मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला उपस्थित राहाल, इतर मित्रांमुळे आनंदात दिवस जाईल. आज एखादे नवे स्किल शिकाल. नवीन कामांना सुरुवात करण्यासाठी दिवस अनुकूल आहे.

**कुंभ :** आज अचानक धनलाभाचे योग जुळून येतील. आर्थिक परिस्थिती सुधारेल, पण आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. आज तुम्ही केलेल्या कामाचे श्रेय तुम्हाला लगेच मिळेल.

**मीन :** आजचा दिवस भाग्याचा आणि धाडसाचा आहे. आज तुमच्यात वेगळाच उत्साह असेल. ज्यामुळे कामामध्ये गती येईल. कामानिमित्त लांबचे प्रवास संभवतात. हे प्रवास फलदायी ठरतील.

## शब्दकोडे क्रमांक २२५१



**आडवे शब्द :-**

१) मेहेरबानी
४) वर्तुळाकार
७) सतत नकार देणे
१०) उदा. ज्ञानेश्वर, तुकाराम इ.
११) धमकी
१३) वाघ-सिंहाचे ओरडणे
१४) सर्वस्व
१६) प्रतिष्ठा, अब्रू
१७) परिचय
१९) दोन मैल
२०) तपासणे, परीक्षा घेणे, पारख करणे
२१) पुष्कळ
२२) चित्त, अवधान
२३) मुस्लीमांचे प्रार्थना स्थळ
२५) अखेर, शेवट
२७) पाषाण
२९) डाग, बट्टा (हिं.)
३०) नातवंडांची मुले
३२) शाईचा वा रंगाचा ठिबका
३३) वेत्रधारी, राजाच्या समोर सोन्याची काठी घेऊन उभा राहणाऱ्याची दोन नावे
३५) उसाचा रस काढण्याचे यंत्र
३७) फार मोठा, अवाढव्य
३८) जाडसर पीठ
३९) पूजेचे ताट
४१) फकिराचा एक पंथ, दरवेश
४२) व्यवस्थित
४५) रात्र
४६) लोकनाट्य
४८) तलाव
५०) एकरूप, तल्लिन
५३) मृत्तिकापात्र
५५) बरोबर, सारखा
५७) धुंद, जहाजातून आणलेला
५८) फणसाचा एक प्रकार
६०) रात्रभर
६२) ओलसर हवा
६४) फसविले जाणे
६६) सारखा
६७) शेराचा चौथा भाग
६९) पोथीचे वाचन
७१) मनाचा ओढा
७२) जंगलात लागलेली आग
७४) पुत्र, मुलगा
७५) मध
७६) फलक, टोपली

**उभे शब्द :-**

१) विश्रांती, फुरसत
२) किरण पडण्याची दिशा
३) दात
४) गाईचे दान
५) पापडाच्या पिठाची गोळी
६) कसेतरी, मोठ्या मुश्कीलीने
७) होकारच्या विरुद्ध
८) काळ्या रंगाची
९) मोठ्या तोंडाचे दोन्ही बाजूस कडी असलेले मोठे पात्र
१२) मधुमक्षिका
१५) चामखीळ
१६) पुन्हा पुन्हा
१७) ओचकारा, चरा
१८) सढळ हाताने खर्च करणारा
२२) सारख्या वजनाचे
२३) घट्ट मारलेला विळखा
२४) दाबणे, लपविणे
२६) न घाबरणारा
२८) हलणे, अस्थिर होणे
२९) मोठा भाऊ
३१) फसव्या
३४) मोठेपणा दाखविण्यासाठी बरोबर आणलेला फौजफाटा
३६) उणीव, न्यूनता
४०) दिवा
४३) व्यायाम
४४) फुरसत, प्रसंग
४५) सीतापती
४६) तात्काळ
४७) उपविभाग, फांदी
४९) दारुचा एक प्रकार
५०) समर्थ, क्षमता असलेला
५१) अखेरीस
५२) वितरण
५४) तसराळे
५६) पाऊल (हिं.)
५९) जवळ (हिं.)
६१) श्वशुर
६३) पत्र
६५) तृण
६६) हुक्की, लहर
६८) वाळवंट
६९) चरण
७०) मृत्युदेवता
७१) सोवळ्याचे रेशमी धोतर
७३) पाण्याचे हवेत झालेले रूपांतर

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# शहरातील हॉकर्स झोनला विरोध; महापालिकेवर विक्रेत्यांचा मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :

महापालिका प्रशासनाच्या वतीने घोषित करण्यात आलेले हॉकर्स झोन रद्द करण्यात यावेत, या मागणीसाठी शेकडो हॉकर्स सोमवार २७ रोजी महापालिकेवर धडकले. यावेळी मनपा आयुक्तांना निवेदन देत हॉकर्स झोन घोषित करताना पथविक्रेता समितीला डावलल्याचा आरोप करीत प्रस्तावित हॉकर्स झोन रद्द करून त्यांची नव्याने घोषणा करण्यात यावी, अशी मागणी पथविक्रेता समितीद्वारे करण्यात आली. तसेच यावेळी हॉकर्स समितीचे पुर्नगठन करण्याचीही मागणी करण्यात आली. मात्र, मनपा आयुक्तांनी हॉकर्सला थेट असे करता येणार नाही, आम्ही हॉकर्स समिती गठित केली असून त्यांना विश्वासात घेऊनच प्रस्तावित झोन घोषित करण्यात आले, असे सांगून पथविक्रेता समितीच्या मागण्यांकडे काहीसे दुर्लक्ष केले.



महापालिका प्रशासनाने हॉकर्स झोन घोषित करताच शहरातील शेकडो हॉकर्स झोनला विरोध करण्यासाठी महापालिकेवर धडकले. गणेश मारोडकर यांच्या नेतृत्वात मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. या वेळी झोन घोषित करताना पथविक्रेता समितीला डावलल्याचा आरोप करत मनपाद्वारा घोषित झोन मान्य नसल्याचे समितीद्वारे सांगण्यात आले. फेरीवाला समितीला विश्वासात घेतले नाही, त्यामुळे २०१७ प्रमाणे नव्हे तर २०२५ च्या कायद्याप्रमाणे हे हॉकर्स झोन घोषित करावेत. प्रशासनाकडून जे रेड हॉकर्स झोन घोषित केले आहेत, ते पूर्णपणे २०१४ च्या कायद्याचे उल्लंघन आहे. जोपर्यंत अधिकृत झोन घोषित होत नाहीत, तोपर्यंत कारवाई करू नये, अशी मागणी समितीद्वारे करण्यात आली. फेरीवाला समितीचे गणेश मारोडकर यांच्यासह दीपक लोखंडे, सुरज चव्हाण, जावेद शेक, सारिका राऊत, वंदना शिरभाते, आशा इंगळे व शेकडो हॉकर्स या वेळी उपस्थित होते.

मनपा आयुक्तांनी मात्र प्रशासनाद्वारे घोषित हॉकर्स झोन कायद्याच्या आधारेच तयार करण्यात आल्याचे सांगितले. झोन संदर्भात सूचना व हरकतीनंतर त्या फेरीवाला समिती समक्ष मांडून झोन घोषित केले जातील. शहरातील कायदा व सुव्यवस्थेकरिता हॉकर्स झोन आवश्यक असल्याने हॉकर्सच्या समस्या समजून घेतल्या जातील.

जे हॉकर्स निश्चित केलेल्या झोनमध्ये व्यवसाय करणार नाहीत, त्यांच्याविरोधात कारवाई होणारच, असेही मनपा आयुक्तांनी ठणकावून सांगितले. शहरात नोंदणीकृत ३५०० हॉकर्स असले, तरी त्यापैकी काही फिरता तर काही ठराविक कालावधीसाठी हा व्यवसाय करतात. त्यामुळे स्थायी हॉकर्ससाठीच हे झोन घोषित केले आहेत, असे मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी सांगितले. या वेळी हॉकर्स संघटनेने झोन नव्याने तयार करावेत, अशा मागणीचे निवेदन देण्यात आले. आयुक्तांनी निवेदन स्वीकारले. परंतु, विचार करणार की नाही, हे दिवसात कळेल.

# दिवंगत नेते रा. सू. गवई स्मारकाचे गुरुवारी उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २८ :

दिवंगत नेते रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या भव्य स्मारकाचा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. हा सोहळा दिवंगत नेते रा. सू. (दादासाहेब) गवई स्मारक, अमरावती मार्डी रस्ता, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मागे, अमरावती येथे होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या शुभहस्ते स्मारकाचे लोकार्पण होणार आहे. हा क्षण अमरावतीसाठी विशेष गौरवाचा ठरणार आहे.

स्मारकाच्या उद्घाटन सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नगरविकास, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास, औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित राहणार आहेत.

सोहळ्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र उपस्थित राहणार आहेत.

# तळोधी बा. वनपरिक्षेत्र कार्यालयावर नागरिकांची धडक



■ महासागर प्रतिनिधी, नागभीड, दि. २८ :

तालुक्यातील आकापूर, गंगासागरहेटी परिसरात वाघाच्या वाढत्या हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अलीकडेच शेतकरी वासुदेव वेटे (58, रा. आकापूर) यांचा शुक्रवारी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर ग्रामस्थांचा संताप उफाळून आला. त्यातच रविवाररच्या रात्री आकापूर गावालगत वाघाने एका श्वानावर हल्ला करून जखमी केले. या पृष्ठभूमीवर नरभक्षी वाघाला तात्काळ जेरबंद करण्याच्या मागणीसाठी मंगळवार, 28 ऑक्टोबर रोजी संतप्त नागरिकांनी तळोधी बा. येथील शिवाजी चौकातून ते मुख्य मार्गाने वनपरिक्षेत्र कार्यालयावर धडक देत आंदोलन केले.

या आंदोलनात ग्रामस्थांसह विविध सामाजिक संस्था आणि शेतकरी संघटनांचा सहभाग होता. आंदोलनकर्त्यांनी तीन दिवसात नरभक्षी वाघाला पकडा, अन्यथा ब्रम्हपुरी वनविभागाअंतर्गत येणाऱ्या कार्यालयावर जनआंदोलन उभारू असा इशारा वनविभागाला दिला. या आंदोलनात ग्रामस्थांसह विविध सामाजिक संस्था आणि शेतकरी संघटनांचा सहभाग होता. आंदोलनकर्त्यांनी तीन दिवसात नरभक्षी वाघाला पकडा, अन्यथा ब्रम्हपुरी वनविभागाअंतर्गत येणाऱ्या कार्यालयावर जनआंदोलन उभारू असा इशारा वनविभागाला दिला. आंदोलनादरम्यान ग्रामस्थांच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकारी लक्ष्मी शहा यांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलना दरम्यान ग्रामस्थांच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकारी लक्ष्मी शहा यांना निवेदन सादर करण्यात आले. सध्या परिसरात धानकापणीचा हंगाम सुरू असून, सावर्ला आकापूर मार्गावर दिवसाढवळ्या दर्शन होत असल्यामुळे आकापूर, गंगासागर हेटी, उश्राळमेंढा, सावर्ला व लखमापूर परिसरातील जनता भयभीत झाली आहे.

# आदिवासींच्या पारंपारिक कला आणि कलाकारांचा भरला मेळा



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २८ :

पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशीम व यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जमातींच्या नृत्य, गायन, वादन, चित्रकला, हस्तकला आदी कलांचा संगम भगवान बिरसा कलासंगम या स्पर्धेच्या निमित्ताने मंगळवारी बघायला मिळाला. आदिवासी एकता मित्र मंडळ, स्व. लक्ष्मणराव मानकर ट्रस्ट आणि प्रगती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त नवसारी, अमरावती येथील महर्षी पब्लिक स्कूलमध्ये भगवान बिरसा कलासंगम ही राज्यस्तरीय आदिवासी कलास्पर्धेची पश्चिम विदर्भाची विभागीय फेरी उत्साहात पार पडली. नृत्य, गायन, वाद्य वादन, चित्रकला, हस्तकला या प्रकारात ही स्पर्धा घेण्यात आली. पश्चिम विदर्भात सुमारे विविधरंगी आदिवासी पोशाख केलेल्या 400 स्पर्धकांनी शाळेचा परिसर रंगून गेला होता.

स्पर्धेचे उद्घाटनाला सामाजिक कार्यकर्ते नंदूजी बिलावेकर, सामाजिक कार्यकर्ते गौरव काकडे, लक्ष्मणराव मानकर ट्रस्टच्या विश्वस्त रेखा बावस्कर, सचिव प्रशांत बोपर्डीकर यांची उपस्थिती होती.

उद्घाटनानंतर विविध स्पर्धांना प्रारंभ झाला. नृत्य स्पर्धेमध्ये गादुली सुसुन, चाचरी गोगल्या, दंडार, गाव बोधनी, गोंडी नृत्य, भिंदेव नाईकड असे विविध पारंपरिक नृत्य सादर करून स्पर्धेत कलाकारांनी रंगत आणली. वादन स्पर्धेत कलाकारांनी विविध पारंपरिक वाद्याच्या वादनाचे कसब सादर केले तर पारंपरिक गीतांनी गायन केलेत रंग भरले. दुसरीकडे चित्रकला व हस्तकला स्पर्धेला देखील उत्तम प्रतिसाद लाभला.

# रिध्दिपूर येथे कथा लेखन व कथाकथन कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्र व विदर्भ साहित्य संघ, नागपूर, शाखा रिध्दपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 31 ऑक्टोबर, 2025 रोजी वाजेपरी रिध्दपूर येथील सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी मराठी भाषा तथा तत्वज्ञान अध्ययन केंद्र येथे कथा लेखन व कथाकथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. राजेश लेहकपुरे यांच्या हस्ते होणार असून उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते भूषविणार आहेत. विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, मार्गदर्शक म्हणून प्रा. चक्रधर कोठी यांची याप्रसंगी प्रमुखयाने उपस्थिती राहणार आहे.

# गुरूजींची नोंदणी आता ऑनलाईन

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २८ :

विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची मतदारांची नोंदणी केली जात आहे. त्यासाठी आता ऑफलाईन सोबतच ऑनलाईनचा देखील पर्याय देण्यात आला. मतदान नोंदणीला हायटेक टच प्राप्त झाला. प्रशासकीय स्तरावर रक्षक मतदारांच्या नोंदणीला वेग आला असून १ नोव्हेंबर २०२५ च्या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने नोंदणी केली जात आहे.

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ यांच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्यात येत असून, नोंदणीसाठी पात्र असलेल्या प्रत्येकाने ६ नोव्हेंबरपर्यंत नमुना १९ मध्ये अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबतचे परिशिष्ट ब-१ जिल्हाधिकारी कार्यालय, जि. प. कार्यालय, महापालिका, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, सर्व पंचायत समित्या व नगरपरिषदांच्या स्तरावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

मतदार याद्या १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकानुसार निश्चित करण्यात येत आहेत. मतदार नोंदणीसाठी पात्र शिक्षकांना ६ नोव्हेंबरपर्यंत नमुना १९ मध्ये आपला अर्ज सादर करावा लागेल. यासाठी मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१ (४) नुसार प्रसिद्ध केलेल्या नोटीसची प्रथम पुनर्प्रसिद्धी करण्यात आली आहे. शिक्षक मतदार संघासाठी नमुना क्रमांक १९ मधील अर्ज भरण्याची सूविधा आता ऑनलाईन उपलब्ध असून त्यासाठी लॉगीन करावे लागेल.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **PRITI MANOJ JADHAV.** NOW MY NEW NAME IS **PRITI MANOJRAO JADHAV.**
**ADD:** NEAR CHITRA TALKIES, GANDHIBAGH, NAGPUR-440002.

MY OLD NAME WAS **SHAKIR GHULAB NABI SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMED SHAKIR GULAMNABI SHEIKH.**
**ADD:** PLOT NUMBER 198 SHAILESH NAGAR WATHODA RING ROAD NAGPUR. PIN CODE NUMBER 440008

MY OLD NAME WAS **MANOJ SHARMA.** NOW MY NEW NAME IS **MANOJKUMAR SHARMA.**
**ADD:** SATTU HALWAI CHOWK JUNI OLI KAMPTEE NAGPUR 441002

MY OLD NAME WAS **FARHA ANJUM SHEIKH MEHBOOB.** NOW MY NEW NAME IS **FARHA AHTESHAM ANSARI.**
**ADD:** HOUSE NO. 502/B TAKIYA MASOOM SHAH MOMINPURA NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **SHEIKH ABDUL KHAN.** NOW MY NEW NAME IS **ABDUL KASAM SHEIKH.**
**ADD:** BEHIND VETERINARY HOSPITAL, SHANTI NAGAR, CHOR KHIDAKI, NAGINABAGH, CHANDRAPUR 442401 MS

MY PASSPORT NO. **G6055222** IS MY INCORRECT NAME WAS **ABDUL SHAHID.** NOW NEW CORRECT NAME IS **ABDUL SHAHID SAGEER SIDDIQUI.**
**ADD:** WARD NO.2,OM NAGAR, CHANKAPUR, NEAR GRAM PANCHAYAT DISTT. NAGPUR 441102 MS

MY OLD NAME WAS **SHAKIRA BEGUM MOHD ISRAIL.** NOW MY NEW NAME IS **SHAKIRA JUNAID KHAN.**
**ADD:** PLOT NO 150,KHARBI ROAD, NEAR TAJULMASJID, BHANDEWADI, NAGPUR-440008

MY OLD NAME WAS **ZAHEDA BI.** NOW MY NEW NAME IS **ZAHEDA BEGUM.**
**ADD:** PLOT NO.17,NEAR RAZA MASJID, SANJAY BAGH COLONY, NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **SHABANA.** NOW MY NEW NAME IS **SHABANA ANJUM MALADHARI.**
**ADD:** WARD NO. 6, NAVIN VASTI BUTIBORI NAGPUR - 441108

MY OLD NAME WAS **SK NIZAM.** NOW MY NEW NAME IS **NIZAMUDDIN SHEIKH BUDDHU.**
**ADD:** 689/A PANNALAL KI CHAL, TIMKI, NEAR CHUNA MASJID, MAHATMA FULE BAZAR, NAGPUR-440018

MY OLD PASSPORT NO. M267085. MY OLD NAME WAS **PRABHA ALIAS PRABHUDINI MADHUKARRA ALIAS ASHOKRAO GUDDEWAR.** NOW MY NEW NAME IS **PRABHA MADHUKAR GUDDEWAR.**
**ADD:** NEAR DURGA MATA MANDIR GANDHI WARD GADCHIROLI - 442605

MY OLD NAME WAS **MADHUKARRAO ALIAS QSHOKRAO.** NOW MY NEW NAME IS **MADHUKAR GUDDEWAR.**
**ADD:** NEAR DURGA MATA MANDIR GANDHI WARD GADCHIROLI - 442605

MY OLD NAME WAS **KAILASCHAND SHRIWASTAO.** NOW MY NEW NAME IS **KAILASH SHARDAPRASAD SHREEWASTAW.**
**ADD:** FLAT N.14,2 ND FLOOR BUILDING N.2NR SUMAN NAGRI , ANJANA TOWN, GODHANI RAILWAY, NAGPUR-441111

MY PASSPORT NO. **K4507679** IS MY INCORRECT NAME WAS **NASIMURAHMAN ANSARI.** NOW NEW CORRECT NAME IS **NASIMUR RAHMAN.**
**ADD:** PLOT NO. 71/A, BISMILLAH MASJID ROAD, NEAR IMAME HUSAIN MASJID, BANDHU SOCIETY, WANJRA, NAGPUR 440026 MS

MY OLD NAME WAS **MUDASSARUL MUJEEB.** NOW MY NEW NAME IS **MUDASSARUL MUJEEB QURESHI.**
**ADD:** PLOT NO.50 PENSION NAGAR BEHIND LINE TAKLI NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **SHAKEEL AHMAD S/O ABDUR RAHMAN.** NOW MY NEW NAME IS **SHAKEEL AHMAD ABDUL RAHMAN SHEIKH.**
**ADD:** PLOT NO 30 NEAR SHIV MANDIR EKTA COLONY YADAV NAGAR NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **KU SAMEENA PARVEEN ABDUL GAFOOR.** NOW MY NEW NAME IS **SAMEENA NAJEEB AHMAD.**
**ADD:** YASIN PLOT OPP TAJ SARWAR MASJID BADA TAJBAGH NAGPUR - 440024


# वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या आत्महत्येची चौकशी करा

## उबाठा महिला आघाडीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. २८ :

फलटण (जि. सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याची घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. मृत्यूपूर्वी त्यांनी स्वतःच्या तळहातावर लिहिलेल्या मजकुरातून पोलिस निरीक्षक गोपाल बदने यांच्याकडून बलात्कार तसेच प्रशांत बनकर व इतरांकडून मानसिक व शारीरिक छळ झाल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या आत्महत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा शिवसेना महिला आघाडीच्या वतीने जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



या संदर्भात महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तत्कालीन पोलिस अधीक्षक अनिल महाडीक आणि उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. पोलिस यंत्रणेतील अधिकाऱ्यांवरच असे आरोप होणे हे कायदा सुव्यवस्थेच्या आणि राज्य प्रशासनाच्या प्रतिमेच्या दृष्टीने चिंताजनक आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात वैद्यकीय प्रामाणिकतेने काम करताना काही प्रकरणांमध्ये पोलिस दबाव नाकारला होता, त्यामुळेच त्यांच्या छळाची तीव्रता वाढली. त्यांनी या संदर्भात लेखी तक्रारी केल्या होत्या व माहिती अधिकाराखाली अर्जही दाखल केला होता. मात्र कारवाई न झाल्याने त्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले. पोलिसांकडून निष्क्रियता, शवविच्छेदनात झालेला विलंब आणि प्राथमिक तपासातील त्रुटी या बाबी चौकशीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासकीय सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. यावेळी चंदा बढे, विजया खडसान, प्रतीक्षा पिंपळे, रत्ना शेळके, अनिता गायकवाड, सुनीता गायकवाड, स्मिता वराडे, शीतल सुरडकर, सपना इंगळे, वंदना मेढे, श्रद्धा आराख, कविता भागीले, संगीता सोनुने, सुवर्णा जाधव, बेबी परिहार, सुनीता सुरडकर, शारदा दाभाडे, सरला चौथनकर, सविता राऊत, आरती जाधव, सुनीता दराखे, सोनाली वाघ, मीना इंगळे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

# एकता संदेश भव्य पदयात्रा

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २८ :

युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय व माय भारत यांच्या विद्यमाने सरदार 150 युनिटी मार्च या भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील हा कार्यक्रम शुक्रवार, 31 ऑक्टोबर रोजी सकाळी 8 वाजता अमोलकचंद महाविद्यालयात होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रपरिषदेत दिली.

पुढे बोलताना मीना म्हणाले, हा उपक्रम भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येत आहे. तरुणांमध्ये राष्ट्रीय अभिमान, एकता, देशभक्ती आणि सामाजिक जबाबदारीची भावना जागविण्याच्या उद्देशाने ही पदयात्रा देशभर राबवली जात आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून आत्मनिर्भर भारत व ड्रग्जमुक्त भारत यांची प्रतिज्ञा घेण्यात येईल. त्यानंतर विद्यार्थी, स्वयंसेवक आणि नागरिकांनी एकतेचा संदेश देत अमोलकचंद महाविद्यालय, अँग्लो हिंदी शाळा, जाजू चौक, दत्त चौक, माईंदे चौक मार्गे, परत अमोलकचंद महाविद्यालय अशी पदयात्रा काढण्यात येणार आहे. या कार्यक्रमात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, माय भारतचे प्रतिनिधी, एनसीसी अधिकारी, विद्यार्थी, युवा नेते तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी सहभागी होणार आहेत. पदयात्रेनंतर सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात येईल.


**कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, भिवापूर यांचे कार्यालय**
भिवापूर रोड, भिवापूर, जिल्हा नागपूर पिन कोड - ४४१ २०१
E-mail ID tahsilbhiwapur@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१०६-२३३२४१

क्र.प्रस्तु-१/तह.भि./ज.मृ.नोंद/कावि १०११/२०२५ दिनांक : १७/१०/२०२५

वाचा: १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम - १९६९ चे कलम १३. २) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. ३) जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३, २०२३ चा २० च्या खंड १ आणि उपखंड. ४) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक ज.मृ.नों. २५२५/ (इ.ऑ. ९९११८१)/प्र.क्र. २२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५. ५) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ अन्वये. ६) अर्जदार श्री. विरेंद्र गुलाब मालुसरे रा. भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार श्री. विरेंद्र गुलाब मालुसरे रा. भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर यांनी त्यांची मुलगी मानसी विरेंद्र मालुसरे हिचे जन्माची नोंद बाबत नगर पंचायत भिवापूर येथे दप्तरी घेणेकेरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केली आहे.

सदरहू अर्जदाराच्या मुलीचा जन्म दिनांक २७/०५/२००८ रोजी मौजा भिवापूर तह. भिवापूर, जि. नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी अधिकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार भिवापूर, उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार ३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांचे मुलीच्या जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार भिवापूर, यांचे न्यायालयात स्वतः जातीने/ वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

(बी.डी. टेळे)
कार्यकारी दंडाधिकारी, तथा तहसिलदार, भिवापूर



## सायटेशन नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्र. ८९/२०२५ प्रोसेस क्र. १४२६/२०२५
पे.ता. १५-११-२०२५ दिनांक २८/१०/२०२५

Applicants : 1) Smt. Sandhya W/o. Prashant Bagde, Before Marriage Name Sandhya D/o Ganpat Gaure Aged : 57 years, Occu. Household, R/o. Near Dhammakirti Buddha Vihar, Plot No. 44, Dhammakirti Nagar, Dattawadi, Nagpur. at present R/o. Godhani Road, Behind Govind Lawn, Prakash Nagar, Zingabai Takli, Mankapur, Nagpur. 2) Sangita W/o Surendra Mendhe, Before Marriage Name Sandhya D/o. Ganpat Gaure, Aged - 48 years, Occu. Household, R/o. Plot No. 41, House No. 24, Jai Santoshi Mata Nagar, Lava, Nagpur.
V/s...
Non Applicant :

सदरहु अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे १८२७ अन्वये मयत मयत : a) Late Shri Ganpat S/o. Tulsiram Gaure, मयत दि. १६/०५/२०१३ R/o. Dattawadi, Nagpur b) Late Smt. Chandrakanta W/o. Ganpat Gaure, मयत दि. ०१/०१/२०१२ R/o. Nagpur Dist. Nagpur यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयातअर्ज दाखल केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर कामठी यांनी दि. १५/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर पेशी तारखेवर ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास a) Late Shri Ganpat S/o. Tulsiram Gaure, मयत दि. १६/०५/२०१३ R/o. Dattawadi, Nagpur b) Late Smt. Chandrakanta W/o. Ganpat Gaure, मयत दि. ०१/०१/२०१२ R/o. Nagpur Dist. Nagpur यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक / /२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी



## सायटेशन नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्र. ८१/२०२५ प्रोसेस क्र. १४२८/२०२५
पे.ता. १८-११-२०२५ दिनांक २५/१०/२०२५

अर्जदार : १. तुलसीदास डोमाजी पाटील, २. क्रिष्णा डोमाजी पाटील, ३. सुजाता भिमराव मेश्राम (सुजाता डोमाजी पाटील) सर्व रा. खलासी लाईन, आंबेडकर पुतळ्याजवळ, ता.कामठी, जि. नागपूर, ४. अमिता लेखचंद निकोसे (अमिता डोमाजी पाटील) रा. सुरज टाऊन जवळ, वैष्णवीदेवी नगर, वाठोडा लेआऊट, नागपूर जि. नागपूर
विरुध्द
गैरअर्जदार कोणीही नाही
मयतदार : १) डोमाजी गनुजी पाटील, मयत दि. ०९/०१/१९८९ २) यशोदाबाई डोमाजी पाटील, मयत दि. ०८/१२/२०१२

सदरहु अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे १८२७ कलम ८ प्रमाणे या न्यायालयात मयतदार १) डोमाजी गनुजी पाटील, मयत दि. ०९/०१/१९८९, २) यशोदाबाई डोमाजी पाटील, मयत दि. ०८/१२/२०१२, रा. खलासी लाईन, आंबेडकर पुतळ्याजवळ, ता. कामठी, जि. नागपूर यांचे वारसान सर्टीफिकेट मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार मयताचे वारसान नव्हे, असा कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर सदरहू मुदतीत सर्व संबंधित नातेवाईकांना व आम जनतेकडून योग्य ती हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास सदरहु न्यायालय अर्जदार यांचा सदरहु मयतदार १) डोमाजी गनुजी पाटील, मयत दि. ०९/०१/१९८९, २) यशोदाबाई डोमाजी पाटील, मयत दि. ०८/१२/२०१२, रा. खलासी लाईन, आंबेडकर पुतळ्याजवळ, ता. कामठी, जि. नागपूर हयांचे त्यांना वारसान प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी



## सायटेशन/पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. ३३/२०२५**

पे.ता. २०-११-२०२५ प्रोसेस क्र. १२०८/२०२५
दिनांक १०/१०/२०२५

अर्जदार : १) अमोल पंढरी मस्के, वय-३६ वर्षे, रा. मारोडी, तह. मौदा, जि. नागपूर, २) रोशन पंढरी मस्के, वय-३१ वर्षे, रा. मारोडी, तह. मौदा, जि. नागपूर, ३) सौ. माधुरी टेकराम बावनकर, वय-३४ वर्षे, रा. क्वॉर्टर नं. ६७/३, टाईप-२, ऑर्डनन्स फॅक्टरी एरिया, सावरी, पो. जवाहरनगर, तह. जि. नागपूर, ४) सौ. किर्ती चिरज बावनकुळे, वय-३३ वर्षे, रा. पो. कोदामेंढी, तह. मौदा, जि. नागपूर, ५) श्रीमती वेणु पंढरी मस्के, वय-५७ वर्षे, रा. मारोडी, तह. मौदा, जि. नागपूर
विरुद्ध
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : श्री. पंढरी तुळशीराम मस्के

सदरहु अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम VIII१८२७ अन्वये या न्यायालयात कायदशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. श्री. पंढरी तुळशीराम मस्के हे मौजा-मारोडी, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार श्री. पंढरी तुळशीराम मस्के ह्यांचा कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. श्री. पंढरी तुळशीराम मस्के यांचा मृत्यु दि. १२/०९/२००६ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक २०/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक/जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशीर वारसान प्रमाणपत्र) मंजुर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशान्वये
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर



RNINO-20789/71 | Mahasagar Nagpur

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.
**Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ | महासागर नागपूर

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**

# फटाक्यांची दहशत

मुंबई कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

दिवाळी आली आणि गेली. तुळशीच्या लग्नापर्यंत घरोघरी रंगीबेरंगी आकाश दिवे नाचत राहतील. यंदाच्या वर्षी दिवाळी सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडली.

पणत्या, रांगोळ्या, दिव्यांच्या माळा, फुले, फळे नि आकर्षक सजावटीची साधनसामुग्री, कपडे, साड्या, सुकामेवा, मिठाई, लाडू, चकल्या, करंजा, चिवडा आदींच्या रेडिमेड खरेदीसाठी सर्व बाजारपेठा फुलल्या होत्या.

अगदी सोन्या- चांदीच्या भावाने उच्चांक गाठला तरीही ज्वेलर्सच्या दुकानात तर आठवडाभर गर्दी होती. दरवर्षीप्रमाणे यंदाही फटाक्यांचे धूर आणि प्रचंड आवाजाने मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, वसई विरारच नव्हे तर राज्यातील लहान मोठी सर्व शहरे चार दिवस दणाणून गेली होती.

फटाक्यांचा किमती दरवर्षी वाढत आहेत आणि फटाक्याची खरेदीही त्याच वेगाने वाढत आहे. दिवाळी म्हणजे आनंदाचा उत्सव. दिव्यांचा सण. प्रकाशाचा उत्सव. पण प्रत्येक दिवाळीला फटाक्यांची दहशत वाढत आहे. या दहशतीचा त्रास प्रत्येक घरातील लहान मुलांना, वयस्कर लोकांना आणि पक्षी व प्राण्यांना होतो आहे.

दरवर्षी फटाक्यांमुळे आगी लागून वित्तहानी व प्राणहानी होत आहे. फटाक्यांमुळे अनेक जण जखमी होत आहेत. पण त्या विषयी लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष किंवा राज्यकर्ते व प्रशासन चिडीचूप बसत आहे, याचेच आश्चर्य वाटते.

देशाच्या राजधानी दिल्लीमधे गेल्या तीस वर्षांहून अधिक काळ फटाक्यांना बंदी आहे मग देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईमधे राज्यकर्ते आणि नोकरशहा फटाके उत्पादन लॉबीपुढे का शरणागती पत्करत आहेत? विषारी धूर ओकणाऱ्या व कानठळ्या बसविणारे आवाज करणाऱ्या फटाक्यांपासून रस्त्यांवर काय लाभ होतो हे तरी एकदा सरकारने जाहीर करावे.

वाहतुकीच्या रस्त्यांवर, चौकाचौकात, नाक्यानाक्यावर काहीही घडले तरी फटाके वाजविणारे वीर दौडत येतात. होळी- शिमगा, दहिहंडी, गणपती, दसरा ,दिवाळी, अशा सणासुदीला तेच तेच उत्साही लोक फटाक्यांचा माळा रस्त्यावर लावतात.

कुणाचा वाढदिवस, कोणाची विजयी मिरवणूक, गणपतीची आगमन मिरवणूक, गणपतीची विसर्जन मिरवणूक, क्रीकेट सामन्यातील विजय, फटाके उडवायला कारणे भरपूर मिळतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तर तीन चार महिन्यांवर आल्या आहेत. मग उमेदवारांचे नि पुढाऱ्यांचे स्वागत करण्यासाठी सर्वात आवाजी लक्ष वेधून घेणारे माध्यम म्हणजे फटाके. झिंदाबाद घोषणा देत आणि बँड पथकापुढे फटाक्यांच्या माळा लावत नेत्यांचे स्वागत केल्याशिवाय उत्साही कार्यकर्त्यांना चैन पडत नाही. अर्थात जे फटाके उडवतात, त्याच्या खिशातून पैसे जात नसतात. फटाक्यांचे पैसे देणारे नेत्यांचे समर्थक दुसरेच असतात.

फटाक्यांच्या आवाजाला आणि प्रदुषणाला विरोध करणाऱ्यांची संख्या खूप कमी असते. त्यामुळेच त्यांच्या विरोधाकडे पोलीस- प्रशासन दुर्लक्ष करीत असते. गणेशोत्सवात डिजे मुळे कान बहिरे होऊ शकतात तर दिवाळीत फटाक्यांच्या आवाजामुळे बहिरेपण, फुफ्फुसाचे व श्वसनाचे विकास होऊ शकतात.

उठसूठ नव्या पिढीच्या भवितव्यासाठी रस्त्यावर येणाऱ्या संघटना कधी फटाक्याचे आवाज आणि प्रदुषण यांविरोधात रस्त्यावर उतरल्या आहेत असे कधी घडले नाही.

दिवाळीच्या दिवसात मुंबईत लहानमोठ्या आगींच्या दोनशेहून जास्त घटना घडल्या. पोलीस कंट्रोल रूमचा रात्रभर फोन वाजत होता. पोलीस कंट्रोल रूम लोकांनी केलेल्या तक्रारी संबंधित पोलीस स्टेशनला कळवत पण पुढे त्याचे काय होते हे कुणालाच कळत नाही. पोलिसांनी तरी काय काय करायचे? पोलिसांची गाडी निघून गेली की पुन्हा मोठ्या आवाजाचे फटाके वाजवायला सुरूवात होते.

दिवाळीच्या चार दिवसात मुंबईने हवेतील प्रदुषणाने मर्यादा ओलांडली होती. त्यामागे फटाके हे एक प्रमुख कारण होते. देशात यंदाच्या दिवाळीत साडेसात हजार कोटीपेक्षा जास्त किमतीचे फटाके उडवले गेले किंवा त्यांची राख झाली.

ज्या देशात ऐंशी कोटी लोकसंख्येला पंतप्रधान दरमहा ५ किलो धान्य मोफत देतात, अनेक राज्यात लाडक्या बहिणींना दरमहा बाराशे पंधराशे भाऊबीज सरकारी खजिन्यातून दिली जाते, त्या देशाला साडेसात हजार कोटींचे फटाके उडवणे कसे काय परवडते?

ऐन दिवाळीत रॉकेट किंवा बाण हे निवासी इमारतीत वा टॉवर्समधे घरात घुसून तेथे आगी लागल्या आहेत. मग फटाक्यांवर नियंत्रण घालण्यासाठी महायुती सरकार आता कोणाच्या आदेशाची वाट पाहात आहे . बहुसंख्य समाज हा शांत आहे व फटाक्यांना विरोध करीत नाही, म्हणून सरकारने आवाज व प्रदुषण निर्माण करणाऱ्यांवर कोणती कारवाई करायची नाही का?

दहिहंडी खेळात मनोरे बनवताना कोसळून दरवर्षी दोन अडिचशे गोविंदा जखमी होतात. आता दिवाळीतही फटाक्यांमुळे तेवढेच जखमी होत आहेत.फटाके उडविणारे निर्बंधांना जुमानत नाहीत. ज्यांच्या अंगावर फटाके उडतात त्यांची त्यांना भिती वाटत नाही. त्यांना पोलिसांचा धाक राहीलेला नाही.

गुन्हे दाखल झाले तरी काहीही होणार नाही, अशी त्यांची मानसिकता बनलेली असते. घशाची खवखव व डोळ्यांची जळजळ निर्माण करणाऱ्या फटाक्यांची दहशत कधी नियंत्रित होणार?

# काळजी आणि समर्थन : मानवी संवेदनांचा सामाजिक पाया

२९ ऑक्टोबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन (International Day of Care and Support) म्हणून जाहीर केला आहे. २०२३ साली प्रथमच या दिवसाची घोषणा करण्यात आली आणि यामागचा उद्देश असा की, काळजी (Care) आणि समर्थन (Support) या मानवी जीवनातील मूलभूत पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या क्षेत्रांना जागतिक स्तरावर ओळख, मान्यता आणि धोरणात्मक प्राधान्य मिळावे. आजचा हा दिवस फक्त एक प्रतीकात्मक उत्सव नाही, तर तो मानवतेच्या अस्तित्वाचा, समाजाच्या एकतेचा आणि मानवी विकासाचा पाया असलेल्या काळजीच्या मूल्यांचा सामाजिक आराखडा आहे.

----------------

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर काळजी आणि समर्थन ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या रचनेतील सर्वात महत्त्वाची सांस्कृतिक, आर्थिक व भावनिक संस्था आहे. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीम यांनी मांडलेले सामाजिक ऐक्य (Social Solidarity) हे संकल्पनात्मक तत्त्व सांगते की प्रत्येक समाज टिकून राहण्यासाठी सदस्यांमधील नैतिक जबाबदारी, सहकार्य आणि परस्पर आदर आवश्यक असतो. काळजी आणि समर्थन ही या सामाजिक ऐक्याचीच व्यावहारिक रूपे आहेत.

आपण जेव्हा दुसऱ्याच्या आरोग्याची, दुःखाची, वृद्धापकाळाची, अपंगत्वाची किंवा बालकांच्या संगोपनाची जबाबदारी घेतो, तेव्हा आपण समाजाच्या नैतिक आरोग्याला बळ देतो. दुर्खीमप्रमाणे, समाज हे केवळ कायद्याने किंवा शासनाने चालत नाही; ते चालते ते सामाजिक मूल्यांवर, आणि काळजी ही त्यातील सर्वात महत्त्वाची मूल्यव्यवस्था आहे.

इतिहासात पाहिले तर काळजीची संकल्पना मानवी जीवनात आदिम समाजापासून आहे. एकत्र कुटुंब व्यवस्था, गावसमाजातील परस्पर साहाय्य प्रणाली, धार्मिक दानसंस्था या सर्व काळजीच्या सामाजिक संस्थाच होत्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर आणि आधुनिकतेच्या प्रवाहात, घरगुती क्षेत्रातील काळजीचे काम हळूहळू आर्थिक मूल्यांशिवाय, अदृश्य व अवमूल्यित झाले.

विशेषतः स्त्रिया या काळजीच्या कामात गुंतलेल्या राहिल्या, आणि या कामाला स्वाभाविक मानले गेले. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे लिंगाधारित श्रम विभाजन म्हणून ओळखले जाते. स्त्रीवादी समाजशास्त्रज्ञ आर्ली हॉच्सचाइल्ड (Arlie Hochschild) यांनी त्यांच्या 'The Managed Heart' या ग्रंथात 'Emotional Labour' ही संकल्पना मांडली.

त्यांनी दाखवून दिले की स्त्रिया फक्त शारीरिकच नव्हे, तर भावनिक श्रम देखील सतत करतात, काळजी घेणे, समजून घेणे, सहानुभूती दाखवणे हे सर्व त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. परंतु या श्रमाचे ना आर्थिक मूल्यमापन होते, ना सामाजिक सन्मान मिळतो.

याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन स्थापन करताना जगभरातील काळजी क्षेत्रातील असमानता आणि अवमूल्यन दूर करण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. UN Resolution A/RES/78/220 (2023) नुसार, काळजी आणि समर्थन क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे, कामगार हक्कांचे संरक्षण करणे, आणि लिंगभाव समानतेला चालना देणे हे या दिनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

जागतिक कामगार संघटना - २०२२ च्या 'Care Ot Work' अहवालानुसार, जगभरात सुमारे ३७७ दशलक्ष लोक काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यापैकी ७६ टक्के महिला आहेत. परंतु त्यांना मिळणारे वेतन, सुरक्षा आणि सामाजिक मान्यता अत्यल्प आहे.

भारतातील वास्तवही फार वेगळे नाही. घरगुती मदतनीस, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, वृद्ध व अपंगांच्या निगेसाठी काम करणाऱ्या महिला या सर्वजणी काळजी क्षेत्राचे अदृश्य आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामामुळे समाजाची आरोग्यव्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य टिकून आहे, तरीही त्यांचे श्रम सेवा म्हणून पाहिले जातात, काम म्हणून नव्हे.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5
@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

अमर्त्य सेन यांनी त्यांच्या Capability Approach मध्ये म्हटले आहे की व्यक्तीची क्षमता वाढवण्यासाठी समाजाला आधार आणि काळजी देणारी रचना आवश्यक आहे. जर समाजाने काळजीला प्राधान्य दिले नाही, तर विकास केवळ आकड्यांत मर्यादित राहतो, मानवी जीवनाच्या गुणवत्तेपर्यंत पोहोचत नाही.

समाजशास्त्रज्ञ पियरे बोरदियू (Pierre Bourdieu) यांच्या Social Capital संकल्पनेनुसार, समाजात परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामंजस्य या घटकांमुळे सामाजिक भांडवल तयार होते. काळजी आणि समर्थन हे या सामाजिक भांडवलाचे मूळ आहे.

ज्या समाजात काळजीचा अभाव आहे, तिथे तुटलेली नाती, एकाकीपणा आणि सामाजिक तणाव वाढतो. वृद्ध व्यक्तींना, अपंगांना किंवा आजारी लोकांना दुर्लक्षित करणारा समाज हा केवळ असंवेदनशीलच नाही, तर सामाजिकदृष्ट्या दुर्बलही ठरतो. म्हणून काळजी ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या स्थैर्याचा, समावेशकतेचा आणि मानवतेचा पाया आहे.

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत 'Care Economy' ही एक नवी संकल्पना उदयास आली आहे. ही अर्थव्यवस्था त्या सर्व सेवांवर आधारित आहे ज्या लोकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणासाठी आवश्यक आहेत. जसे की आरोग्यसेवा, बालसंगोपन, वृद्धांची देखभाल, शिक्षण, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक कार्य. UN Women (२०२३) च्या अहवालानुसार, जर देशांनी काळजी क्षेत्रात फक्त २ टक्के GDP इतकी गुंतवणूक केली, तर पुढील दशकात कोट्यवधी नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात.

म्हणजेच, काळजी आणि समर्थन हे आर्थिक विकासाचेही साधन आहे. कोविड-१९ च्या काळात काळजी क्षेत्राचे खरे महत्त्व जगाने अनुभवले. डॉक्टर, नर्स, साफसफाई कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, स्वयंसेवक यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता समाजाला जिवंत ठेवले.

पण या काळात त्यांना ज्या प्रकारे कमी वेतन, असुरक्षितता आणि थकवा सहन करावा लागला, त्यातून समाजातील काळजीच्या असमानतेचे चित्र समोर आले. ही महामारी एक आरसा होती, ज्यात आपल्याला दिसले की समाजाला चालवणारी खरी शक्ती काळजीच आहे, आणि तिच्याशिवाय विकास, प्रगती, तंत्रज्ञान हे सर्व रिकामे आहेत.

काळजी आणि समर्थन या संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या केवळ व्यक्तींमध्ये नव्हे, तर पिढ्यांमध्येही लागू होतात. वृद्धांचा सन्मान, बालकांचे संगोपन, अपंगत्वाचा स्वीकार, पर्यावरणाची काळजी ही सर्व पिढ्यानपिढ्यांची जबाबदारी आहे. इको-फेमिनिस्ट वंदना शिवा (Vandana Shiva) यांनी दाखवून दिले की स्त्रिया आणि निसर्ग या दोघांनाही काळजीच्या भावनेशी जोडले गेले आहे; म्हणून पर्यावरण संवर्धन, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक समता हे तिन्ही एकमेकांशी निगडित आहेत.

काळजी म्हणजे केवळ व्यक्तीची नाही, तर पृथ्वीचीही जबाबदारी घेणे आवश्यक आहे. भारतीय सांस्कृतिक परंपरेत सेवा, ममता, दया, सहाय्य, करुणा ही मूल्ये काळजीच्या संस्कृतीचा भाग आहेत. या तत्त्वात सर्व जीवांची काळजी घेण्याची भावना अंतर्भूत आहे. परंतु दुर्दैवाने, आधुनिक काळात या मूल्यांचा प्रत्यक्ष सामाजिक आचरणात अभाव दिसतो.

वृद्धाश्रमात राहणारे पालक, दुर्लक्षित अपंग नागरिक, मानसिक आरोग्याविषयी असलेला कलंक हे सर्व काळजीच्या संस्कृतीच्या क्षीणतेचे प्रतीक आहेत. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने काळजी ही नव्याने जागविण्याची गरज आहे. काळजी आणि समर्थन यांचे सामाजिक संस्थात्मकरण म्हणजेच धोरणात्मक पातळीवर त्यांना स्थान देणे.

भारतात राष्ट्रीय आरोग्य मोहिमा, वृद्ध आरोग्य मिशन, बालविकास योजना, दिव्यांग कल्याण योजना, मानसिक आरोग्य धोरण अशा अनेक योजना काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. मात्र या योजनांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांच्या सन्मान, वेतन आणि सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. काळजी कामगारांना ILO Convention १८९ अंतर्गत हक्क देणे, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, आणि प्रशिक्षण या बाबी सरकारच्या प्राधान्यक्रमात याव्यात.

आजच्या डिजिटल समाजात काळजीचे स्वरूपही बदलले आहे. टेलिहेल्थ, ई-काउंसिलिंग, ऑनलाइन सपोर्ट नेटवर्क्स या नव्या माध्यमांमुळे काळजीचा आवाका वाढला असला तरी, मानवी स्पर्श हरवण्याची भीतीही निर्माण झाली आहे.

समाजशास्त्रज्ञ झिग्मुंट बाऊमन (Zygmunt Bauman) यांनी 'Liquid Modernity' मध्ये म्हटले आहे की आधुनिक समाजात नाती द्रवरूप झाली आहेत, म्हणजेच स्थिरता, बांधिलकी आणि सहानुभूती कमी झाली आहे. म्हणून काळजीची नवी संस्कृती उभारण्यासाठी डिजिटल जगातही मानवी संवेदना जपणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन आपल्याला स्मरण करून देतो की काळजी हा विकासाचा पाया आहे. जेव्हा एक समाज आपल्या सर्वात दुर्बल घटकांची काळजी घेतो, तेव्हा तो खरोखर प्रगत ठरतो.

समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात कुटुंब, शिक्षण, आरोग्य, कामकाज, राजकारण, पर्यावरण यांची काळजी आणि समर्थन ही केंद्रस्थानी असली पाहिजेत. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे, तर काळजी ही मानवी नातेसंबंधांची सामाजिक संस्था (Social Institution of Human Relations) आहे; ती तुटली, तर समाजाचे मूल्यतंत्रच ढासळते.

शेवटी, काळजी आणि समर्थन म्हणजे केवळ भावनिक क्रिया नाही, तर ती एक सामाजिक, आर्थिक आणि नैतिक गुंतवणूक आहे. काळजी घेणारा समाज हा केवळ सभ्यच नव्हे, तर सशक्त, समावेशक आणि संवेदनशील समाज असतो.

म्हणूनच आजच्या या दिवसाचे महत्त्व असे की आपण काळजीला दया म्हणून नव्हे, तर सामाजिक न्याय म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक माणूस दुसऱ्याच्या कल्याणाची जबाबदारी घेईल, प्रत्येक संस्था मानवी सन्मानाचे रक्षण करेल, आणि प्रत्येक शासन काळजी क्षेत्राला प्राधान्य देईल तेव्हा तो दिवसच मानवतेचा खरा उत्सव ठरेल.

# राष्ट्रीय एकता दिवसाचे विशेष स्वरूप

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या वर्षी त्यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने हा दिवस भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. हा दिवस भारताच्या एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकजुटतेचे प्रतीक असून, ५६२ संस्थान एकत्रित येऊन आधुनिक भारताची पायाभरणी करणाऱ्या सरदार पटेलांच्या अद्वितीय कार्याला अभिवादन करणार आहे.

### भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम

या वर्षीचा उत्सव नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धीचा संगम असणाऱ्या गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकतानगर येथे आयोजित केला जाणार आहे. हे ठिकाण विविधतेत एकता या भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून निवडले गेले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल राज्य पोलीस दल आणि राष्ट्रीय कॅडेट कोर यांच्या सहभागाने भव्य परेड आणि सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे.


### राष्ट्रीय कॅडेट्स कोर आणि शालेय बँड यांचे सादरीकरण

या परेडमध्ये सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, भारत-तिबेट सीमा पोलीस, सशस्त्र सीमा बल तसेच आसाम, त्रिपुरा, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या पोलीस दलांचा सहभाग असेल. घोडदळ आणि उंटदळाचे संच, स्वदेशी जातींच्या श्वानांचे कौशल्य प्रदर्शन, मार्शल आर्ट सादरीकरणे आणि शस्त्रविरहित युद्धकौशल्याची प्रात्यक्षिके या परेडची शोभा वाढवतील.

महिला सक्षमीकरणावर विशेष भर देत, प्रधानमंत्री यांना दिल्या जाणाऱ्या गार्ड ऑफ ऑनरचे नेतृत्व एक महिला अधिकारी करतील. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल आणि केंद्रीय राखीव बल च्या महिला कर्मचाऱ्यांकडून मार्शल आर्ट आणि युद्धकौशल्याचे प्रभावी प्रदर्शन सादर केले जाईल. याद्वारे त्यांचे शौर्य, शिस्त आणि आत्मविश्वास प्रकट होईल.

राष्ट्रीय सुरक्षेत विशेष योगदान दिले आहे असे रामपूर हाउंड आणि मुधोल हाउंड हे स्वदेशी श्वान आपली कौशल्ये सादर करतील. विशेष म्हणजे, अखिल भारतीय पोलीस श्वान स्पर्धेत विजेती ठरलेली मुधोल हाउंड रिया या वर्षीच्या परेडमध्ये डॉग स्क्वाडचे नेतृत्व करेल.

याशिवाय, गुजरात पोलिसांचे घोडदळ, आसाम पोलिसांचा मोटरसायकल डेअरडेव्हिल शो, सीमा सुरक्षा बल चे उंटदळ आणि उंट बँड, तसेच एनसीसी कॅडेट्स आणि शालेय बँड एकतेतच शक्ती आहे... हा संदेश देत परेडमध्ये सहभाग घेतील. भारतीय वायुदलाच्या सूर्यकिरण पथकाकडून सादर होणारा भव्य एअर शो या परेडच्या भव्यतेत आणखी भर घालेल.





### विविधतेत एकता संदेश देणारे संचलन

राष्ट्रीय एकता दिनी परेडमध्ये विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे संचालन विविधतेत एकता या विषयाचे दर्शन घडवतील.

या संचालनात राष्ट्रीय सुरक्षा गार्ड, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, अंदमान-निकोबार बेटे, मणिपूर, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुदुचेरी यांच्या संचालनाचा समावेश असेल.

वर्षा फडके-आंधळे
उपसंचालक (वृत्त)

यासह सीमा सुरक्षा बल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सशस्त्र सीमा बल, दिल्ली पोलीस आणि विविध राज्य पोलीस दलांचे ब्रास बँड कार्यक्रमाच्या उत्सवी वातावरणात अधिक रंग भरतील.

या परेडमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दल चे पाच शौर्यचक्र विजेते आणि सीमा सुरक्षा बल चे १६ वीरता पदक विजेते सन्मानित केले जातील. या शूर जवानांनी नक्षलविरोधी आणि दहशतवादविरोधी मोहिमांमध्ये, तसेच पश्चिम सीमेवरील ऑपरेशन सिंदूर दरम्यान, अद्वितीय धैर्य आणि पराक्रमाचे प्रदर्शन घडविले आहे.

परेडसोबतच भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण करतील, ज्यातून भारताची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि विविधतेतील सौंदर्य अधोरेखित होईल.

राष्ट्रीय एकता दिनाचे उद्दिष्ट नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता, सौहार्द आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हे आहे. हा उत्सव प्रत्येक भारतीयाला या मूल्यांचा स्वीकार करण्यासाठी आणि देशाच्या ऐक्याच्या भावनेला बळ देण्यासाठी प्रेरित करतो.

१ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकतानगर येथे भारत पर्व आयोजित करण्यात येईल. या पर्वात संपूर्ण भारतातील सांस्कृतिक सादरीकरणे आणि खाद्य महोत्सव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये देशाच्या विविध परंपरांचा संगम पाहायला मिळेल. या पर्वाचा समारोप १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करून केला जाईल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आरएसएस
## समता आणि हिंदुत्व यांच्यातील वैचारिक संघर्ष




भारताच्या सामाजिक विचारविश्वात दोन प्रवाह कायम एकमेकांना छेद देत आले आहेत. एक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा आणि मानवमुक्तीचा विचार, आणि दुसरा म्हणजे आरएसएसचा हिंदुत्ववादी राष्ट्रवाद.

या दोन विचारप्रवाहांचा संघर्ष हा केवळ इतिहासातील प्रसंग नसून, तो आजही भारतीय लोकशाहीच्या आत्म्याला आकार देणारा संघर्ष आहे. एकीकडे आंबेडकरांचा विवेकाधारित, वैज्ञानिक, समतेवर उभा विचार आहे; तर दुसरीकडे आरएसएसचा संस्कृतीकेंद्रित, बहुसंख्याकवादी दृष्टिकोन आहे. या दोन विचारधारांचा संघर्ष म्हणजे भारताच्या आत्म्याचा संघर्ष म्हणजे मानवतेचा विरुद्ध अधिराज्याचा! भारताच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासात दोन प्रवाह सतत एकमेकांसमोर उभे राहतात.

एक म्हणजे समतेचा आणि मानवमुक्तीचा विचार, ज्याचे प्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत आणि दुसरा म्हणजे हिंदुत्वाचा विचार, ज्याचे प्रतिक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आहे. या दोन्ही विचारप्रवाहांमधील संघर्ष हा केवळ व्यक्तीगत नव्हता, तर तो भारतीय समाजाच्या आत्म्याशी संबंधित वैचारिक संघर्ष होता.

डॉ. आंबेडकर यांनी भारतातील हजारो वर्षांच्या जातिव्यवस्थेच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला समतेचे आणि न्यायाचे स्वप्न दाखवले. त्यांचा समाजदर्शनाचा पाया होता मानव माणसाचा शत्रू नाही, सर्व माणसे समान आहेत. ते धर्माकडे अंधश्रद्धा म्हणून नव्हे, तर सामाजिक पुनर्रचनेचे साधन म्हणून पाहत होते. म्हणूनच त्यांनी स्पष्ट सांगितले. मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.

त्यांच्यासाठी धर्म म्हणजे मानवतेचा, समतेचा आणि न्यायाचा मार्ग. म्हणूनच त्यांनी बुद्ध धमाचा स्वीकार केला, कारण तो विवेक, करुणा आणि समता शिकवतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समतेचे आणि मानवमुक्तीचे शिल्पकार होते.

एकात्मतेच्या नावाखाली सामाजिक अधिराज्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १९२५ पासून भारतात हिंदू राष्ट्र या संकल्पनेचा प्रचार केला. संघाच्या दृष्टीने हिंदुत्व हे केवळ धर्म नव्हे, तर संस्कृती आणि राष्ट्रभावना आहे. पण या विचारात समता नव्हती, तर बहुसंख्याकत्व आणि संस्कृतीचे एकरूपत्व यावर भर होता.

आरएसएसचा दृष्टिकोन असा होता की, भारतात राहणारे सर्व लोक हे हिंदू संस्कृतीचे वारसदार आहेत; त्यामुळे त्यांना हिंदू म्हणून स्वतःला ओळखले पाहिजे. हा विचार वरवर एकात्मतेचा भास देतो, परंतु प्रत्यक्षात जातिव्यवस्थेच्या पायावर उभ्या असलेल्या सामाजिक विषमतेला तो हात लावीत नाही. डॉ. आंबेडकर यांना हाच विरोध होता.

डॉ. आंबेडकर यांनी समाजाच्या रचनेत मूलभूत बदल करण्याची मागणी केली. ते म्हणाले, राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी सामाजिक आणि आर्थिक विषमता टिकली, तर ते स्वातंत्र्य टिकणार नाही. पण आरएसएसचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांच्या दृष्टीने संस्कृतीचे रक्षण हे सामाजिक बदलांपेक्षा अधिक महत्त्वाचे होते.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

या कारणाने डॉ. आंबेडकरांना आरएसएसचा हिंदुत्ववाद सामाजिक न्यायविरोधी वाटला. त्यांनी चेतावणी दिली होती की, हिंदू धर्माने जर आपले सामाजिक दोष दूर केले नाहीत, तर हा देश तुटेल. त्यांचा संघर्ष सत्तेसाठी नव्हे, तर समाजपरिवर्तनासाठी होता.

डॉ. आंबेडकरांचा मार्ग म्हणजे विवेक, बंधुता, समता आणि न्याय तसेच आरएसएसचा मार्ग म्हणजे संस्कृती, राष्ट्रभक्ती, हिंदू एकात्मता. एका मार्गाचा उद्देश मानवाला मुक्त करणे होता, तर दुसऱ्याचा उद्देश संस्कृतीच्या चौकटीत सर्वांना सामावून घेणे हा होता. या दोन विचारसरणींच्या संघर्षातून भारतीय लोकशाहीचा चेहराच ठरला.

आजही समाजात धर्माच्या नावावर द्वेष पसरवला जातो, अल्पसंख्याकांवर अन्याय होतो, आणि जातिव्यवस्था नष्ट झाली नाही. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांचा समतेचा संदेश आज अधिकच महत्त्वाचा ठरतो. त्यांनी सांगितलेला संविधान हा माझा धर्मग्रंथ आहे, हा संदेश विसरता कामा नये. आरएसएसच्या हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेपेक्षा डॉ. आंबेडकरांची मानव राष्ट्राची कल्पना अधिक व्यापक, न्यायपूर्ण आणि लोकशाहीप्रधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आरएसएस यांच्यातील संघर्ष हा केवळ धार्मिक नव्हता, तर तो मानवमुक्ती विरुद्ध सामाजिक अधिराज्य यांच्यातील होता.

आंबेडकरांचा विचार हा समतेचा दीपस्तंभ आहे, जो भारतीय लोकशाहीला दिशा देतो; तर आरएसएसचा विचार हा एकरूपतेच्या अंधारात समाजाला मागे ओढणारा आहे. आजच्या पिढीने ठरवायचे आहे. आपण हिंदू राष्ट्राचे नागरिकह्व होऊ इच्छितो का, की समतेच्या भारताचे नागरिक? डॉ. आंबेडकरांनी दाखवलेला मार्ग स्पष्ट आहे. समता, बंधुता आणि स्वातंत्र्य हेच खरे धर्माचे रूप आहे.

आजच्या भारतात संविधानाचे मूल्य आणि लोकशाहीचे तत्व यांवर प्रश्नचिन्ह उभे राहत असताना, डॉ. आंबेडकरांची समतेवरील श्रद्धा आणि बंधुत्वाचा संदेश पुन्हा जिवंत करणे अत्यावश्यक आहे. संविधानाचा धर्म आणि हिंदुत्वाचा विचार, हे दोन मार्ग आजही आपल्या समाजासमोर उभे आहेत.

एक मार्ग न्याय, समानता आणि स्वातंत्र्याकडे नेतो; तर दुसरा मार्ग बहुसंख्याकतेच्या एकाधिकाराकडे. आता निर्णय आपल्या हातात आहे. आपण हिंदू राष्ट्राचे अनुयायी व्हायचे की समतेच्या भारताचे नागरिक व्हायचे? कारण इतिहास साक्ष आहे. ज्यांनी समतेचा मार्ग निवडला, त्यांच्याच हातात भविष्याचे लेखन असते.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## पेंच व्याघ्रप्रकल्पलगतच्या भागात
# वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्रप्रकल्पालगतही आता मानव-वन्यजीव संघर्षाची सुरुवात झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे शेतात काम करणाऱ्या महिलेवर वाघाने हल्ला केला. यात महिलेचा जागीच मृत्यू झाला.

मंगळवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास देवलापार वनपरिक्षेत्राअंतर्गत मौजा देवलापार येथील शेतात कापूस काढत असताना लोहडोंगरी येथील रहिवासी विमला ईनवाते यांच्यावर वाघाने हल्ला केला. देवलापार येथील कक्ष क्र. ५८१ राखीव वनालगतच्या शेतात महिलेला ओढत नेऊन वाघाने ठार मारले. वनखात्याने याठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावले आहे.



दुपारी दीड वाजताच्या सुमारास विमला ईनवाते यांचा मृतदेह शवविच्छेदनाकरिता रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृतदेह अंत्यविधीकरिता पोलिसांमार्फत कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. मृतकांच्या वारसदारांना तातडीने नुकसान भरपाई म्हणून दहा लाख रुपयाचा धनादेश देण्यात आला.

प्रादेशिक वनविभागाच्या उपवनसंरक्षक डॉ. विनीता व्यास यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक जी.एफ. लुचे यांनी हा धनादेश कुटुंबीयांच्या स्वाधीन केला. याप्रसंगी पोलीस उपअधीक्षक संतोष कायगवाड, वनपरिक्षेत्र अधिकारी एस.बी. टूले, वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एस. बन्सोड, वनपरिक्षेत्र अधिकारी शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी ठाकरे उपस्थित होते. यावेळी उपवनसंरक्षक डॉ. विनीता व्यास यांनी सदर परिसरात गस्त घालून व्याघ्र सनियंत्रण करण्याचे आदेश क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना दिले. तसेच स्थानिक ग्रामस्थांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील मानव-वन्यजीव संघर्ष वाढीस लागला आहे. मागील पाच वर्षांत जिल्ह्यात १७५ नागरिकांचा वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. २०२५ मधील अवघ्या सहा महिन्यांत २५ ग्रामस्थांचा बळी गेला. आताही गेल्या नऊ दिवसात चार ते पाच जण वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडले. पेंच व्याघ्रप्रकल्पाच्या बफरसह प्रादेशिक मध्येही वाघांच्या हल्ल्यात वाढ झाली आहे. येथेही वाघाच्या हल्ल्यात जनावरांसह मानवी मृत्यूची संख्या वाढत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाप्रमाणेच नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्रप्रकल्पात देखील पर्यटन प्रवेशद्वाराची संख्या वाढत आहे. अतिरिक्त पर्यटनामुळे वाघांच्या अधिवासावर गदा येऊन वाघ जंगलाबाहेर पडत आहेत. परिणामी येथेही मानव-वन्यजीव संघर्ष वाढत आहे.

# दर्जाहीन कृत्रिम वाळूवर टाच!

**एम-सँड धोरणात मोठी सुधारणा**

**निकृष्ट वाळूवर कारवाई**

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा (एम सँड) वापर वाढवा तसेच दर्जाहीन कृत्रिम वाळूवर थेट कारवाई व्हावी, यासाठी मूळ धोरणात सुधारणा करण्यात आली असून, एम सँड युनिटला मान्यता तसेच यापद्धतीच्या युनिटला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय मर्यादा ५० वरून १०० युनिटपर्यंत नेण्याचा मंत्रालयपातळीवरील हक्क जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, एम सँड युनिटसाठी दिलेल्या अटींचे व गुणवत्तेचे उल्लंघन केल्यास प्रथम परवाना निलंबित करून, नंतर कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारणेचा शासन निर्णय जारी करत, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अंमलबजावणीबाबतचे दिशानिर्देश देणारे पत्र दिले आहे. नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळू वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या राज्य सरकारच्या धोरणात करण्यात आलेली सुधारणा सांगून मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यातील स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासोबतच एम-सँडच्या गुणवत्तेवर भर देणारे महत्त्वाचे बदल केले आहेत. तसेच याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना धोरण अंमलबजावणीचेही अधिकार देण्यात आला.



बांधकामाचा दर्जा राखला जावा यासाठी, एम-सँडच्या गुणवत्तेबाबत अत्यंत कठोर नियम लागू करण्यात आले आहेत. सर्व एम-सँड युनिटधारकांना भारतीय मानक ब्युरो (BSI) आणि भारतीय मानकांनुसार (IS Codes) उत्पादन करणे बंधनकारक राहील. जिल्हाधिकाऱ्यांच्या पथकामार्फत होणाऱ्या तपासणीत, जर एम-सँड या मानकांनुसार आढळले नाही, तर संबंधित युनिटचा परवाना सहा महिन्यांसाठी निलंबित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.
निलंबनानंतरही पुन्हा निकृष्ट दर्जाची वाळू उत्पादन केल्याचे आढळल्यास, हा परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल.

प्रत्येक जिल्ह्यात एम-सँड युनिट स्थापन करणाऱ्या पहिल्या ५० उद्योजकांना किंवा संस्थांना शासकीय सवलती लागू राहतील, मात्र भौगोलिक परिस्थिती आणि अर्जांची संख्या पाहून, जिल्हाधिकाऱ्यांना ही मर्यादा शंभर युनिट्सपर्यंत वाढवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

शासकीय जमिनीचा एम-सँड युनिटसाठी लिलाव करताना, त्यात केवळ महाराष्ट्रात नोंदणीकृत संस्थांनाच भाग घेता येईल. नवीन उद्योजकांना संधी मिळावी, यासाठी ज्यांच्या नावे आधीच खाणपट्टा मंजूर आहे, अशा व्यक्ती किंवा संस्थांना या लिलावात अपात्र ठरवण्यात येईल. या युनिट्ससाठी ५ ते १० एकरपर्यंत जागा मंजूर केली जाईल आणि एका वर्षाच्या आत युनिट कार्यान्वित करणे बंधनकारक असेल.

## दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २८ :** रस्त्याने पायदळ जात असलेल्या तरुणाला भरधाव असलेल्या मोटारसायकलस्वाराने जबर धडक दिली. यात गंभीर जखमी तरुणाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत घडली. राजकुमार श्रीचंद कोहरे (३५) असे मृताचे नाव आहे.

राजकुमार हा मोलमजुरीचे काम करीत होता. सोमवारी सायंकाळी तो घरून बाहेर फिरायला निघाला होता. धरमनगर रोडने जात असताना श्रीराम चौकात मोटारसायकल चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून राजकुमारला जबर धडक दिली. यात डोक्याच्या भारावर खाली सीमेंट रस्त्यावर पडल्याने राजकुमार गंभीर जखमी झाला. आसपासचे लोक त्याच्या मदतीला धावले. त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## मुंबईकरांच्या सेवेत १५० बेस्ट बस



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** महाराष्ट्रातील परिवहन सेवांना गती देण्यासाठी आणि आधुनिक करण्यासाठी राज्य सरकारने एसटीच्या ताफ्यात ५००० नवीन बसेस समाविष्ट करण्याची घोषणा केली आहे, ज्या टप्प्याटप्प्याने सेवेत येत आहेत.

याच प्रयत्नांचा भाग म्हणून, आज मुंबईतील बेस्ट उपक्रमासाठी १५७ नवीन इलेक्ट्रिक बसगाड्यांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या बस मुंबईतील २१ मार्गांवर धावणार असून, अंदाजे १.९ लाख मुंबईकर प्रवाशांना त्याचा थेट लाभ होणार आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपल्या मुंबईकरांना अधिक सोयीच्या गाड्या दिल्या पाहिजे आणि प्रदूषण कमी केले पाहिजे. ५००० बस घेण्याचा निर्णय झाला, टप्प्या टप्प्याने या येत आहेत. कर्मचारी समाधानी असतील तर सेवा उत्कृष्ट होईल असे मानणारे आम्ही आहोत. सिंगल तिकीट वर आपण गेले आहोत, बेस्टला आपल्या पायावर उभ राहण्यासाठी नॉन फेअर बॉक्सची मदत होईल.

## पोलीस मुख्यालयातील शिपायाकडून
# तरुणीचा लैंगिक छळ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** सातारातल्या फलटणमधील महिला डॉक्टरचा लैंगिक छळ आणि आत्महत्येचे हे प्रकरण ताजे असताना आता असाच प्रकार नागपुरातही उघडकीस आला. एका २३ वर्षीय तरुणीने पोलीस शिपायावर लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप केल्याने पोलीस आयुक्तालयात खळबळ उडाली आहे.

लग्नाचे आमिष दाखवून तो आपल्यावर दिड वर्षांपासून लैंगिक अत्याचार करत असल्याची तक्रार तरुणीने पोलीस आयुक्तालयांकडे केली आहे. या प्रकरणी तीन आठवड्यांपूर्वी ही तरुणी पोलीस ठाण्यात फिर्यादही घेऊन गेली होती. मात्र तिला ठाण्याने पिटाळून लावले. त्यानंतर तरुणीने पोलीस आयुक्तालयांकडे दाद मागितली. आयुक्तांनी हे प्रकरण भरोसा सेलकडे पाठवले. तेथेही तडजोड न झाल्याने अखेर तरुणीच्या तक्रारीवरील कपीलनगर पोलिसांनी पोलीस शिपायाविरोधात गुन्हा दाखल केले.

उमेश शेळके (२६) असे लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल झालेल्या नागपूर पोलीस मुख्यालयात कार्यरत पोलीस शिपायाचे नाव आहे. पोलीस लाईन टाकळीत एका खानावळ चालवणाऱ्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून उमेश शेळके गेल्या काही दिवसांपासून शोषण करत होता. मुलीने लग्नासाठी दबाव टाकला असता तो टाळाटाळ करू लागला. त्यामुळे तरुणीने पोलीस ठाणे गाठत तक्रार केली. कपीलनगर पोलीसांनी उमेशवर गुन्हा दाखल केला. याची कुणकूण लागलाच उमेश शेळके फरार झाला. त्याने दोन दिवसांपूर्वी केलेला अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लागला. आता पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.


## महिला डॉक्टर आत्महत्येचे
# दिल्लीत तीव्र पडसाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** सातारा जिल्ह्यातील फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांनी काही दिवसांपूर्वी वरिष्ठांच्या दबावामुळे आत्महत्या केली होती. या घटनेच्या निषेधार्थ कॉंग्रेस आक्रमक झाली असून, राजधानी दिल्लीत कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू केले आहे.

दिल्ली येथे युवा कॉंग्रेस कडून फलटण प्रकरणाच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मृत डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी यावेळी कार्यकर्त्यांनी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा जाळण्यात आला. कार्यकर्ते बॅरिकेड्सवर चढले तसेच देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

फलटण येथील डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या घटनेनंतर कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील ट्विट करत निषेध नोंदवला होता. साताऱ्यातील घटना कोणत्याही सुसंस्कृत समाजाच्या विवेकाला हादरवून टाकणारी असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले. एक होतकरु डॉक्टर भ्रष्ट व्यवस्थेतील गुन्हेगारांच्या छळाचा बळी ठरली. गुन्हेगारांपासून जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली, त्यांनीच हा सर्वात घृणास्पद गुन्हा केला, असे ते म्हणाले.






























महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ बुधवार, दि. २९, ऑक्टोबर २०२५ ■

## निष्काळजीपणामुळे मदतनिसाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

सीव्हर टँक रिकामे करताना विजेचा जबर धक्का बसल्याने मदतनीसाचा मृत्यू प्रकरणात पोलिसांनी तिघांवर निष्काळजीपणामुळे मृत्यूचा गुन्हा नोंदविला आहे. मृतक पवन चंद्रशेखर बरटकर (२५) रा. हिवरीनगर हा गत शनिवारच्या दुपारी जबलपूर-हैदराबाद आऊटर रिंगरोडच्या तरोडी गावात सीव्हर टँक रिकामे करण्याचे काम करीत असताना ही घटना घडली होती. परितोष लाऊत्रे (३९) रा. राणी दुर्गावती चौक, मदतनीस रोहित लाऊत्रे (३०) आणि आशिष बांगर (३०) अशी आरोपींची नावे आहेत.

पवनचे वडील चंद्रशेखर यांच्या तक्रारीनुसार, पवन गत ४ महिन्यांपासून आर्यन पंप ॲन्ड एन्वायरी सोल्यूशन प्रा. लि. कंपनीच्या नागपूर शाखेत मदतनीस म्हणून कामाला होता. वाठोडातील चिराग कोल्ड स्टोरेजचे गटार स्वच्छ करण्यासाठी त्याला ठेवण्यात आले होते. नियमानुसार, सीव्हर टँक वाहन क्र. एमएच-४२/एक्यू-७३६८ कंपनीने सांगितलेल्या पोहरा नदीच्या काठावरील महानगरपालिकेच्या पंपिंग स्टेशनवर रिकामा करायचा होता. मात्र टँक चालक परितोष, मदतनीस रोहित आणि आशिष यांनी आऊटर रिंगरोडवरील तरोडी गावच्या फोर लेन ढाब्याजवळ वाहन नेले. तेथे हायटेंशन विद्युत वाहिनीखाली वाहन उभे करून पवनला टँक रिकामा करण्यास सांगितले. वाहनाचे हायड्रोलिक लीव्हर दाबताच टँक वर जाऊन हायटेंशन विद्युत वाहिनीच्या संपर्कात आला. पवनला विजेचा जबर धक्का बसला आणि घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. यात त्याच्यासोबत काम करणाऱ्या वरील आरोपींचा निष्काळजीपणा पुढे आला.

### सावनेर कोलार नदीचे पुनरुज्जीवन संदर्भात पंकजा मुंडे यांचा सकारात्मक प्रतिसाद

## निधी उपलब्ध करुन देण्याचे आ. डॉ. देशमुखांना आश्वासन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



सावनेर नगरातील अत्यंत महत्वाची कोलार नदीला पूर्णपणे प्रदूषण मुक्त करून बारमाही स्वच्छ जलप्रवाह आणि एक जिवंत समृद्ध पर्यावरण युक्त नदीचं वास्तविक रूप प्रदान करण्याच्या उद्देशाने आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी आज 28 ऑक्टोबर रोजी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची मंत्रालयात भेट घेऊन सावनेर कळमेश्वर तालुक्यातून वाहणाऱ्या कोलार नदीच्या सावनेर नगरपरिषद क्षेत्राअंतर्गत वाहणाऱ्या 5 की. मी. प्रवाह मार्गाचे, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था नागपूर यांच्या सहयोगाने नियोजित कोलार नदी पुनरूज्जीवन प्रकल्पास, महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरणातर्फे निधी उपलब्ध करून देण्याबाबत भेट घेउन निधी उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन दिले.

त्यावर मंत्री पंकजा मुंडे यांच्याशी सविस्तर चर्चा झाली, आमदार डॉ. आशिषराव देशमूख यांनी कोलार पुनरूज्जीवन किती महत्वाचे आहे हे मंत्री पंकजा मुंडे यांना पटवून दिले त्यावर मंत्री पंकजा मुंडे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कोलार नदी पुनरूज्जीवन प्रकल्पास तत्वतः मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले.

शहरातील सामाजिक संघटना समर्पण फाउंडेशन तर्फे वर्ष 2019 मध्ये सुरू करण्यात आलेल्या "कोलार पुनरुज्जीवन अभियान" या मोहिमेला सावनेर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या सामर्थ्याची साथ मिळाल्याने एक निर्णायक स्वरूप प्राप्त झालं आहे. आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी अनेक वर्षांपासून दुर्लक्षित कोलार नदी संवर्धनाच्या या अत्यंत महत्त्वपूर्ण व भावनिक विषयाचे महत्त्व जाणून तात्काळ कार्यवाही करत राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संस्थान (निरी) नागपूर, येथे कोलार नदीच्या पुनरुज्जीवन व कोलार नदीची नैसर्गिक परिसंस्था पुनर्संचित करण्याच्या दिशेने योग्य ती उपाययोजना तयार करण्याबाबत निरीच्या उच्चपदस्त अधिकारी व वैज्ञानिकांसोबत मुख्याधिकारी नगरपरिषद सावनेर आणि समर्पण फाउंडेशनच्या सदस्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली होती.

यामध्ये कोलार नदी पूर्णपणे प्रदूषण मुक्त करून कशाप्रकारे पुन्हा एकदा तिला स्वच्छ जलधारिणी बनवता येईल यावर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली होती. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहयोगाने निरीच्या तज्ञ वैज्ञानिकांच्या मार्गदर्शनात दीर्घकाळ टिकणारी पर्यावरण पूरक उपायोजना राबवून सावनेर शहरातून पुन्हा एक स्वच्छ समृद्ध पर्यावरण असलेली कोलार नदी प्रवाहित व्हावी अशी इच्छा यावेळी त्यांनी व्यक्त केली. जिव्हाळ्याच्या असलेल्या कोलार नदी संवर्धनाच्या विषयावर लक्ष दिल्यामुळे समर्पण फाउंडेशन व शहराच्या सर्व स्तरावरील नागरिकांकडून आमदार आशिष देशमुख यांचे कौतुक करण्यात येत आहे.

### ट्रॅव्हल्स बसच्या कार्यालयावर धाड

## प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

गणेशपेठ पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर एका ट्रॅव्हल्स बसच्या कार्यालयावर धाड टाकून मोठ्याप्रमाणात प्रतिबंधित तंबाखू आणि पान मसाला जप्त केला. चौकशीत हा माल मध्यप्रदेशातून आल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी ३ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून एकाला अटक केली. आशिष तानाजी पालकर (३३) रा. रतन कॉम्प्लेक्स, गणेशपेठ, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

रात्री ११.३५ वाजताच्या सुमारास गणेशपेठ पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान जाधव चौकातील हंस ट्रॅव्हल्सच्या बसने प्रतिबंधित तंबाखू आणि पान मसालाची तस्करी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी अन्न सुरक्षा अधिकाऱ्याला या बाबत माहिती देऊन हंस ट्रॅव्हल्सच्या कार्यालयावर धाड टाकली. पंचासमोर कार्यालयात हजर आशिष पालकरला ताब्यात घेऊन कार्यालयाची झडती घेतली असता मोठ्याप्रमाणात प्रतिबंधित तंबाखू आणि पान मसाला मिळाला. मालाबाबत पालकरची चौकशी केली असता त्याने आशिष नावाच्या व्यक्तीने हा माल मध्यप्रदेशातून ट्रॅव्हल्स बसमधून सूरज नावाच्या व्यक्तीसाठी पाठवल्याची माहिती दिली. पोलिसांनी सर्व माल जप्त करून अन्न सुरक्षा अधिकारी अमर सोनटक्के यांच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

## सिनर्जी फिटनेसच्या नव्या शाखेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

प्रसिद्ध सेलिब्रिटी ट्रेनर अजिंक्य वखरे यांच्या मालकीचा फिटनेस ब्रँड सिनर्जी फिटनेस आता आपल्या नव्या शाखेसह नागपुरात विस्तारत आहे. या नव्या शाखेचे वैशिष्ट्य म्हणजे तीसरी शाखा देवेंद्र फडणवीस साहेबांच्या मतदारसंघात सुरू होत आहे.

या निमित्ताने अजिंक्य वाखरे यांनी स्वतः फडणवीस साहेबांची भेट घेतली व त्यांना या नव्या उपक्रमाची माहिती दिली. अजिंक्य वखरे यांनी सांगितले की, नागपूरच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या जीमच्या स्वतःच्या शाखा उघडल्या जात आहेत, आणि हे सिनर्जी फिटनेससाठी एक मोठं पाऊल आहे. फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, जर वेळ मिळाला तर या नव्या शाखेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्याची त्यांची इच्छा आहे. हि बाब सिनर्जी फिटनेस आणि संपूर्ण टीमसाठी अत्यंत अभिमानाची आहे.

## मनपाच्या २९ सफाई कर्मचाऱ्यांचे निलंबन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील विनापरवानगी सातत्याने गैरहजर असणाऱ्या २९ सफाई कर्मचाऱ्यांवर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या आदेशानुसार निलंबनाची कारवाई करण्यात आली.

नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील सफाई मजदुरांच्या अनुपस्थितीबाबत तक्रारी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांना वारंवार प्राप्त होत होत्या. आयुक्तांनी दिलेल्या निर्देशांनुसार, गेल्या २० ऑक्टोबरला दहाही झोन अंतर्गत प्रभागनिहाय हजेरी स्टँडवरील सफाई मजदुरांच्या हजेरी रजिस्टरची तपासणी करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी वारंवार हजेरी पॉईंटला भेटी देऊन सफाई कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची पडताळणी केली होती. या तपासणी दरम्यान हजेरी रजिस्टर मध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या नावासमोर गैरहजर बाबत नोंद असलेल्या कर्मचाऱ्यांची पडताळणी केल्यानंतर २० दिवस व त्यापेक्षा अधिक दिवसापासून गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

## सबलीने वार करून वडिलांची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

एका गुंड प्रवृत्तीच्या मुलाने डोक्यावर सबलीने वार करून वडिलांची हत्या केली. त्यानंतर स्वतः ठाण्यात पोहोचून पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. ही थरारक घटना पारडीच्या भांडेवाडी परिसरात घडली. नारायण दामोजी आरमोरीकर (५२) रा. भांडेवाडी रेल्वे स्टेशनजवळ असे मृताचे नाव आहे. पवन उर्फ नेगू आरमोरीकर (२६) असे अटकेतील तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवन हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. त्याच्याविरुद्ध जीवघेणा हल्ल्यासह ८ गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. एका प्रकरणामध्ये तो तुरुंगातून २ महिन्यांपूर्वीच बाहेर आला होता. तो आई आणि बहिणीसोबत राहतो, तर नारायण एका खोलीत एकटे राहात होते. त्यांची मानसिक स्थिती बरोबर नव्हती. कचऱ्यातून प्लॅस्टिक आणि लोखंड वेचून स्वतःचा उदरनिर्वाह करीत होते. त्यांना दारूचेही व्यसन होते. ते नेहमी पवनला दारू पिण्यासाठी पैसे मागत होते. पैसे मिळाले नाहीतर शिविगाळ करीत होते. मंगळवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारासही त्यांनी पवनला दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पवनने पैसे देण्यास नकार दिला असता शिविगाळ करू लागले. सतत होणाऱ्या या प्रकाराला पवन कंटाळला होता. त्याने रागात नारायण यांना घरातून बाहेर जाण्यास सांगितले. नारायण यांनी बाहेर निघतानाही पवनला अश्लील शिविगाळ केली. आधीच रागात असलेल्या पवनचा पारा चढला. त्याने घरात ठेवलेली सब्बल काढून नारायण यांच्या डोक्यावर वार केला. नारायण रक्तबंबाळ होऊन खाली कोसळले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. वडिलांची हत्या करून पवनने थेट पारडी पोलिस स्टेशन गाठले. वडिलांवर सबलीने वार करून जिवे मारल्याची माहिती दिली. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना केला.

## महावितरणची नवी ऊर्जा

### 'ग्राहक देवो भवः' साठी मनुष्यबळात क्रांती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



महावितरणने नुकतीच लागू केलेली सुधारित मनुष्यबळ पुनर्रचना केवळ कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर 'ग्राहक देवो भवः' या तत्त्वानुसार प्रत्येक वीज ग्राहकाला समर्पित, जलद आणि उत्कृष्ट सेवा देण्यासाठीच आहे, असे स्पष्ट मत महावितरणचे संचालक (संचलन तथा प्रकल्प) सचिन तालेवार यांनी व्यक्त केले.

नागपूर येथील महावितरणच्या विद्युत भवन मुख्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. नागपूर परिमंडळात मागील दोन आठवड्यांपासून लागू असलेल्या या मनुष्यबळ पुनर्रचनेचा सखोल आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी तालेवार यांनी पुनर्रचनेचे उद्दिष्ट स्पष्ट केले की, "यापूर्वी वीज अभियंते आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांवर वीजपुरवठा, वीजबिल वसुली अशा अनेक कामांचा मोठा ताण होता. नव्या पुनर्रचनेत कामाचा हा ताण कमी करून कर्मचाऱ्यांवर निवडक आणि केंद्रित स्वरूपाच्या कामांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल आणि याचा थेट सकारात्मक परिणाम ग्राहकांना मिळणाऱ्या दर्जेदार सेवेवर होईल."

संचालक तालेवार यांनी यावेळी कर्मचाऱ्यांना बदल मनापासून स्वीकारण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "ग्राहकांना महावितरणकडून उत्तम सेवेची खूप अपेक्षा आहे. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी सेवेप्रती व्यावसायिक दृष्टिकोन बाळगणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करा, तक्रारींचा निपटारा वेळेत करा आणि वसुलीचे लक्ष्य शंभर टक्के गाठा."

महावितरणने पुनर्रचनेचे प्रारूप लागू करताना ते अधिकाधिक प्रभावी कसे होईल यावर भर दिला आहे. तालेवार यांनी या बदलांच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या पारिस्थितिनुसार दुरुस्ती करण्याची तयारी दर्शवली. त्यांनी यावेळी कर्मचारी आणि अधिकारी वर्गाला आवाहन केले की, "पुनर्रचना अधिकाधिक ग्राहक केंद्रित होण्यासाठी आपल्याला बदल आवश्यक वाटत असल्यास, त्याची निकड आणि कारण स्पष्ट करून तुमच्या सूचना जरूर द्या."

## नवीन नागपूर प्रकल्पाच्या भुसंपादन विरोधात शेतकरी आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २८ :




तालुक्यातील लाडगाव (रिठी) व गोधनी (रिठी) येथे १७०० एकरावर नवीन नागपूर प्रकल्पासाठी जमीन भुसंपादन करण्यात येत आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या बाजारभावाच्या पाचपट दर जमिनीला द्यावा व दोन हजार स्क्वेअर फुट प्लॉट प्रकल्पात देण्यात यावा, या प्रमुख मागण्या सरकार पुढे मांडण्यात आल्या आहे. एमएम आरडीए सुरू केलेल्या भूसंपादन प्रक्रिये विरोधात ८०० एकरातील शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला आहे. सरकारने न्याय न दिल्यास आंदोलन करण्याचा पवित्रा शेतकरी हाती घेणार असल्याची माहिती प्रकल्प बाधित शेतकरी समितीचे सदस्य किशोर आष्टणकर यांनी आज (ता.२८) पत्रकार परिषदेत दिली.

प्रकल्प बाधित शेतकऱ्यांची व्यथा मांडताना किशोर आष्टणकर यांनी पुढे सांगितले की, नागपूर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेला नवीन नागपूर येथील आंतरराष्ट्रीय व व्यावसायिक वित्तीय केंद्र विकसित करण्यासाठी लाडगाव व गोधनी येथील शेत जमीन वाटाघाटी द्वारे थेट खरेदी पद्धतीने करण्याबाबत २२ ऑक्टोबर २०२५ ला नोटीस दिला आहे. या नोटीसवर शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला आहे. याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री, महसूल मंत्री, पालकमंत्री, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नागपूर (ग्रामीण) व्यवस्थापकीय संचालक नागपूर प्रदेश विकास प्राधिकरण यांना देण्यात आले आहे.

आक्षेपामध्ये महानगर आयुक्त नागपूर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेला नवीन नागपूरचा नकाशा महाराष्ट्र रिजनल टाउन प्लॅनिंग १९६० प्रमाणे जाहीर करण्यात आला नाही. प्रस्तावित नकाशात आमची शेतजमीन नवीन नागपूरसाठी आरक्षित करण्यात आली नाही.

त्याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली नाही, शेतजमीन ग्रीन झोन मध्ये असून ती शेती विषयक जमीन आहे. आज पर्यंत तिला येलो बेल्ट किंवा कमर्शियल झोन मध्ये टाकण्यात आले नाही. खाजगी जमीन वाटाघाटी द्वारे थेट खरेदी पद्धतीने कोणत्या भूसंपादन अधिनियमाखाली देण्याचे प्रस्तावित आहे, याबाबत नोटीस मध्ये उल्लेख नाही.

जमिनीच्या भूसंपादनासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे प्रस्तावित नवीन नागपूर अंतर्गत आंतरराष्ट्रीय व्यावसायिक वित्तीय केंद्र विकसित केल्यानंतर बाधित होणाऱ्या शेतकरी व शेतमालक यांचे पुनर्वसनासाठी कोणतीही तरतूद कायदेशिरित्या करण्यात आली नाही. भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम ४ प्रमाणे शासनाला भूसंपादन करण्याअगोदर सोशल इम्पॅक्ट असेसमेंटचा अभ्यास करून त्याबाबत अहवाल तयार करणे आवश्यक आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी कुठेही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न झाल्याने भूसंपादनाची कारवाई थेट खरेदीचे विकल्प मागविणे बेकायदेशीर आहे.

शेतकऱ्याच्या पुनर्वसनासाठी अधिकृत जमिनीच्या मोबदल्यात प्रती एकर १२.५० टक्के म्हणजे ३००० चौरस फूट विकसित भूखंड विना मोबदला देण्यात यावा, मागील तीन वर्षात लाडगाव व गोधनी येथील गैर कृषी करण्यात आलेल्या रहिवासी जमिनीला सहकारी संस्थांनी व खाजगी बांधकाम व्यावसायिकांनी लेआउट पाडून प्रति एकर ७५ लाख ते १ कोटी रुपये प्रति एकर दर दिला आहे. या सर्व बाबींचा विचार विनिमय करून शासनाने प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना न्याय द्यावा. शेतकऱ्यांची भूमिका समजून घेऊन शासनाने न्याय न दिल्यास या प्रकल्पाकरिता शेतजमीन देणार नाही. शासनाने बळजबरीने जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया केल्यास याविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा सज्जड इशाराही आष्टणकर यांनी सरते शेवटी दिला पत्रपरिषदेला प्रकल्प बाधित शेतकरी नरेंद्र टिपले, सतीश आष्टणकर ,चंदू मून, भीमराव मुते यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## योगाभ्यासी मंडळातर्फे त्रिदिवसीय आंतरराष्ट्रीय योगसंमेलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७ ते ९ नोव्हेंबर दरम्यान रामनगर येथे त्रिदिवसीय आंतरराष्ट्रीय योगसंमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती योगाभ्यासी मंडळाचे अध्यक्ष राम खांडवे गुरुजी यांनी पत्रपरिषदेत दिली. यावेळी भारती कुसरे, सुनील शिरशीकर, वसंत नानेकर, अतुल मजूमदार आदी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय योगसंमेलनाचे उद्घाटन नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होईल. योगसंमेलनाच्या इतर सत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे.

योगाभ्यासी मंडळाचे अध्यक्ष राम खांडवे गुरुजी लिखित अनुभवसिद्ध योगोपचार या ग्रंथाच्या हिंदी आवृतीचे विमोचन तसेच इंग्रजी आवृतीचे संध्याकाळी ६ वाजता केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होईल. यावेळी वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांची उपस्थितीत राहील. योगसंमेलनात देशभरातून ४ हजार साधकांची उपस्थिती अपेक्षित असल्याची माहिती खांडवे गुरुजी यांनी दिली. तीन दिवसाच्या योगसंमेलनात गोविंददेव गिरी महाराज, रामकृष्ण मठाचे स्वामी राघवेंद्रनंद, मुकुल कानिटकर, अमृतवक्ता विवेक घळसासी, अष्टांगयोगाचे सिध्दहस्त अशीत आंबेकर, डॉ. योगेश वाईकर, प्रख्यात समाजसेविका विशुद्धानंदा, वेदांतावरील सुप्रसिद्ध वक्ते मधुसूदन पेन्ना, डॉ. रमा गोळवलकर, आहारतज्ज्ञ रवी महाजन आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. योगसंमेलनात एम्सचे संचालक डॉ. प्रशांत जोशी, डॉ. सुधीर भावे, डॉ. परिमल तायडे, दाणी वखरे यांचा योगाद्वारे महिला सक्षमीकरण यावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. योगसंमेलनात विविध विषयांवर चर्चा होणार असून योगसाधनेची अनुभूती देणारे सकाळचे योगवर्ग आणि खांडवे गुरुजींचे विशेष रोगोपचार वर्ग या योगसंमेलनाचे मुख्य आकर्षण राहणार आहे.

## वाठोडा, सिव्हिल लाईन्स भागांत आज वीज नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

नियमित देखभाल व अत्यावश्यक दुरुस्तीच्या कामांमुळे उद्या बुधवार, दिनांक 29 ऑक्टोबर 2025 रोजी वाठोडा आणि सिव्हिल लाईन्स परिसरातील वीजपुरवठा 3 ते 4 तासांकरिता बंद असणार आहे. नागरिकांनी वेळेनुसार आपल्या कामांचे नियोजन करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

वाठोडा विज वितरण केन्द्रा अंतर्गत 11 केव्ही बिग बाजार वाहिनीवरील एबी स्वीच बदलण्याच्या आणि जम्परिंग च्या कामासाठी बुधवारी सकाळी 9 ते 12 या वेळेत सीए रोड, गरोबा मैदान, छापरु नगर, जग जीवन रामनगर, बाबुलबन व सभोवतालच्या परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.

याशिवाय नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी सिव्हील लाईन्स विभागातील 33 केव्ही गोरेवाडा उपकेंद्रातून वीज पुरवठा असलेल्या भागात सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत गोरेवाडा गाव, उत्थान नगर, गोकुळ सोसायटी, वेलकम सोसायटी, इब्राहिम इस्टेट, दिनशा चौक, गिट्टीखदान, बोरगाव, महेश नगर, अनंत नगर, वॉटर वर्क्स ग्राहक आणि 11 केव्ही एएफओ स्विचींग केंद्रावरील मीठा निम दर्गा परिसर, भवन्स शाळा, जिल्हा रेशनिंग कार्यालय आणि सिव्हिल लाइन्स परिसरातील वीज पुरवठा सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत बंद राहील.

### हिवाळी अधिवेशनाची कामे आजपासून बंद

## नागपूर कंत्राटदार संघटनातर्फे निषेध

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :




शासनाने वर्षभरापासून झालेल्या कामांचे, दिवाळी सारखा मोठा सण होऊन सुद्धा लहान कंत्राटदारांची निधी अभावी देयके न दिल्यामुळे सर्व प्रकारची कामे, हिवाळी अधिवेशनाची कामे, उद्या पासून बंद करण्याचे आवाहन सर्व कंत्राटदार बंधूना केलेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागा मध्ये लहान कंत्राटदारांची जवळपास १५०० लक्ष रुपयांची देयके प्रलंबित आहेत. यासाठी धरणे आंदोलन, मोर्चा, लाक्षणिक उपोषण, लोकशाही मार्गाने कंत्राटदार संघटना सातत्याने गेल्या वर्ष भरापासून प्रयत्न करीत आहेत. तसेच मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री यांना या विषयावर संघटनेचे शिष्टमंडळ भेटून विनंती पत्रेही दिले आहे.शासन कंत्राटदार यांचे प्रलंबित देयके न देणे या विषयांवर निर्णय न घेतल्याने निषेधार्थ शासनाची सर्व प्रकारची कामे, येणाऱ्या हिवाळी अधिवेशनाची कामे सर्व कंत्राटदार स्वयंपूर्तीने कामे बंद करून आपला निषेध नोंदविणार आहे.

लहान कंत्राटदारांच्या देयका बाबत दिवाळी लोटून सुद्धा निधी उपलब्ध झालेला नाही. आपल्या नागपूर शहराकरिता ही अत्यंत खेदजनक बाब आहे.अशी माहिती पत्रकार परिषदेत नागपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे यांनी दिली. त्यावेळी संघटनेचे पराग मुंजे, प्रवीण रेवतकर ,अनिल ईकनकर , दिनेश मंत्री, नरेश कुमरे आणि इतर सदस्य उपस्थित होते.

# डब्ल्यूसीएल येथे दक्षता जागरूकता सप्ताह सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) येथे २७ ऑक्टोबर रोजी सचोटी प्रतिज्ञा घेऊन दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ सुरू करण्यात आला. डब्ल्यूसीएल मुख्यालयात आयोजित दक्षता जागरूकता सप्ताह कार्यक्रमात प्रमुख पाहुणे जे.पी. द्विवेदी, सीएमडी, डब्ल्यूसीएल यांनी कर्मचाऱ्यांना सचोटी प्रतिज्ञा दिली.

यावेळी संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत भाषण करताना, मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे यांनी




दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ साजरा करण्यासाठी आयोजित विविध कार्यक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की सचोटी, पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा ही डब्ल्यूसीएलची मुख्य तत्वे आहेत आणि दक्षता विभाग ही तत्वे मजबूत करण्यासाठी सतत काम करत आहे. या मोहिमेअंतर्गत, प्रलंबित तक्रारींचे वेळेवर निराकरण, क्षमता बांधणी, मालमत्ता व्यवस्थापन आणि डिजिटल सुधारणा यासारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

डब्ल्यू सी एल चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक जे.पी. द्विवेदी यांनी आपल्या भाषणात सांगितले की प्रामाणिकपणा हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे आणि केवळ या तत्त्वांचा स्वीकार करूनच आपण प्रगती करू शकतो. प्रत्येकाने दक्षता ही त्यांची जबाबदारी मानली पाहिजे आणि या कार्यात सकारात्मक योगदान दिले पाहिजे.

यापसंगी, पाहुण्यांनी केंद्रीय दक्षता जागरूकता २०२५ गॅलरीचे उद्घाटन केले. महामहिम अध्यक्ष द्रौपदी मुर्मू, उपाध्यक्ष. सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी, केंद्रीय दक्षता आयुक्त प्रवीण के. श्रीवास्तव आणि दक्षता आयुक्त ए. एस. राजीव यांचे संदेश अनुक्रमे महाव्यवस्थापक (एनआय) दीपक रेवतकर, महाव्यवस्थापक (कॉर्पोरेट व्यवहार) तरुण कुमार श्रीवास्तव, महाव्यवस्थापक (ई अँड एम) सुब्रत मोहंती, महाव्यवस्थापक (मार्केटिंग आणि सेल्स) आनंद तेमुरणीकर आणि महाव्यवस्थापक (सिव्हिल) ओ. व्ही. सुजित सेन यांनी वाचून दाखवले.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विभाग प्रमुख, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. कंपनीच्या मुख्यालयात आणि प्रदेशांमध्ये आठवडाभर विविध दक्षता जागरूकता कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातील हे उल्लेखनीय आहे.

# पावनधाम येथे अलौकिक दिवाळी व भाऊबीज कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. २८ :

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय पावंधाम येथे अलौकिक दिवाळी व भाऊबीजेचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राजयोगिनी रेखादीदी, संचालिका पावंधाम, राजयोगिनी मेघादीदी संचालिका ब्रह्मकुमारी केंद्र नागभीड, नंदादीदी संचालिका ब्रह्मकुमारी केंद्र भिवापूर, ब्रह्मकुमार अशोकभाई, ब्रह्मकुमारी शालूदीदी, बी. के. उपसरावभाई अतिथी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रारंभ लक्ष्मीनारायणच्या फोटोचे पूजनाने व दिपप्रज्वलनाने करण्यात आली.पाहुण्यांचे स्वागत पुष्प गुच्छ देऊन करण्यात आले. पाहुण्यांनी सर्वांना दिवाळी व भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजयोगिनी रेखादीदी यांनी याप्रसंगी दिवाळीचे अध्यात्मिक महत्व सांगितले.

दिवाळीमध्ये दिव्यांनी सगळीकडे रोषणाई केली जाते. त्या प्रमाणे ईश्वरीय ज्ञानाने एकमेकांची आत्म्याची ज्योत जागवून जीवन सुखमय होते. जो स्वतः प्रकाशतो आणि इतरांना उजळायला मदत करतो त खरा दीप आहे. भाऊबीजेचे अध्यात्मिक महत्व सांगितले. याप्रसंगी श्रीकृष्णाची सतियुगी दुनिया विषयी संगीत नाटिका सादर करण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित सर्व भाऊबहिणींना भाऊबीजेनिमित्य टीका लावून प्रसाद देण्यात आला. सर्वांना हार व मुकुट लावून सजविण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ब्रह्मकुमार अशोकभाई यांनी केले. संचलन बी के अल्कादीदी यांनी केले. सर्वांचे आभार पौर्णिमादीदी यांनी केले.

# दक्षिण नागपूर येथील सरस्वती नगरात श्रीमद् भागवत कथेचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

मानेवाडा रिंग रोड दक्षिण नागपुरातील उदयनगर नजीक सरस्वती नगर प्लॉट नं. 22, श्रीकांत भागवत यांच्या घरी ह भ प साधनाश्रीजी रोंघे (आळंदीकर) जिल्हा अमरावती यांच्या मुखातून श्रीमद् भागवत कथेचे दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजन केलेले आहे. २७ ऑक्टोबर पासून तर २ नोव्हेंबरपर्यंत कथेचे आयोजन केले असून ३ नोव्हेंबर रोजी किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आयोजक पूजा श्रीकांत भागवत यांचे असून या श्रीमद् भागवत कथेचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आग्नेय मध्य रेल्वे विभागात दक्षता जागरूकता सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

२७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आग्नेय मध्य रेल्वे, नागपूर विभाग "आमची सामायिक जबाबदारी" या थीम अंतर्गत "दक्षता जागरूकता सप्ताह-२०२५" आयोजित केला जात आहे. याप्रसंगी, विभागातील सर्व विभागांमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे प्रामाणिकपणा, सचोटी आणि पारदर्शकतेला प्रोत्साहन देण्यात आले. च्या भावनेला प्रोत्साहन दिले जात आहे. आज २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ७:३० वाजता एक भव्य प्रभातफेरी आयोजित करण्यात आली होती, जी एक रेल होती.

संघ स्टेडियम, मोतीबाग येथून सुरू होऊन, ते रेल्वे कॉलनी, मोतीबाग येथून गेले आणि पुन्हा स्टेडियमवर संपले. या मॉर्निंग वॉकमध्ये मोठ्या संख्येने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. मॉर्निंग वॉकचा उद्देश




कर्मचारी आणि नागरिकांमध्ये दक्षता आणि सचोटीची जाणीव पसरवणे हा या रॅलीचा उद्देश होता. रॅली दरम्यान सहभागींनी "प्रामाणिकपणा - राष्ट्राची ताकद" आणि "सतर्क रहा, भ्रष्टाचारमुक्त रहा" यासारख्या घोषणांद्वारे जनजागृती निर्माण करणे. संदेश पोहोचवला. वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी उदय कुमार भारती यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी केले. विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी यावेळी अधिकारी, शाखा अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रभातफेरीनंतर, सकाळी ११:०० वाजता विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या व्हरांड्यात सत्य निष्ठा प्रतिज्ञा. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी उपस्थित सर्वांना संबोधित केले.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि समर्पणाने पार पाडणे आवश्यक आहे. शपथ देण्यात आली. वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी उदय कुमार भारती यांनी दक्षता जागरूकता सप्ताहाची उद्दिष्टे स्पष्ट केली. दक्षता ही फक्त एका विभागाची जबाबदारी नाही, तर ती आपल्या सर्वांची जबाबदारी आहे हे अधोरेखित करणे. ही एक सामायिक जबाबदारी आहे.

# ५५० वाहन चालकांवर कारवाई

नागपूर : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ५५० वाहन चालकांवर कारवाई करून १,५८,१०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ५ प्रकरणात ६ आरोपींवर कारवाई करून १०,२२० रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये १ प्रकरणात ५ आरोपींवर कारवाई करून ४,११,७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले .

# डॉ. समीर अर्बट यांचे जागतिक स्तरावर सुयश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

आंतरराष्ट्रीय स्तरावर सुप्रसिद्ध फुफ्फुस रोग तज्ज्ञ डॉ. समीर अर्बट यांची वर्ल्ड असोसिएशन फॉर ब्रॉन्कॉलॉजी अँड इंटरव्हेन्शनल पल्मोनॉलॉजी (डब्ल्यूएबीआयपी) या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मीडिया समितीच्या जागतिक अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती झाली आहे.

डॉ. अर्बट हे नागपूरस्थित अग्रगण्य आंतरराष्ट्रीय फुफ्फुस रोग तज्ज्ञ असून, ॲडव्हान्स्ड ब्रॉन्कोस्कोपी आणि मिनिमली इनव्हेसिव्ह तंत्रज्ञानातील त्यांच्या नाविन्यपूर्ण कायार्साठी प्रसिद्ध आहेत. ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये वक्ता म्हणून सहभागी होतात आणि श्वसनविज्ञान क्षेत्रातील त्यांच्या संशोधन व नवोन्मेषासाठी जागतिक स्तरावर ओळखले जातात. यंदा सण २०२४-२०२६ या कार्यकाळासाठी त्यांची सलग दुसऱ्या वेळेस निवड झाली असून, हा नागपूरसाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. जपानस्थित डब्ल्यूएबीआयपी ही संस्था फुफ्फुस विज्ञान, ब्रॉन्कॉलॉजी आणि इंटरव्हेन्शनल पल्मोनॉलॉजी या क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि जागतिक सहयोग वाढविण्यासाठी कार्यरत आहे. मीडिया समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. अर्बट यांनी गेल्या कार्यकाळात जागतिक डिजिटल प्लॅटफॉर्मवर इंटरव्हेन्शनल पल्मोनॉलॉजीविषयी शैक्षणिक माहिती आणि नव्या क्लिनिकल संशोधनांचा प्रसार करण्याचे काम केले.

# सावित्रीबाई फुले यांची मुर्ती स्थापनेसाठी निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २८ :

२७ ऑक्टोबरला कामठी शहरातील प्रभाग ३ मधील स्वर्ण जयंती योजने अंतर्गत महाराष्ट्र शासना द्वारे नागसेन नगर येथे सावित्रीबाई बाल उद्यान बनविले आहे. या बाल उद्यानात सावित्रीबाई फुले यांची मुर्ती स्थापन करण्या करिता वरील प्रभागातील नागरिकांनी कामठी नगर परिषद मुख्याधिकारी यांना एक निवेदन दिले.

तसेच या बाल उद्यानाला सावित्रीबाई फुले असेच नाव देण्यात आले आहे. सावित्रीबाई बाल उद्यानात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा स्थापित करण्याची परवानगी मिळविण्याकरिता निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतांना अनमोल सिद्धार्थ डोंगरे, दुर्योधन मेश्राम, पुरूषोत्तम सेलोकर, धीरज कडबे, महेश सौमकुवर, सोपान खोब्रागडे, मुकेश चौरे, महेंद्र सिद्धार्थ खोब्रागडे, अजय देशभ्रतार, अनिरुद्ध गजभिये, नितीन खोब्रागडे , सिद्धार्थ गोस्वामी , राजू बोरकर, अढाऊ गुरुजी आणि ७५ जणांच्या सह्या आहेत.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७८ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. मंगळवारी (ता.28) शोध पथकाने 78 प्रकरणांची नोंद करून 78,700 रुपयाचा दंड वसूल केला.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400 दंड) या अंतर्गत 19 प्रकरणांची नोंद करून 7,600 रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.400 दंड) या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 1,600 रूपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा



रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 20 प्रकरणांची नोंद करून 57,500 रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर,मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता,फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणाची नोंद करून रू.1,000रूपयाची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 30 प्रकरणांची नोंद करून 6,000 दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 3 प्रकरणांची नोंद करून रु.3,000 चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. सोनाली अपार्टमेंट यांच्यावर सार्वजनिक ठिकाणी घाणपाणी पसरविल्याने नागरिकांना तीव्र दुर्गंधीचा त्रास होत असल्याने त्यांच्याकडून रू.10,000 चे दंड वसुल करण्यात आला. धरमपेठ झोन अंतर्गत आशिष खत्री यांनी सिव्हिल लाईन परिसरातील जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ ट्रक क्रमांक एमएच सीटी 6399 द्वारे मालवाहतूक करताना माती व चिखल रस्त्यावर टाकल्याप्रकरणी कारवाई करीत त्यांच्याकडून 15,000 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. हनुमान नगर झोनअंतर्गत मे.हार्दिक फिटनेस सेंटर यांनी विनापरवानगी विद्युत खांबावर जाहिरातीचे फलक लावल्या प्रकरणी रू. 5,000 चा दंड वसूल करण्यात आला. धंतोली झोन अंतर्गत श्री. गुरुमाउली निवास अपार्टमेंट यांनी रस्त्यालगत बांधकाम साहित्य टाकल्याप्रकरणी कारवाई करीत त्यांच्याकडून रू.10,000 चे दंड वसूल करण्यात आला.

नेहरूनगर झोन अंतर्गत येणाऱ्या नरसाळा रोड येथील गणेश फूल भांडार यांच्यावर प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000 चे दंड वसूल करण्यात आला. गांधीबाग झोन अंतर्गत सरताज सुगंध भंडार यांच्यावर प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000 चे दंड वसूल करण्यात आले.

# २००५ बॅचच्या विद्यार्थ्यांचा धर्मराज विद्यालय येथे पुर्नमिलन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २८ :

धर्मराज विद्यालय कन्हान येथे इ.१० वी च्या २००५ च्या बॅच तर्फे रीयुनियन (विद्यार्थी पुनर्मिलन) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दोन दशकांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदाचा सोहळा साजरा केला.

या प्रसंगी त्या बॅचचे मुख्याध्यापक झोड, तसेच वासनिक, डुकरे, निकोसे, भेलकर, केवटे, मंगर आणि इतर शिक्षकवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व शिक्षक स्वागत समारंभाने झाली. त्यानंतर शिक्षकांचा सत्कार, मनोगत व विद्यार्थ्यांचा पुनःपरिचय सत्र पार पडले. २० वर्षांनंतर शाळेत पाऊल टाकताच सर्व विद्यार्थी आठवणींच्या दुनियेत रममाण झाले.

शाळेच्या मैदानावर सावधान - विश्रांतीच्या तालावर पुन्हा विद्यार्थी जीवनाचा अनुभव घेत जन गण मन राष्ट्रगीत सादर करण्यात आले. वर्गात प्रवेश करताच गुरुजींनी छडीचा प्रसाद



देऊन जुन्या आठवणी ताज्या केल्या. हजेरी घेताच क्षणभरासाठी पुन्हा एकदा विद्यार्थी झाल्याचा भाव विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. यानंतर विद्यार्थ्यांनी कबड्डी व खो-खो खेळांचा आनंद घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना आठवणींचे स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांनी एक हात मदतीचा या सामाजिक उपक्रमाअंतर्गत पुढील शैक्षणिक वर्षात शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याने मदत करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमात जुन्या आठवणींनी प्रत्येकाचे डोळे पाणावले. हा दिवस आयुष्यभर लक्षात राहील, कारण पुन्हा एकदा आम्ही शाळकरी झालो, असे माजी विद्यार्थ्यांनी सांगितले.

या पुनर्मिलन कार्यक्रमात माजी विद्यार्थी सुनील खरबडे, उज्वल पवार, आशिष मदनकर, अमित मेंघरे, राहुल बोरकुटे, प्रितीश हटवार, योगेश मुळे, सेवक भोयर, राहुल चलपे, भूषण डागे, आदित्य ठवकर, आशिष कोहळे, आशिष नागपूरे, निलेश वाघमारे, बबलू गीर्हे, राहुल निर्वाण, मंगेश भोन्डे, महेश भोगे, धीरज दोडके, राहुल भोंगडे, आशिष वाधंकर, निलेश गेडाम, अतिश चिखले, अमित कुंभलकर, गौरव देशमुख, राकेश वाडीभस्मे, रवी सावरकर, अशोक गीर्हे, निलेश लुहुरे , प्रविण रंगारी, गणेश किरपान, राहुल अंजनकर, योगेश ठाकरे, अतुल तागडे , चैतन्य राऊत, प्रशांत भलावी, विनोद लोंढेकर, बलदेव कुंभलकर , देवेंद्र नाकतोडे, पंकज वांजारी, निर्णय कुंभलकर, मोनीश निकोसे, प्रतीक टाकळखेडे, विजय केणे, नितेश मेश्राम , पवन केमोरे, तसेच विद्यार्थिनी सरोज वानखेडे, मीना नेवारे, राजश्री जलिट, मनीषा सरोदे, ज्योत्सना ठाकरे, रिनी भेलावे, सोनू तिवाडे, राजश्री फुटाणे, पल्लवी वाघमारे, आरती भालेराव, सुचिता धुमटकर, प्रीती वैरागडे, दिक्षिता मेश्राम, मयुरी मरघडे, अश्विनी हिवरकर, प्रिया चरडे, पपीता पारधी, लक्ष्मी थुटे, ईश्वरी चौधरी, सोनू करंडे, रीता गायकवाड, तपस्या वाघमारे, माधुरी पाखले आदी उपस्थित होते .

# कारखान्यातून ८ लाखांची मशीन चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

चोरांनी एका फेब्रिकेशनच्या कारखान्यातून ८ लाख रुपये किंमतीची मशीन चोरून नेली. ही घटना नवीन कामठी पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी विनयकुमार शिवधारी सिंह (५६) रा. मानसी लेआऊट, भरतवाडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

विनय यांचा कामठी परिसरात सुरूची कंपनीजवळ फेब्रिकेशनचा कारखाना आहे. कारखान्यात त्यांनी कोळसा फोडण्यासाठी क्रशर डॅम मशीन लावली होती. २५ ऑक्टोबर रोजी ते कारखान्याला कुलूप लावून घरी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने कुलूप तोडून कारखान्यात प्रवेश केला आणि ८ लाख रुपये किंमतीची मशीन चोरून नेली. घटना उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. इतकी मोठी मशीन नेण्यासाठी आरोपीने एखाद्या वाहनाचा उपयोग केला असावा. त्यामुळे पोलिस परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासून संशयित वाहनाचा शोध घेत आहेत.

# श्री गजानन महाराजांची नागपूर-कोराडी पायदळ दिंडी यात्रा संपन्न




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री संत गजानन महाराज यांची पायी दिंडी यात्रा रविवार दि. २६ ऑक्टोबर रोजी श्री संत गजानन महाराज मंदिर, निर्मल नगरी, उमरेड रोड, नागपूर येथून सकाळी ६ वाजता निघून श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिर कोराडी येथे १ वाजेपर्यंत पोहचली. दिंडी यात्रेत सहभागी होणारे १००० माऊली भक्तगण आई, वडील, बंधु, भगिनी, छोटे बाल गोपाल, माय माऊली, मंदिरातील सर्व सेवेकरी माऊली या सर्वांच्या सहकार्याने व अथक परिश्रमाने हा दिंडी सोहळा मोठया संख्येने सहभागी होऊन थाटात पार पडला.

हा नयनरम्य पालखी सोहळा पाहण्याचा आनंद भक्तांच्या चेहऱ्यावर दिसत होता. कोराडी श्री महालक्ष्मी जगदंबा मातेच्या मंदिरात निर्मल नगरी मंदिर ट्रस्टकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी २ वाजता महाप्रसाद सुरू झाला आणि सायंकाळी ६ वाजेपर्यंत दिंडीत सहभागी होणाऱ्या १००० भक्त व दिंडी सोहळा पाहण्यासाठी परस्पर येणारे भक्तगण असे एकूण ३००० माय-माऊली भक्तांनी ज्योती हॉल येथे महाप्रसादाचा लाभ घेतला. दिंडी यात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व श्री भक्तांचे मंदिर ट्रस्टकडून खूप खूप आभार श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट निर्मल नगरी, उमरेड रोड, नागपूर चे सचिव सुनिल बालपांडे यांनी मानले.

# कन्हान नदी काठावर चार दिवसीय छठ पूजा महोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २८ :

कन्हान शहरातील जुनी कामठी गाडेघाट रोडवरील राणी बगीचा परिसरात आणि आडापुल साई मंदिरच्या मागे कन्हान नदी काठावर उत्तर भारतीय नागरिकांचा साजरा केला जाणारा सण छठ पुजा महोत्सव विधिवत पूजा अर्चनाने व उगवत्या सुर्याला जल अर्पण करुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

शनिवार (दि.२५) ऑक्टोंबर रोजी नहे खाय चा पहिला दिवशी उपवास करण्यापूर्वी महिला आणि भाविकांनी नदीत आंघोळ करुन विधिवत पूजा अर्चना करुन छट पूजा महोत्सवाचा शुभारंभ केला.

दुसऱ्या दिवशी खरना या दिवशी महिला आणि भाविकांनी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास केला. संध्याकाळी सूर्यास्ता नंतर उपवास सोडुन अन्न तयार करुन सूयार्ला नैवेद्य अर्पण केले. छठ पूजेच्या तिसऱ्या दिवशी संध्याकाळी महिला आणि भाविकांनी नदीच्या काठावर बांबूच्या टोपल्यांमध्ये फळे, थेकुआ, तांदळाच्या, लाडूंसह सूर्यदेवाला अर्घ्य दिला उपवास नंतर कुटुंबासह सूर्य देवाला अर्घ्य देऊन मावळत्या सूयार्ची पूजा अर्चना केली. चौथ्या दिवशी महिला आणि भाविकांनी उगवत्या सूयार्ला अर्घ्याचे जल अर्पण करुन चार दिवसीय छठ पुजा महोत्सवाची सांगता करण्यात आली.



छट पूजा महोत्सव निमित्त कन्हान-पिपरी नगरपरिषद व नगर पंचायत कांद्री प्रशासना कडून वीज, पार्किंग आदींची व्यवस्था करण्यात आली. छठ पूजा महोत्सव दरम्यान नदी काठावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ संतोष गायकवाड यांचा मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा नेतृत्वात पोलीसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला. कन्हान युथ फाउंडेशन आणि कन्हान शहर विकास मंच यांचा संयुक्त विद्यमाने कन्हान नदी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आला. या मध्ये स्वच्छतेचा, प्लास्टिक मुक्तीचा संदेश देऊन जनजागृति करण्यात आली. छट पूजा महोत्सवा नंतर कन्हान युथ फाऊंडेशन आणि कन्हान शहर विकास मंच च्या विकास कार्यकर्त्यांनी नदी काठावर पडलेले प्लॉस्टिक, जलपर्णी, केळ्यांची छिलके आणि इतर कचरा गोळा केला. जमा झालेला कचऱ्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यात आली. परिणामी नदीच्या परिसराबाबत पर्यावरणीय संतुलन राखण्यात नदी परिसर स्वच्छ होण्यास हातभार लाभला आहे.

**स्वच्छतेची जबाबदारी ही प्रत्येक व्यक्तीची : कॅप्टन सतीश बेलसरे**

कचरा कमी करणे आणि तो योग्य ठिकाणी टाकणे महत्त्वाचे आहे. यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते आणि प्रदूषण कमी होते. पुनर्वापर उपक्रम राबवून आणि प्लास्टिकचा वापर कमी करून आपण संसाधनांचे जतन करू शकतो. स्वच्छतेची जबाबदारी ही प्रत्येक व्यक्तीची आहे, असे कैप्टन सतीश बेलसरे यांनी सांगितले. या प्रसंगी कैप्टन सतीश बेलसरे, शैलेश झेंडे, सुर्यभान फरकाडे, प्रकाश तिवारी, चंदन सिंग, शिवाजी देवनाथ, सुरज वरखडे, ऋषभ बावनकर, राकेश भरणे, आयुष संतापे, आर्यन संतापे, सुर्या संपाते, अनिकेत संतापे सह आदि सदस्य उपस्थित होते.

# वाडीमध्ये होमगार्डकडून वाहतूक पोलिसांची भूमिका



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २८ :

वाडी एमआयडीसी परिसरात होमगार्डकडून वाहतूक पोलिसांच्या जागी काम केल्याचा आणि नागरिकांकडून अवैध वसुली केल्याचा प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही होमगार्ड कर्मचाऱ्यांकडून एमआयडीसी परिसरातील कंपन्यांच्या बाहेर जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनधारकांना अडवून त्यांच्याकडून पैसे मागण्यात येत असून, काही प्रकरणांत त्यांच्याशी उद्धटपणे वागण्यात येत असल्याचे समोर आले आहे.

नियमांनुसार, होमगार्ड कर्मचाऱ्यांना वाहतूक पोलिसांच्या जागी काम करण्याचा अधिकार नाही. तसेच, कोणत्याही व्यक्तीकडून आर्थिक वसुली करणे हे त्यांचे कार्यक्षेत्र नाही. वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्यासच दंड आकारण्याचा अधिकार पोलिस विभागाकडे आहे आणि तोही ठरलेल्या कायदेशीर प्रक्रियेनुसारच आकारला जातो.

प्रभावित कामगारांचा आरोप आहे की, संबंधित होमगार्ड कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने ३ ते ४ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जात आहे. त्यामुळे कामगार वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने होमगार्ड कर्मचाऱ्यांची नेमणूक सिग्नल चौकात किंवा आवश्यक ठिकाणी करणे अपेक्षित असताना, विशिष्ट मार्गांवर त्यांची तैनाती केल्याने वाहतूक कोंडी आणि गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे.

या गंभीर प्रकरणाची संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तसेच, होमगार्ड कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी आणि अधिकार यांच्या मर्यादेत राहून नागरिकांशी सुसंवादाने वर्तन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एसटी बसच्या कमतरतेने प्रवासी हैराण



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २८ :

रामटेक आगारातील एसटी बसांची कमतरता दिवसेंदिवस तीव्र होत चालली असून प्रवाशांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. वर्ष २००७ मध्ये रामटेक आगारात १०० पेक्षा अधिक बस सेवा सुरू होत्या, मात्र आता ही संख्या घटून केवळ ५२ वर आली आहे.

त्यामुळे प्रवाशांना तासनतास बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. नागपूर, मौदा आणि तुमसर या मार्गांवर बसांच्या कमतरतेमुळे लांबच लांब रांगा लागत आहेत.

सध्या दिवाळीचा सण सुरू असून भाऊबीजसाठी महिला प्रवासी माहेरी जाण्यासाठी बसस्थानकावर प्रतीक्षेत आहेत. महिलांना, जेष्ठ नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा असली तरी बस वेळेवर न आल्याने त्याचा लाभ मिळत नाही. नागपूरसाठी दर १५ मिनिटांनी बस असावी, अशी प्रवाशांची मागणी आहे, परंतु बसेस वेळेवर न सुटल्याने प्रवासी त्रस्त झाले आहेत.

दरवर्षी शासन धोरणानुसार १५ वर्षांपेक्षा जुनी वाहने भंगारात पाठवली जातात, परंतु त्याऐवजी नव्या बस मिळत नाहीत. यामुळे विद्यार्थी, नोकरी करणारे वर्ग आणि ग्रामीण भागातील प्रवासी यांना वेळेत आपल्या ठिकाणी पोहोचणे कठीण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ नवीन बसगाड्या उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

# महापालिका निवडणुकीत अल्पसंख्याक समाजासाठी ३०% तिकीट वाटप करण्याची शायदा खान यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती अल्पसंख्याक विभागाच्या राज्य सचिव शायदा बेगम अहमद खान यांनी येत्या महापालिका निवडणुकीत अल्पसंख्याक समाजासाठी ३०% तिकीट वाटप करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात त्यांनी राज्यसभा खासदार आणि अखिल भारतीय काँग्रेस समिती अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष इम्रान प्रतापगढी, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. वजाहत मिर्झा, नागपूर शहर जिल्हा काँग्रेस समितीचे अध्यक्ष आणि आमदार विकास ठाकरे, उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत आणि राज्य अल्पसंख्याक विभागाचे प्रभारी मोहम्मद अहमद खान यांना पत्र पाठवले आहे. शायदा खान यांनी पत्रात लिहिले आहे की, जर अल्पसंख्याक विभागाला ३०% उमेदवारी मिळाली तर अल्पसंख्याक समुदायाचे मनोबल वाढेल आणि काँग्रेस पक्ष बळकट होईल. उमेदवार निश्चित करण्यापूर्वी, त्या व्यक्तीने गेल्या १० वर्षात पक्षासाठी आणि त्यांच्या मतदारसंघातील लोकांमध्ये केलेल्या कामाची तपासणी करावी अशी मागणी केली आहे.



# रेल्वेसोबत कॅटरिंग व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने उद्योजकांसाठी रेल्वेसोबत केटरिंग व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. प्रवाशांना दर्जेदार खाद्यपदार्थ व पेयसेवा पुरविण्यासाठी विभागातील विविध महत्त्वाच्या स्थानकांवर एकूण 10 केटरिंग युनिट्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे थेट आणि अप्रत्यक्षरित्या रोजगारनिर्मिती होणार आहे.



या युनिट्समध्ये बेतूल स्थानकावर गरीबीरेषेखालील व्यक्ती साठी राखीव फळांचे स्टॉल आणि अनुसूचित जातीसाठी राखीव मल्टी-पर्पज स्टॉल यांचा समावेश आहे. तसेच चंद्रपूर येथे फळांचे स्टॉल, बल्लारशाह, परसाई, मजरी जंक्शन आणि वरोरा येथे केटरिंग स्टॉल, आणि वर्धा व आमला येथे मल्टी-पर्पज स्टॉल उपलब्ध आहेत.

एकूण 10 युनिट्सपैकी 7 युनिट्स ई-लिलावाद्वारे आणि 3 युनिट्स ई-टेंडरिंगद्वारेरेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर वरून उपलब्ध करून देण्यात येतील. लिलाव व निविदा सादर करण्याची अंतिम तारीख 18 नोव्हेंबर 2025 आहे.

इच्छुक सहभागी अधिक माहितीसाठी वरील संकेतस्थळाला भेट देऊ शकतात किंवा कार्यालयीन वेळेत नागपूर येथील विभागीय वाणिज्य कार्यालयाच्या केटरिंग विभागाशी संपर्क साधू शकतात. या उपक्रमाचा उद्देश विभागातील प्रमुख स्थानकांवर गुणवत्तापूर्ण केटरिंग सेवा उपलब्ध करून देणे व नवउद्योजकांना प्रवासीहिताचे व्यवसाय विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

# हिट अ‍ॅन्ड रनमध्ये वृद्धाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

मानकापूर चौकात अज्ञात वाहनाच्या चालकाने एका वृद्धाला जबर धडक दिली आणि पळून गेला. गंभीर जखमी वृद्धाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. सीताराम सहदेव तुपकर (८६) रा. अंजना टाऊन, झिंगाबाई टाकळी असे मृताचे नाव आहे. गत ८ ऑक्टोबरच्या सायंकाळी सीताराम सायकलने मानकापूर चौकातून घरी जात होते. देशी दारूच्या दुकानाजवळ अज्ञात दुचाकी वाहनाच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला.

# पाणीपुरवठा सेवा आता एका क्लिकवर जल ग्राहक सेवा अ‍ॅप लाँच

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

स्मार्ट आणि नागरिकाभिमुख पाणी व्यवस्थापनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत नागपूर महानगरपालिका आणि ऑरेंज सिटी वॉटर यांनी संयुक्तपणे नागपूर जल ग्राहक सेवा हे आधुनिक मोबाईल अ‍ॅप लाँच केले आहे. या अ‍ॅपद्वारे नागपूरकर आता पाणीपुरवठ्याशी संबंधित जवळपास सर्व सेवा आपल्या मोबाईलवरून सहज वापरू शकतील.

या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना झोन कार्यालयांत जाण्याची किंवा बिल, तक्रार व सेवा विनंत्यांसाठी रांगेत उभे राहण्याची गरज संपवणे हा आहे. एनएमसी-ओसीडब्ल्यूचे अधिकारी सांगतात की हे अ‍ॅप डिजिटल गव्हर्नन्स, पारदर्शकता आणि जलद सेवा वितरणाचे प्रतीक आहे. अ‍ॅपद्वारे वापरकर्ते सायबर तक्रारी नोंदवू शकतात आणि त्यांच्या स्थितीचा मागोवा रिअल-टाइममध्ये घेऊ शकतात. तक्रार नोंदवल्यानंतर ती थेट संबंधित नेटवर्क अभियंत्याकडे पोहोचते, ज्यामुळे मानवी विलंब कमी होऊन प्रतिसाद जलद मिळतो. याशिवाय अ‍ॅपमध्ये डिजिटल बिलिंग आणि ऑनलाइन पेमेंटची सुविधा उपलब्ध आहे. नागरिक पीडीएफ स्वरूपात बिल पाहू शकतात, मागील देयके तपासू शकतात आणि नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड, यूपीआय किंवा मोबाईल वॉलेटद्वारे तत्काळ पेमेंट करू शकतात. सर्व पेमेंट नोंदी डिजिटल स्वरूपात सुरक्षित राहतील. पूर्वी नाव दुरुस्ती, नळ आकार बदल किंवा नवीन जोडणीसाठी नागरिकांना कार्यालयात जावे लागत होते; आता हे सर्व व्यवहार अ‍ॅपवर एका क्लिकमध्ये पूर्ण करता येतील. अ‍ॅप वापरकर्त्यांना बिलिंग, सेवा खंडित सूचना आणि अद्यतनांसाठी रिअल-टाइम नोटिफिकेशन्स व एसएमएस अलर्ट मिळतील. ही योजना ह्यस्मार्ट सिटी संकल्पनेशी सुसंगत असून, इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध आहे. नागरिकांना हे अ‍ॅप डाउनलोड करून कागदरहित, जलद आणि सुलभ सेवा अनुभवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रवाशांच्या सोयीसाठी छठपूजेनिमित्त विशेष गाड्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे दिवाळी व छठपूजेनिमित्त विशेष गाड्या चालविण्यात आल्या. या गाड्यांना प्रवाशांचा प्रतिसाद मिळत असून विक्रमी उत्पन्नाची नोंद करण्यात आली आहे. दपूम रेल्वे नागपूर विभागातर्फे २३ ऑक्टोबरला चालविण्यात आलेल्या गोंदिया-पटणा छठपूजा विशेष गाडीमध्ये १ हजार २७३ प्रवाशांनी प्रवास केला. या माध्यमातून ९ लाख ७१ हजार ४४९ रुपये उत्पन्न मिळाले. २४ ऑक्टोबरला १ हजार ७९ प्रवाशांनी तिकीट आरक्षित केले आणि लाख १३ हजार २९४ उत्पन्न रेल्वे प्रशासनाच्या तिजोरीत जमा झाले. २३ ऑक्टोबरला नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी-जयनगर छठपूजा विशेष गाडी चालविण्यात आली. या गाडीत १ हजार ४२६ प्रवाशांनी प्रवास केला आणि १० लाख ६४ हजार ८३३ रुपये उत्पन्न रेल्वेला मिळाले. सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी नागपूर विभागाने अनेक सुविधा उपलब्ध करून दपूम नागपूर विभागाने सणांच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी वेळेत विशेष गाड्यांचे संचालन केले आहे. प्रवाशांकडून मिळणारा प्रतिसाद आमच्या कर्मचाऱ्यांचे आणि समर्पणाचे फलित आहे.

# हिंदी काव्य संमेलन आणि मुशायराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

नागपूर येथील नटराज सभागृह हिंदी मोर भवन येथे हिंदी कवींचे कवी संमेलन आणि मुशायरा विविध साहित्यिक संस्थांनी मिळून आयोजित केले होते. या कवी संमेलनाला नामांकित कवींची आणि लोकांची भरपूर उपस्थिती राहिली. विशेष म्हणजे या कवी संमेलनामध्ये विविध विचार साहित्य प्रवाहांना सामावून घेण्यात आले होते.




या कवी संमेलनाचे अध्यक्षता प्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉक्टर शिवनारायण आचार्य यांनी केले, तर उद्घाटन प्रसिद्ध लेखिका आणि शायरा नेहा गोडघाटे,मुंबई यांनी ज्ञान आणि साहित्य सुर्जनाची प्रतीक "शमा" प्रज्ज्वलित करून केले. मुख्य अतिथी म्हणून डॉक्टर सागर खादीवाला, मुख्य आयोजक आणि प्रसिद्ध साहित्यिक प्रा. जावेद पाशा कुरेशी, कवी माणिकराव गोडघाटे, शब्बीर अहमद विद्रोही, हेमलता मित्र मानवी, डॉक्टर भोला सरवर, तन्हा नागपुरी उपस्थित होते.

प्रा. जावेद पाशा यांनी प्रस्तावना करीत असताना "सारा जंगल जहर से भरा है, चलो कोई प्यार की नहर ढूंढे" या आपल्या शेर ने प्रस्तावना करीत म्हणाले की या साहित्य संमेलनाचा उद्देश समाजात चांगले संवाद घडवून आणणे आणि साहित्यिकांनी सामाजिक स्वास्थ जोपासण्यासाठी आपल्या लेखणीने कार्य करावे असे असल्याचे स्पष्ट केले. मुंबईहून आलेल्या उद्घाटिका नेहा गुडघाटे म्हणाले की "अंधेरों की नही उजालो की बात करते है, जो अपने पास है शमा चलो उसे रोशन करते है" या त्यांच्या कवितेने सुरुवात करून म्हणाल्या की आमच्या साहित्याचा गाभा मानवत आहे.

मानवी संवेदन आहेत, मानवी दुःख आणि जुलूम याच्या विरोधात सुद्धा आम्ही उभे आहोत. खऱ्या अथार्ने भारतीय समाजाचे आम्ही प्रतिनिधित्व करतो, याचा आम्हाला अभिमान आहे! यावेळी नेहा गोडघाटे यांनी नुकतेच ज्यांचे हिंदी काव्यसंग्रह "चौकीदार" प्रकाशित झाले ते कवी माणिकराव गोडघाटे यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अध्यक्षपदावरून बोलताना डॉक्टर शिवनारायण आचार्य म्हणाले की आम्ही सर्व भाईचारा आणि एक दुसऱ्याच्या सहकार्याने या समाजात शांततेत जीवन जगत आहोत.

डॉ. भोला सरवर आणि तन्हा नागपुरी यांनी आपल्या अत्यंत उत्स्फूर्त अशा रचना सादर केल्या. माणिकराव खोब्रागडे यांनी आपली "प्यार बाटते चलो, नगद नही तो उधार बाटो" ही सुंदर कविता सादर केली. समारोप करताना शब्बीर अहमद विद्रोही म्हणाले की आपण त्या नावेत आहोत जी नाव एक दुसऱ्याच्या सहकार्याने प्रेमाने आणि आपुलकीने बनविलेली आहे. संपूर्ण संमेलनाचे संचालन कवी संजय गोडघाटे आणि शायर इमरान फैज यांनी केले.

यावेळी यावेळी आमंत्रित कवी प्रा. हृदय चक्रधर, मनोहर गजभिये, अनिल मालोकर, अविनाश बागडे, माधुरी राऊलकर, पूनम हिंदुस्तानी, रूबी दास 'अरु', कवि सूर्यकांत मुनघाटे, कवि प्रभु फुलझेले, कवि रजनी फुलझेल, डॉ. पोफळे, संजय गोडघाटे, अजहर हुसैन, शमशाद शाद, वहीद हैरा, जमिल आर्तिश, नियाज अहमद, अख्तर आलम, माहिर नागपुरी, खुर्शीद हैदर, शहीद हजरत, जमील अंसारी, लुकमान अंसारी, अकबर खैराबादी, रहेबर नागपुरी, जकवान अंसारी, अजहर हुसैन, शमशाद शाद, जमिल आर्तिश, नियाज अहमद, अख्तर आलम, माहिर नागपुरी, खुर्शीद हैदर, शहीद हजरत, प्रतिबालाबोरकर, लुकमान अन्सारी, अकबर खैराबादी, रहेबर नागपुरी, जकवान अन्सारी या मान्यवरांनी आपल्या उत्कृष्ट रचना सादर केल्या.

# मॉडेल हॉयस्कुल येथे माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २८ :

बरोबर चालता येइना, जास्त वेळ बसता येईना, प्रकृती बरोबर नसतानाही, वयाची ८४ वर्ष पार झाल्यानंतरही, तीस वर्षानंतर आपल्या विद्यार्थ्यांना प्रथमच भेटण्याच्या आतुरतेने सर्व माजी शिक्षकांनी मॉडेल हॉयस्कुल नांदपूर येथे आयोजित माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळाव्यात आपली हजेरी लावली. हा क्षण सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांकरीता एक अतिशय भावनिक क्षण होता, जो त्यांच्या शब्दातून व डोळ्यातून व्यक्त होत होता. शाळेचे माजी मुख्याध्यापक गुणवंत सोपानराव कराळे, शारीरिक प्रकृती गंभीर असतानाही, आपल्या माजी विद्यार्थ्यांना तीस वर्षानंतर प्रथमच भेटण्यासाठी शाळेत पोहचले. वयाची ८४ वर्ष पार केलेल्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका निर्मला हिवसे यांनी देखील माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळाव्यात आपली हजेरी लावली.



तसेच वयवृध झालेले माजी शिक्षक लोनकर, सुरेंद्र वैद्य, रमेश बोके व ताथडे, माजी शिक्षिका सपना जाचक, माजी लॅब असिस्टंट अनिल जगताप, बोबडे, सदाशिव आजनकर व भीमराव कैलुके देखील या प्रसंगी उपस्थित होते.

आपल्या सर्व माजी शिक्षकांचा माजी विद्यार्थ्यांतर्फे यावेळी सत्कार करण्यात आला व त्यांना त्यांच्या प्रामाणिक कार्याची पावती देण्यात आली. विविध क्षेत्रामधे व विविध पदांवर कार्यरत असलेल्या आपल्या माजी विद्यार्थ्यांना पाहून व ऐकून माजी शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

हा माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळावा १९९४-१९९५ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांद्वारा मॉडेल हॉयस्कुल नांदपूर च्या आवारात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडेल हॉयस्कुल नांदपूर चे मुख्याध्यापक सतिश लोखंडे होते तर भारत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा अ‍ॅडव्होकेट शोभा काळे व माजी मुख्याध्यापक राजेंद्र चौधरी हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. हा माजी शिक्षक-विद्यार्थी स्नेह मेळावा आयोजित करण्याकरिता मॉडेल हॉयस्कुल नांदपूर चे माजी विद्यार्थी मनोज पखाले, विशाल देशमुख, प्रकाश तिरळे, सुधीर सोनटक्के, दिनचंद गहेकर, शालिनी पखाले, वंदना कोल्हे, प्रवीण टुले, वंदना मनवर व गणेश सहारे यांनी पुढाकार घेतला व हा स्नेह मेळावा घडवून आणला. या वेळी सर्व माजी शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात ही राष्ट्रगीताने व राज्यगीताने झाली. त्यानंतर प्रतिज्ञा घेण्यात आली व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. विशेष म्हणजे माजी विद्यार्थी हे शाळेच्या गणवेशात असलेले पांढरी टोपी घालून तीस वर्षानंतर प्रथमच शाळेत आले होते.

# ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफ नागपूर विभागाने प्रवाशांच्या हरविलेल्या वस्तू सुरक्षित परत केल्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांच्या सोयीसाठी वचनबद्ध असलेल्या मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने ऑपरेशन अमानत या उपक्रमांतर्गत रेल्वे गाड्या आणि स्थानकांवर प्रवाशांनी विसरलेल्या अनेक मौल्यवान वस्तू शोधून त्यांचे मूळ मालकांना सुरक्षित परत केल्या.



दिनांक 26 ऑक्टोबर 2025 रोजी रेल मदद आणि डीएससीआर नागपूरमार्फत प्राप्त झालेल्या संदेशांवर तात्काळ कार्यवाही करत आरपीएफ पथकांनी विविध गाड्यांमधून मोबाइल चार्जर, गुलाबी रंगाची पाठीवरील पिशवी आणि इअर बड्स यांसारख्या वस्तू हस्तगत केल्या. सर्व वस्तू जवळच्या आरपीएफ पोस्टमध्ये जमा करून पडताळणी झाल्यानंतर प्रवाशांना परत देण्यात आल्या. बल्लारशाह येथे आरपीएफ कर्मचाऱ्यांनी रोकड, ओळखपत्रे आणि इतर मौल्यवान वस्तू असलेले एक पाकीट हस्तगत करून आवश्यक कागदपत्रांसह त्याच्या मूळ मालकाला परत दिले. त्याचप्रमाणे वर्धा येथे ट्रेन प्रवासादरम्यान एकमेकांचे ट्रॉली बॅग बदलल्या गेल्याच्या प्रकरणात आरपीएफ अधिकाऱ्यांनी दक्षता दाखवून दोन्ही प्रवाशांना त्यांच्या योग्य बॅगा – ज्यांपैकी एकात सुमारे 3.9 लाख किंमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड होती.ऑपरेशन अमानत अंतर्गत नागपूर विभागातील आरपीएफच्या या तत्पर आणि समन्वयित कार्यवाहीमुळे प्रवाशांच्या सुरक्षेप्रती दलाची बांधिलकी अधोरेखित झाली असून, ती भारतीय रेल्वेच्या सेवाभावी वृत्तीचे प्रतीक ठरली आहे.

# कुस्तीतूनच साहसी युवक घडतात : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. २८ :

आयुष्यात धाडसी गुण प्रत्येकात असावा. धाडस केल्याशिवाय यश मिळत नसते. बहुतांश मंडळींजवळ चांगले गुण असले तरी समोर जाण्याचे धाडसच नसते. परिणामी ते सर्व गुण असतानाही मागे पडतात. हा प्रकार टाळायचा असेल तर आपल्याला धाडसी युवक घडवावे लागतील. हा सर्व प्रकार घडविण्यासाठी कुस्ती खेळावी लागेल. कुस्ती खेळल्याने खेळणाऱ्याच्या मनात धाडस निर्माण होते अन् तो यश मिळवण्यासाठी पुढे जातो. अर्थात कुस्तीतूनच साहसी युवक घडत असतात असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

तालुक्यातील धानला येथे दिवाळीच्या शुभपर्वावर भाऊबीज निमित्त मंडई उत्सवाचे आयोजन गुरूवारला करण्यात आले होते. यानिमित्त कुस्तीची दंगल, तमाशा, गोंधळ, लावणी हे कार्यक्रम पार पडले. या उत्सवात गावात जणू यात्राच भरल्याचे



चित्र होते.

धाणल्याची मुंडई पाहून लोककलावंत भारावून गेल्याचे चित्र यावेळी दिसून आले. गुरुवारला कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आल्याने तालुक्यातील व बाहेर जिल्ह्यातील तरुण मुलांनी व मुलींनी त्या दंगलीत सहभाग घेतला. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर, सरपंच ज्योती सावरकर, उपसरपंच अजय हारोडे, मंगेश ठोंबरे, मनीराम यादव, मोरेश्वर सोरते, खुशाल तांबडे, संदीप पत्रे, नारायण मेश्राम, राजू सोमनाथे, सूर्यकांत रोडे, भूषण सावरकर, रामेश्वर लिचडे, विनोद मदनकर, टिळक दंडारे, शरद भोयर, रवी चव्हाण, संकेत झाडे, बबलू पत्रे, सुधाकर धांडे, जीवन पत्रे, बाळकृष्ण राजगिरे, भगवंता पत्रे, , मंगेश बरबैय्या, मोनीष मेश्राम, रामदास वंजारी, कुंता बावणे, यशोधरा वाकडे. मंजू बावणे, संगीता तिरपुडे, मयुरी पत्रे, निरंजना पत्रे, सुरेश हारोडे, मनोहर मते, वामन मुंदेकर, सुरेंद्र पत्रे, बालू ठोंबरे, जितेंद्र डांगरे आदी उपस्थित होते.

शुक्रवार २४ ऑक्टोबर रोजी शाहीर माणिक यांचा राष्ट्रीय खडा तमाशाचे आयोजन करण्यात आले होते, गावात दिवाळीच्या अनुषंगाने आलेल्या पाहुणे मंडळींनी याचा चांगलाच आनंद लुटला. ग्रामीण भागातील लोककला जिवंत ठेवण्यासाठी मंडई उत्सवाचे आयोजन केले जाते. गावात घरोघरी पाहुण्यांची गर्दी दिसून येते. या निमित्ताने गावात नवीन जावई मुली येत असल्याने दिवाळीचे औचित्य साधत त्यांना मेजवानी दिली जाते.

# विशेष कार्यकारी अधिकारीपदी अरुण कराळे यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २८ :

दत्तवाडी येथील सत्यसाई सोसायटी निवासी सेवानिवृत्त पदविधर शिक्षक, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे नागपूर महानगर जिल्हा कार्याध्यक्ष , नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे निर्मंत्रित सदस्य तथा जेष्ठ पत्रकार अरुण सोपानराव कराळे यांची महाराष्ट्र शासनाच्या विशेष कार्यकारी अधिकारी या प्रतिष्ठित पदावर नियुक्ती झाली असून त्यांच्या या निवडीबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे, आमदार समीर मेघे , आमदार सुधाकर अडबाले,नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर यांचे आभार मानले.

अरुण कराळे यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठा, शिस्तबद्ध कार्यशैली आणि लोकाभिमुख दृष्टिकोनाच्या जोरावर प्रशासनात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कारकिर्दीत विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. स्थानिक स्तरावर सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला असून नागरिकांमध्ये त्यांचा चांगला लौकिक आहे.

महाराष्ट्र शासनाकडून त्यांची विशेष



कार्यकारी अधिकारी म्हणून निवड झाल्याने त्यांच्या कार्यक्षमतेची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे. या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक संस्था, स्थानिक मंडळी आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.त्यानिमित्ताने अरुण कराळे यांनी सांगितले की, ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची आणि सेवाभाव वृद्धिंगत करणारी आहे. शासनाच्या धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी मी तत्पर राहीन.ह्व

या निवडीमुळे दत्तवाडी ग्रामस्थांमध्ये अभिमानाची भावना व्यक्त होत असून त्यांच्या उज्वल कारकीर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# सायबर गुन्हेगारांच्या तपासात एआय उपयुक्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर गुन्हेगारीच्या तपासात अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. या तंत्रज्ञानामुळे पोलिसांना सायबर गुन्हेगारांना पकडण्यास मदत होईल. या तंत्रज्ञानाचा वापर योग्य पद्धतीने केला पाहिजे, असे प्रतिपादन सायबर तज्ज्ञ अमित दुबे यांनी केले. ते नागपूर पोलिसांकडून भट सभागृहात आयोजित महा सायबर सुरक्षा आणि जनजागृती शिबिरात उपस्थित पोलिस अधिकारी आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, तर प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर आयजी संदीप पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी दुबे यांनी गुन्हेगारांच्या तपासात कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयुक्तता देखील स्पष्ट केली. तसेच सायबर फसवणूक कशी टाळायची याबद्दल टिप्स देताना त्यांनी, ऑनलाइन प्रलोभनांना किंवा प्रलोभनांना बळी पडू नका, कधीही कोणाशीही वैयक्तिक माहिती शेअर करू नका, असे आवाहन केले. तसेच तंत्रज्ञान ऑनलाइन फसवणूक रोखण्यास कशी मदत करू शकते याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविकात डीसीपी लोहित मतानी यांनी, नागपूर शहरात दररोज अंदाजे ३० लाख रुपयांपर्यंतची सायबर फसवणूक होते. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता आवश्यक आहे. आजच्या शिबिराचा उद्देश लोकांना सायबर गुन्हे कसे टाळायचे हे शिकवणे, हाच असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिस आयुक्त सिंगल म्हणाले की, सायबर गुन्ह्यांच्या नवीन पद्धतीबद्दल नागरिकांनी माहिती असणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात, प्रत्येकाने सायबर-साक्षर असणे महत्त्वाचे आहे. भविष्यात, एआय तंत्रज्ञान आणि चॅटजीपीटी सारखी साधने तपास प्रक्रियेत आणखी उपयुक्त ठरतील.

म्हणूनच, प्रत्येक तपास अधिकाऱ्याला या नवीन तंत्रज्ञानाची माहिती असली पाहिजे, हाच कार्यक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमात डीआयजी राजेंद्र दाभाडे, डीसीपी लोहित मतानी, राहुल मदने, संदीप पखाले, निकेतन कदम, मेहक स्वामी, दीपक अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तसेच ठाणेदार आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन एपीआय मारुती शेळके यांनी केले तर आभार डीसीपी अग्रवाल यांनी मानले.

## उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलिस कर्मचाऱ्यांचा गौरव

या कार्यक्रमात सायबर पोलिसिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट तपास कार्याबद्दल पीआय बळीराम सुतार यांना सन्मानित करण्यात आले. गुन्ह्यांचा यशस्वी शोध लावल्याबद्दल एपीआय संदीप बागुल, विजय राणे आणि शंकर पंधेरे यांना प्रशंसापत्रे देण्यात आली. विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जनजागृती मोहिमा राबविल्याबद्दल पोलिस हवालदार अतुल आगरकर आणि श्रद्धा ढोमणे यांचे कौतुक करण्यात आले. एनसीआरआर पोर्टलवरील उत्कृष्ट कामाबद्दल पोलिस हवालदार रेखा यादव यांचा सन्मान करण्यात आला.

## वधू-वर परिचय परिषद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

भगवान परशुरामजींच्या आशीर्वादाने, या वर्षीचा "मिलाप २६" हा कार्यक्रम, परशुराम सर्वभाषीय ब्राह्मण संघ, नागपूर द्वारे गेल्या २५ वर्षांपासून ब्राह्मण कुटुंबातील विवाहयोग्य मुला-मुलींसाठी आयोजित केला जात आहे, हा वर-वधू परिचय संमेलन रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी अमृत भवन, सीताबर्डी नागपूर येथे आयोजित करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे.या संदर्भात अधिक माहितीसाठी संस्थेच्या सरचिटणीसांशी संपर्क साधा.

## प्रवासादरम्यान महिलेचे मंगळसूत्र लांबविले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

ऑटोत प्रवासी बनून बसलेल्या महिला चोरांनी प्रवासादरम्यान एका महिलेच्या बॅगमधील २ लाख ८० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र लांबविले. ही घटना सक्करदरा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी ज्योती नामदेव चालवनकर (४८) रा. फुटाळाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

शनिवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास ज्योती काही कामाने महालच्या तिळक पुतळा चौकात गेल्या होत्या. तेथून म्हाळगीनगर परिसरात राहणाऱ्या नातेवाईकाच्या घरी जाण्यासाठी त्या एका ऑटोत बसल्या. काही अंतरावर ३० ते ३५ वर्षे वयोगटातील दोन महिलाही ऑटोत बसल्या. प्रवासादरम्यान दोन्ही महिलांनी ज्योती यांची नजर चुकवून त्यांच्या बॅगमध्ये ठेवलेली छोटी पर्स चोरी केली. पर्समध्ये २.८० लाख रुपये किंमतीचे मंगळसूत्र होते. म्हाळगीनगर चौकात ऑटोतून उतरल्यानंतर ज्योती यांना पर्स चोरी झाल्याचे समजले. त्यांनी सक्करदरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात महिला आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# आर्नाज विंग्ज इम्पॅक्ट क्लबची जीवनाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

नागपूर येथील आरनाच्या विंग्स टू फ्लाय फाउंडेशनच्या कॉर्पोरेट कार्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत फाउंडेशनच्या संस्थापिका आर्य क्षत्रिय आणि तारेश क्षत्रिय यांनी त्यांच्या सामाजिक विकास प्रकल्प, "आरणाच्या विंग्ज इम्पॅक्ट क्लब" चा तपशीलवार आढावा सांगितला.

भारतातील पहिली सामाजिक योद्धा आणि विकास चळवळ इम्पॅक्ट क्लब हे एक अद्वितीय सामाजिक आणि विकासात्मक व्यासपीठ आहे जे व्यक्तींना वैयक्तिक, व्यावसायिक आणि राष्ट्रीय विकासात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रेरित करते.

इम्पॅक्ट क्लबचे उद्दिष्ट जीवन घडवणे, जीवन बदलणे आणि विश्वास, कौशल्ये आणि संधींवर आधारित देशव्यापी ओळख निर्माण करणे आहे. हे एक सहाय्यक, सुसंवादी आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण करते जे परस्पर बंधुत्वाच्या भावनेला पोषण देते आणि "वसुधैव कुटुंबकम" म्हणजेच "जग एक कुटुंब आहे" या तत्वज्ञानाने जगते. इम्पॅक्ट क्लबचे कौशल्य विकास,




रोजगार, फ्रीलान्सिंग, व्यवसायाच्या संधी मिळवून देणे ही मुख्य उद्दिष्ट्ये आहेत. राष्ट्रीय मान्यता सभेच्या शेवटी - योगेश पाटील,राजेंद्र पी. तिवारी, सौरभ तिवारी, आकांशा मानवतकर, आरती पौनीकर, निशा पाटील, विशाल खलोरे, रंजू जोगी, तान्या क्षत्रिय, आदित्य क्षत्रिय, आणि हिमांशी क्षत्रिय यांनी प्राथमिक प्रभाव योद्धा म्हणून स्वतःची नोंदणी केली.

सर्व सहभागींनी एकत्रितपणे समाजात शिक्षण, रोजगार आणि नैतिक नेतृत्वाचे नवीन आयाम स्थापित करण्यासाठी इम्पॅक्ट क्लबच्या माध्यमातून काम करण्याचे वचन दिले.

# मनपाच्या सर्वच शाळांमध्ये लागणार १३६० सीसीटीव्ही कॅमेरे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्वपूर्ण असल्याने नागपूर महानगरपालिकेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत मनपाच्या ११६ शाळांमध्ये १३६० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय घेतला आहे.

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने शाळा व परिसरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सुरक्षितता सुनिश्चित



करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरा हा उत्तम पर्याय आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नागपूर महानगरपालिकेच्या ११६ शाळांमध्ये लवकरच सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा अनिवार्य केल्याच्या पार्श्वभूमीवर, नागपूर महानगरपालिकेने या उपक्रमासाठी आपल्या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. मनपाच्या एकूण ११६ शाळांमध्ये हे कॅमेरे बसवले जातील, ज्यात ८८ प्राथमिक शाळा आणि २८ माध्यमिक शाळांचा समावेश आहे. यापूर्वी ३४ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तर आता लवकरच उर्वरित ८२ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. यातील ३६ प्रायमरी शाळात २५६ सीसीटीव्ही कॅमेरे तर ४६ अपर प्रायमरी शाळेत ४९६ सीसीटीव्ही कॅमेरे व ३४ हायस्कूल मध्ये ६०८ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे.

या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण संबंधित शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे सोपवले जाईल. याव्यतिरिक्त, महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधील कॅमेऱ्यांचे पर्यवेक्षण करण्यासाठी केंद्रीय नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्रीय कार्यालयातून मनपा शाळांच्या सुरक्षा उपायांची नियमितपणे माहिती घेतली जाईल. यामुळे शाळेच्या परिसरात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडण्यापूर्वीच त्यावर प्रतिबंध करणे शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि चिंतामुक्त शिक्षण वातावरण तयार करण्याच्या दिशेने मनपाचे हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

# महावितरणच्या झटपट योजनेचा उद्योजकांना लाभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक अशा सर्व वीज ग्राहकांना गरजेनुसार वीजवापर वाढविण्यासाठी महावितरणने झटपट स्वयंचलित परवानगी योजना राबविल्यामुळे राज्यातील ४,१६४ वीज ग्राहकांनी सुमारे एक महिन्यात २२ मेगावॅट क्षमता वाढवून घेतली. यामध्ये २४६० औद्योगिक वीज ग्राहकांचा समावेश असून दिवाळीपूर्वी मागणीनुसार उत्पादन वाढविण्यास त्यांना मदत झाली.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, वीज ग्राहकांना अधिकाधिक सहजपणे सेवा मिळण्यासाठी प्रक्रियेत बदल करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यानुसार इज ऑफ लिव्हिंगच्या सूत्रानुसार महावितरणने वीज ग्राहकांसाठी मंजूर भार वाढविण्यासाठी (लोड एनहान्समेंट) एक स्वयंचलित व्यवस्था सुरू केली आहे. या योजनेमध्ये ग्राहक घरबसल्या महावितरणच्या मोबाईल अॅप्लिकेशन किंवा वेबसाईटवर अर्ज सादर करून आणि योग्य शुल्क भरून आपला मंजूर भार वाढवून घेऊ शकतात. ग्राहकाने शुल्क भरल्यानंतर ४८ तासात त्याला परवानगी असलेला मंजूर भार वाढवून दिला जातो.

महावितरणने ही सुविधा २६ सप्टेंबर रोजी सुरू केली. महिनाभरात राज्यातील ४,१६४ ग्राहकांनी नव्या सुविधेचा लाभ घेतला. त्यामध्ये सर्वाधिक २,४६० औद्योगिक वीज ग्राहक आहेत. घरगुती ग्राहकांची संख्या ९४२ असून ५०९ व्यावसायिक ग्राहकांनी सुविधेचा लाभ घेतला. याखेरीज २५३ अन्य ग्राहकांनाही लाभ झाला.

वीज ग्राहकांना महावितरणकडून कनेक्शन देताना त्यांच्या मागणीनुसार वीज वापराबाबतची क्षमता निश्चित केली जाते, त्याला मंजूर भार म्हणतात. औद्योगिक ग्राहकांना उत्पादनात वाढ होत असेल किंवा अधिक क्षमतेची यंत्र सामुग्री वापरायची असेल तर अधिक भार मंजूर करून घ्यावा लागतो. सामान्यतः घरगुती वीज ग्राहकांचा मंजूर भार दोन ते पाच किलोवॅट इतका असतो. ग्राहकांना एअर कंडिशनिंगसारख्या सुविधा बसविण्यासाठी भार वाढवून घ्यावा लागतो. महावितरणने सुरू केलेल्या नव्या सुविधेमुळे ग्राहकांना घरबसल्या ऑनलाईन सेवा उपलब्ध झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या साडेतीन वर्षात वीज वितरण जाळे अधिक मजबूत केले आहे.

तसेच ग्राहकांच्या वाढत्या गरजेनुसार वीज उपलब्ध होण्यासाठी वीज खरेदी करार केले आहेत. त्यामुळे महावितरण ग्राहकांच्या मागणीनुसार तातडीने अधिक भार मंजूर करू शकत आहे.

महासागर
प्रभाग वार्ता

# रस्त्याची दुर्दशा आणि चोक झालेल्या गटारीमुळे नागरिक त्रस्त

प्रदीप पौनिकर
नागपूर दि.२८

प्रभाग क्र.६ वैशाली नगर, बिनाकी लेआउट येथील एम आय जी आणि एल आय जी क्वार्टरच्या मधला जैस्वाल बरफ कारखाना ते शिव मंदिरापर्यंत असलेल्या रस्त्याची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. रस्त्यालगत असलेली गटार मागील जवळपास १ वर्षापासून सतत चोक होत असून त्यातील सांडपाणी रस्त्यावर वाहत असून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. हे सांडपाणी रस्त्यालगत असलेल्या जलवाहिनीत जात असल्याने पिण्याच्या दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. दिनांक २५ जुलै २०२५ ला प्रभाग -६ मधील समस्यांचे निराकरण करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक श्री अभिजीत चौधरी यांना निवेदन देण्यात आले होते. आयुक्तांच्या



निर्देशानुसार दिनांक २७ जुलै ला आशीनगर झोन चे बांधकाम आणि आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी सदर स्थळाची पाहणी करून गेले होते तेव्हा ह्या रस्त्याचे व गटाराचे निर्माण कार्य लगेच करण्याचे आश्वासन देऊन गेले होते. परंतू ३ महिने लोटून सुद्धा अजून पर्यंत हे निर्माण कार्य निधी अभावी रखडले असल्याचे झोन स्तरावरून सांगण्यात येत आहे. मनपा प्रशासनाद्वारे समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने परिसरातील नागरिक संतप्त झाले आहेत. मनपा आयुक्तांना पुन्हा प्रलंबित असलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी निवेदन देण्यात आले होते. ओसीडब्ल्यूद्वारा नवीन पाईप लाइन साठी जागोजागी खोदण्यात आलेले खड्डे तसेच असून ते बुजवण्यासाठी विलंब होत आहे. नवीन जोडणी केलेल्या शेकडो ग्राहकांकडे मिटर जोडणी करण्यात आलेली नाही. रस्त्यांवर पडलेल्या खड्यांच्या बाबतीत झोन स्तरा वरून उपअभियंता, हॉट मिक्स प्लांट विभाग यांना रस्त्यांवर जागोजागी पडलेले खड्डे बुजवण्यासाठी कागदोपत्री कारवाई सुरू असून अजून पर्यंत खड्डे बुजविण्यात आलेले नाहीत. ऑनलाईन तक्रारी वर मनपा प्रशासनाचे पूर्ण दुर्लक्ष झाले असून अनेक तक्रारी प्रलंबित असल्याचे दिसते. त्यामुळे या ऑनलाईन तक्रार नोंदणीचा काय ऊपयोग असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. प्रभाग ६ वैशाली नगर हा मागासवर्गीय बहुल असल्याने येथील समस्यांकडे दुर्लक्ष व विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत नसल्याचा आरोप आम आदमी पार्टीच्या अनुसूचित जाती आघाडी चे नागपूर शहर अध्यक्ष श्री प्रशांत अंबादास मेश्राम यांनी केला असून ह्या रस्त्याचे व गटाराचे त्वरित निर्माण आणि इतर प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्याची मागणी केली आहे अन्यथा मनपा प्रशासना विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.यावेळी शहर महासचिव डॉ. अमेय नारनवरे व इकबाल रिझवी, संगठन मंत्री रोशन डोंगरे आणि प्रदिप पौनिकर, महिला उपाध्यक्ष नीलम अमेय नारनवरे, धम्मा जांभुळकर, सोनाली रामटेके,किरण बारसागडे, अश्विनी मेश्राम, रूनाली गेडाम, संघमित्रा मेश्राम, संगीता गजवे आदी उपस्थित होते.

# जरीपटका रोडवर कचऱ्याचा अंबार नागरिक त्रस्त



प्रमोद जांभूळकर
नागपूर दि. २८

मनपा प्रशासनाकडून नियमित स्वच्छतेची मागणी प्रभाग क्रमांक ७, इंदोरा येथील जरीपटका रोडवरील जगदीश बोरकर यांच्या शेजारील खुल्या प्लॉटमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचून राहिला आहे. या कचऱ्यावर जनावरे येऊन तो पसरवतात, परिणामी परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि माशा-डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. नागरिकांमध्ये रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक रहिवासी अजय सहारे म्हणाले, मनपा सोशल मीडियावर स्वच्छतेच्या पोस्ट टाकते, भिंतींवर स्वच्छतेच्या जाहिराती लावते पण उत्तर नागपुरात जिकडे तिकडे कचऱ्याचे ढीग दिसतात, यावरून स्पष्ट होते की कर्मचारी नीट काम करत नाहीत.

या भागातील नागरिक निलेश बोरकर, गोल्डी डोंगरे, हेमराज जांभूळकर, प्रमोद लोखंडे, सतीश जांभूळकर,अमोल गजभिये, मनोज कुटे, विशाल गजभिये, सुजित मेश्राम, बाळू जांभूळकर, अभिनव मेश्राम, प्रभू गजभिये आणि संजय रामटेके यांनी मनपा प्रशासनाकडे नियमित स्वच्छतेची मागणी केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, त्वरित कारवाई करून परिसरातील कचरा हटवावा आणि स्वच्छतेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.